# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# भारतीय महिलांचा इतिहास
## (History of Indian Women)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग २**

**इतिहास**

Optional : Paper 411

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (भारतीय महिलांचा इतिहास)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-38-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''भारतीय महिलांचा इतिहास'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

भारतीय महिलांचा इतिहास या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन, स्त्रियांचा रूढिगत आणि वैधानिक दर्जा, स्त्रियांच्या चळवळींचा उदय, स्वातंत्र्य आंदोलन आणि स्त्रियांचा सहभाग इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ संपादक ■

**डॉ. शर्मिला साबळे**
राजर्षी शाहू आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(भारतीय महिलांचा इतिहास)**
**एम. ए. भाग-२ : इतिहास पेपर ४११ (ऐच्छिक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे**<br>मा. श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले | १ |
| **डॉ. व्ही. एस. एलमार**<br>छ. शिवाजी कॉलेज, सातारा | २ |
| **डॉ. श्रीधर भाऊसाहेब शिंदे**<br>मिरज महाविद्यालय, मिरज | ३ |
| **डॉ. शर्मिला साबळे**<br>राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ४ |

■ संपादक ■

**डॉ. शर्मिला साबळे**
राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन | १ |
| २. | स्त्रियांचा रूढिगत आणि वैधानिक दर्जा | ४२ |
| ३. | स्त्रियांच्या चळवळींचा उदय | ९१ |
| ४. | स्वातंत्र्य आंदोलन आणि स्त्रियांचा सहभाग | १२० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ इतिहासातील दृश्यमान स्त्रिया

१.२.२ स्त्रियांच्या इतिहासलेखनाचे महत्त्व

१.२.३ स्त्रीवाद आणि स्त्रीवादी इतिहासलेखन

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे

- स्त्रियासंबंधीच्या इतिहासलेखनाचा आढावा घेता येईल.
- इतिहासातील स्त्रियांच्या दृश्यमानतेसंबंधी मिमांसा करता येईल.
- स्त्रियांच्या इतिहासलेखनाचे महत्त्वासंबंधी विवेचन करता येईल.
- इतिहासाच्या अभ्यासातील लैंगिक दृष्टिकोनाची ओळख होईल.
- स्त्रिवादाची संकल्पना व सिद्धांत याची ओळख होईल.

- स्त्रीवादी इतिहास लेखनाची संकल्पना समजावून घेता येईल.
- स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या विकासासंबंधी विवेचन करता येईल.

## १.१ प्रस्तावना

स्त्रिवादी इतिहासाची स्वतंत्र शाखा विकसित होत आहे. स्त्रियांचा इतिहास या शाखेने इतिहासाला प्रभावित केले आहे. इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधण्याचा प्रयत्न या शाखेमार्फत केला जातो. समाजातील त्यांच्या दुय्यम स्थानाविषयी चिकित्सा केली जाते. ही शाखा केवळ दुय्यम स्थानाची चिकिस्ता करून थांबत नाही तर स्त्रियांच्या उत्थानासाठी इतिंहासातील घडून गेलेला स्त्रियांचा इतिहास स्त्रियांच्या प्रगतीस कसा प्रेरणादायी होईल याची मांडणीही करते. तसेच समाज निर्मितीमध्ये स्त्रियांची भूमिका शोधण्याचा प्रयत्न करते. स्त्रियांचा इतिहास म्हणजे स्त्रियांची इतिहासात त्यांच्या दुय्यमस्थाना विरूद्ध दिलेला लढा असे अपणाला म्हणता येईल. हा अभ्यास करताना आपणांस दिसून येते की, स्त्रियांनी त्यांना मिळालेल्या संधीचा उपयोग करून स्वत:चे व समाजाचे जीवन उजळून टाकले. त्यांच्या या संघर्षाचा इतिहास आपणांस मांडावा लागतो. हा इतिहास मांडताना तिच्या संघर्षाचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करून इतिहासाचे पुर्नलेखन होणे गरजेचे आहे. भारतात वासाहतिक काळापासून इतिहास लेखन शास्त्रीय पद्धतीने होऊ लागले.

स्त्रियांच्या इतिहासलेखनाच्या विकासाचा अभ्यास करताना स्त्रियांच्या इतिहासलेखनाच्या प्रक्रियेचे तीन टप्पे करावे लागतात. जॉन स्कॉट यांच्या मते स्त्रियांच्या इतिहासाचा अभ्यास तीन पद्धतीने करता येऊ शकतो.

### १) समावेशनाचा इतिहास :

या टप्प्यात कर्तत्ववान स्त्रियांचा इतिहासामध्ये समावेश करण्यात आला. स्त्री योद्धा व कवयित्री यांवर प्रकाश टाकत, स्त्रियांना अवकाश मिळाल्यास त्याही पुरूषांप्रमाणे कृती करू शकतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### २) योगदानाचा इतिहास :

या पद्धतीमध्ये अशी मांडणी करण्यात आली आहे की, स्त्रिया या केवळ इतिहासामध्ये उपस्थित नव्हत्या तर इतिहास निर्माण करणाऱ्या होत्या. जसे की, क्रांतिकारी व राष्ट्रवादी चळवळीतील स्त्रियांचे योगदान.

### ३) दडपणूकीचा इतिहास :

यामध्ये दडपणूकीतूनच आदर्श स्त्रीची प्रतिमा उभी केली जाते. स्त्रिया हा इतिहासातील विश्लेषणाचा स्वतंत्रकोटीक्रम म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. या टप्प्यावर लिंगभावाची जाणीव निर्माण झाली. स्त्री म्हणून तीची जडणघडण कशी होते हे समजावून घ्यावे लागणार आहे. तिची ही जडणघडण कळल्याशिवाय पुरूषसत्ताक व्यवस्था जीवनाच्या सर्व क्षेत्रात कशी कार्यरत आहे हे समजणार नाही.

## १.२ विषय विवेचन

### स्त्री अभ्यासास प्रारंभ व विकास

स्त्री अभ्यासाची सुरूवात अमेरिकेत झाली तेथून ती संपूर्ण जगभर पसरली. एकोणिसाव्या शतकापासूनच मतदानाच्या हक्कांसाठी इंग्लंड व अमेरिकेतील स्त्रियांनी चळवळी सुरू केल्या. पाश्चात्य देशातील स्त्रीवादी चळवळीची वाटचाल तीन टप्प्यांमध्ये सांगता येते. पहिला टप्पा १९२० पर्यंतचा कालखंड आहे. या काळात स्त्रियांनी मतदानाच्या हक्कांसाठी चळवळी केल्या. १९२० ते १९६० चळवळीचा दुसरा टप्पा सांगता येतो. या काळात स्त्री चळवळीची पिछेहाट झाली. या काळात सर्व जग युद्धोत्तर पुनर्रचनेत गुंतले होते. सन १९६० नंतर तिसरा टप्पा सांगता येतो. या कालखंडात स्त्रीवादी चळवलीने गती पकडलेली दिसून येते. १९६० नंतर अमेरिकेत युद्ध विरोधी चळवळी, विद्यार्थी चळवळी, निग्रोंच्या गुलामांच्या चळवळी यांच्या प्रभाव वाढला. बेटी फ्रिडन, टी. जर्मन ग्रिअर, केट मिलेट, फायरस्टोन या स्त्रीवादी लेखिकेच्या लेखनाला महत्त्व प्राप्त झाले. यांच्या लिखानामुळे स्त्रियांनी गृहिणीची प्रतिमा नाकारून त्यांनी त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी बाहेर पडावे असे विचार वाढू लागले. पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांचे शोषण कसे करते या बद्दल जाणीव निर्माण होऊ लागली.

स्त्रीवादाचे विचार हळूहळू भारतासारख्या विकसनशील देशातही येऊन पोहचले. भारतातील सुशिक्षित व विचारवंतांनी आपली मते मांडण्यास सुरूवात केली. भारतात स्वातंत्र्यानंतर सन १९५० साली भारतीय संविधान अंमलात आले. संविधानाने सर्व क्षेत्रात स्त्रियांना समान संधी दिली. या संधीचा फायदा महिलांना होईल अशी अशा होती पण तसे झाले नाही. भारतातील महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास करण्यासाठी १९७१ मध्ये श्रीमती फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने 'समानतेच्या दिशेने' (Towards Equality) हा अहवाल सादर केला. यांमधून स्त्रियांच्या स्थितीबद्दल धक्कादायक माहीती पुढे आली. आरोग्य, शिक्षण, रोजगार सहभाग यामध्ये स्त्रियांची पिछेहाट दिसून आली. सन १९५० ते १९७५ या कालखंडातील बरेच स्त्रीविषयक अभ्यास

अभिजन वर्गापुरते मर्यादित होते. सातव्या पंचवार्षिक योजनेपासून ९ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत अनेक सरकारी मान्यताप्राप्त स्त्रीअभ्यास केंद्राची स्थापना झाली. भारतातील प्रमुख संशोधन संस्था आय.सी.एस.एस.आर. (Indian Council of Scientific and Social Research) या संस्थेने न्निन स्त्रियांच्या सामाजिक दर्जाविषयी अभ्यासाला चालना दिली. सन १९७३ मध्ये मुंबईत एस.एन.डी.टी. या महिला विद्यापीठात पहिल्या स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना झाली.

सन १९७९ मध्ये मथुरा बलात्कार प्रकरण घडले. पोलीस ठाण्यातच आदिवासी स्त्रीवर बलात्कार झाल्याचे सत्य बाहेर आले आणि महिलांच्या सामाजिक सुरक्षेचा प्रश्न पुढे आला. या नंतर मात्र स्त्रियांचे स्वतंत्र गट संघटित होवून स्त्रियांच्या वेगवेगल्या प्रश्नांवर चळवळी करू लागले. प्रामुख्याने हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, स्त्री आरोग्य, प्रसारमाध्यमातील स्त्रीदेहाचे विकृत प्रदर्शन या विरूद्ध विविध महिला संघटनांनी आवाज उठविला. त्यांनी अन्यायाविरूद्ध मोर्चे, धरणे, जाणिवा व जागृतीचा कार्यक्रम हाती घेतला. याची दखल सरकारने घेतली व स्त्रियांविषयीचे कायदे मंजूर केले. स्त्रीविषयक आंदोलने व स्त्री अभ्यास एकाच वेळी सुरू झाला. त्यामुळे स्त्रियांवरील अन्याय व अत्याचाराच्या व्यापकतेची जाणीव होऊ लागली. यातूनच स्त्रियांच्या या दुर्दशेबद्दलचे तात्विक व सैद्धांतिक विश्लेषण करणे सुरू झाले. याचाच परिणाम म्हणून अनेक विद्याशाखेतील तज्ज्ञ विचारवंत एकत्र येऊ लागले. मुंबईत महिला अध्ययन विषयक राष्ट्रीय संम्मेलनाचे आयोजन प्रप्रिल १९८१ मध्ये केले व त्यामध्ये 'आखिल भारतीय स्त्री परिषद' (All Indian Womens Studies Association) ची स्थापना झाली. अशाच संघटना अनेक राज्यातून स्थापन झाल्या. विद्यापीठ आनुदान आयोगाने (U.G.C.) काही विद्यापीठातून स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करण्यासाठी अनुदाने देऊ केली. पुण्यात 'आलोचना', 'दृष्टी' तर मुंबईत 'अक्षरा' सारखी स्वायत्त स्त्री अभ्यास केंद्रे व माहिती संगणक केंद्रे कार्यरत झाली.

थोडक्यात, या सर्व प्रयत्नांमुळे स्त्री अभ्यासास गती मिळाली. स्त्री प्रश्नांच्या मुळापर्यंत जावून ती मिटवण्याची उत्तरे कायद्यामार्फत व प्रबोधनामार्फत सोडवली जाऊ लागली. स्त्री अभ्यासास समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्रा बरोबरच इतिहासातही स्त्री अभ्यासाला गती मिळाली. इतिहासाने भूतकाळातील स्त्रियांचा स्थितीचा अभ्यास करून स्त्रियांना आजपर्यंत मिळालेल्या विषम वागवणुकीबद्दल वाचा फोडली. स्त्रियांचा अभ्यास करताना अभ्यासकाला लक्षात आले की, स्त्रिया इतिहासातून अदृश्य राहिल्या आहेत. याची कारणमिमांसा सुरू झाली व स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या प्रवासाला सुरूवात झाली.

### १.२.१ इतिहासातील दृश्यमान स्त्रिया

सर्व जगभर स्त्रीविषयक ज्ञान शाखेचा अभ्यास व चर्चा सुरू आहे. स्त्रिया विषयीच्या या अभ्यासातील चर्चेत प्रामुख्याने कन्या, पत्नी, माता, भगिनी, प्रियसी इत्यादी भूमिकांतून स्त्रियांचे समाजातील स्थान, समस्या, आरोग्य, शिक्षण, गरजा, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय क्षेत्रातील समानतेसाठी त्यांनी केलेला संघर्ष या सर्वांचा अंतर्भाव होतो. अर्थात या विषयाचा अभ्यास त्यांनी केलेल्या चळवळीच्या माध्यमातून ही करता येतो. मानवी इतिहासाच्या जडणघडणीत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले या स्थानाची व या आदर्श मुल्यप्रमाणके ही पुतृसत्ताक होती. ती पुरूषाला अनुकूल होती. तेव्हा इतिहासात स्त्रिया दृश्यमान का झाल्या नाहीत त्याची शहानिशा करावी लागणार आहे. हे काम मानव्यशाखा करत आहे व सर्व पातळीवर स्त्रियांविषयीचे संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे. इतिहास या ज्ञान शाखेलाही या विषयाने प्रभावित केले आहे व त्या संबंधात मोठ्या प्रमाणात संशोधनेही पुढे येत आहेत. यातून स्त्रीवादी इतिहास लेखन परंपरांचा विकास होत आहे.

थोडक्यात, आधुनिक काळात स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयी अभ्यास होऊ लागले. यातूनच लिंगभावाची ओळख होवून स्त्रियांना दुय्यमत्त्व देणाऱ्या, स्त्री-पुरूष असमानता अधोरेखित करणाऱ्या रूढीपरंपरा संस्कृतीचा अभ्यास होवून इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधतानाचा प्रयत्न होऊ लागला. स्त्रीवादी सिद्धांत व संकल्पनेची मदत घेऊन स्त्रीविषयक इतिहासाचे पुनर्लेखन व पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नात स्त्रियां इतिहासातून अदृष्य असल्याचे लक्षात आले. भारतीय इतिहासात आणि एकूणच जगाच्या इतिहासातही स्त्रिया अदृश्यमानराहिल्या आहेत. या इतिहासातून अदृश्य का राहिल्या याची कारणमिमांसा करावी लागणार आहे. त्याच्या कारणांचा शोध घेतल्यास खालील कारणे दृष्टिक्षेपात येतात.

जसे इतिहासातून स्त्रिया अदृश्य का आहेत याची कारणमिमांसा केली जाते तसेच स्त्रीविषयक अभ्यासातून इतिहासात दृश्यमान स्त्रियांच्या कार्यकर्तृत्त्वाची पुनमांडणी स्त्रीवादी सिद्धांकन समोर ठेवून केली जात आहे. इतिहासात त्यांचे स्थान व्यक्ती म्हणून ठळक होत आहे. भारतीय इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील स्त्रियांविषयीचे संशोधन सुरू झाले आहेत. उदा. कल्हणच्या ‘रजतरंगिणी’ मधील स्त्रीविषयक दृष्टिकोन, ताराबाई शिंदे यांचे ‘स्त्रीपुरूष तुलना’, संत कवयित्रीचे लिखाण, लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र, वेगवेगळ्या प्रांतातील स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग असे सहभागाचे इतिहास लिहीले जात आहेत. तर धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य स्त्रियांना कसे दुयमत्व दिले गेले याचा लिंगभाव तपासून पाहण्याचे काम इतिहास ही ज्ञान शाखा करीत आहे व स्त्रियांच्या इतिहासाकडून स्त्रीवादी इतिहास लेखनाकडे ती सरकत आहे.

**इतिहासातून स्त्रिया दृश्यमान झाल्या नाहीत याची कारणे**

**१) धर्माचा प्रभाव :**

भारतातीलच नव्हे तर जगातील स्त्रियांचा दर्जा ठरविण्यात धर्माची अहम भूमिका दिसून येते. धर्माची तत्त्वे, कल्पना, रूढी-परंपरा, आचार-विचार यांचा प्रभावातून स्त्रियांना अंकीत करण्याचा प्रयत्न धर्माचा असतो. त्यानुसार त्या-त्या धर्मात रूढी परंपरांचा जन्म होतो. या रूढी-परंपरांचे वहन हाच स्त्रियांचा धर्म बनतो. तर पुरूषार्थ गाजविणे हा पुरूषांचा धर्म ठरतो. पुरूषार्थ धर्मात मात्र नवनवे ज्ञानाची क्षेत्रे पदाक्रांत करणे, पराक्रम गाजविणे अंतर्भूत असते.

**२) स्त्रियांच्या कामाला उत्पादक मुल्य नाही :**

स्त्रियांचा स्वाभाविक कल व आवड पुरूषांच्या क्षेत्रात नसतो म्हणून स्त्रिया इतिहासाच्या पुस्तकातून गायब असतात असा समज निर्माण केला जातो. पण वस्तूत: ही कर्तृत्व गाजवण्याची सर्व क्षेत्रे धार्मिक कायद्यांनुसार पुरूषांच्या मालकीची आहेत. त्याच्याकडे ही मालकी जाण्याचे कारण पितृप्रधान समाजव्यवस्था हे आहे. म्हणून या व्यवस्थेमध्ये त्यांच्या कार्याला एक मूल्य आहे. स्त्रियांच्या कार्याचे क्षेत्र वेगळी आहेत व या क्षेत्राला पुरूषप्रधान व्यवस्थेत अजिबात मूल्य नाही. म्हणून स्त्रिया इतिहासातून अदृश्य असण्याचे कारण पितृप्रधान समाजव्यवस्थेत शोधावे लागेल न की त्यांच्या स्वाभाविक कल वा आवड त्यांना या क्षेत्रामध्ये संधी का दिली गेली नाही या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल आणि म्हणून सामाजिक व सांस्कृतिक इतिहास स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासने त्याचे पुनर्लेखन होणे गरजेचे आहे.

**३) सर्व ज्ञान क्षेत्रावर पुरूषांची मक्तेदारी :**

स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. कामाच्या विभागणीमध्ये तिच्या वाट्याला अनुत्पादक कार्य आले. इतिहास लेखनाचे काम प्रामुख्याने पुरूषाने पुरूषांच्या कार्याचे तेही राजकीय असे लेखन केले आहे. या लेखनाचे विषय राजाने केलेले युद्ध त्याची मुत्सदेगिरी, त्याचे प्रशासन, त्याची प्रेम कहानी असे आहेत.

**४) स्त्रियांची सर्व क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेतील अनुस्थिती :**

सार्वजनिक व खाजगी आयुष्यातही स्त्रिया निर्णय प्रक्रियेपासून दूर राहतात. त्यामुळे ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये त्यांच्या नोंदी आढळत नाहीत. तेव्हा स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाच्या इतिहासाची नोंद घेण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक साधनांचा अभ्यास झाला नाही. समाजाने तिच्यावर घातलेल्या बंधनाचा तिच्या कार्यकर्तृत्वावर झालेला परिणाम या दृष्टीनेही ऐतिहासिक साधनांचे परिक्षण होणे गरजेचे आहे. पुरूषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या ऐतिहासिक साधनातून स्त्रिया अदृश्य आहेत. पण जे काही त्रोटक संदर्भ या

साधनांमधून येतात त्याचा अभ्यास लिंगभेदात्मक दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. ही सर्व साधने उपयोगात आणता येतील अशी नाहीत पण जरूर तेथे व जरूर तेवढ्याच साधनांचा उपयोग शक्य होणार आहे. साधनांची चिकित्सा करताना स्त्रीवादी दृष्टिकोनाचा अभ्यास मात्र इतिहास संशोधकाला गरजेचा आहे.

### ५) संदर्भ साधने ही पुरूषांची निर्मिती आहे :

राष्ट्रीय व स्थानिक इतिहासाच्या पुस्तकातून स्त्रिया अदृश्य आहेत. कारण संशोधकाला प्राथमिक साधनांमधून स्त्रियांविषयीची माहिती अतिशय त्रोटक उपलब्ध होते. कारण इतिहास ज्या गोष्टींची चर्चा करतो त्या गोष्टींपासून (हुद्याच्या व मानाच्या/अधिकाराच्या जागेपासून) स्त्रिया दूर होत्या. तर इतिहास या सर्व अधिकाराच्या मानाच्या जागांची/व्यक्तींची त्यांच्या कर्तृत्त्वाची महती गातो. ही सर्व क्षेत्रे पुरूष निर्मित असतात म्हणून स्त्रिया इतिहासात दृश्यमान नाहीत. इतिहासात ज्या अधिकाराच्या जागेवर स्त्रिया क्वचित दिसतात. त्याचे कारण ही त्यांच्या पुरूष जोडीदार त्यांच्या सोबत नसतो. त्याचा मृत्यू झालेला असतो किंवा काही कारणास्तव तो त्या पदाला न्याय देऊ शकतनाही. त्यावेळी अशा स्त्रियांनी पुरूषप्रधान संस्कृतीला डावलून घराण्याच्या गरजेपोटी पुरूषांसारखे कार्यकर्तृत्त्व करून दाखविले हा इतिहासाचा वर्ण्यविषय आहे म्हणून इतिहासात अशा स्त्रियांच्या नोंदी मिळतात.

### ६) स्त्रियांची कार्यकर्तृत्त्वाची / संघर्षाची क्षेत्र भिन्न आहेत :

पितृप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान, या दुय्यम स्थानाविरूद्ध तिने दिलेला लढा हे विषय स्त्रियांच्या इतिहासाचे असणार आहेत हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यांच्या जीवन संग्रामाची विविधांगी चित्रण इतिहासाचा विषय होऊ शकतो हे आपण जाणले पाहिजे व त्या दृष्टीने स्त्रियाच इतिहासामधून अदृश्य असणे म्हणजे काय ? याचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. तरच आपण स्त्रिया इतिहासातून अदृश्य का आहेत याचा इतिहास मांडू शकतो.

### ७) इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नावर भर :

इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नांवर भर दिल्याने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रे दुर्लक्षित राहीली. या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रियांचा वावर आहे. कदाचित या कारणास्तव या इतिहासाला महत्त्व नसावे किंवा याकडे दुर्लक्ष झाले असावे म्हणूनही या क्षेत्रातही स्त्रिया इतिहासामधून अदृश्य राहिल्या.

### ८) इतिहास लेखनातील सर्व इतिहास प्रवाह हे पुरूषप्रधान संस्कृतीतून निर्माण झाले आहेत :

इतिहास लेखनातील सर्व प्रवाह पुरूषप्रधान संस्कृतीतून निर्माण झाल्यामुळे पण स्त्रिया इतिहासातून अदृश्य राहिल्या. पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये वाढलेल्या इतिहासकारांना स्त्रियांचे इतिहासातील स्थानावर

त्यांच्या इतिहासातील कामगिरीवर लक्ष गेले नाही म्हणून त्या इतिहासात अदृश्य राहिल्या. म्हणून या विचार प्रवाहांनी लिहिलेले स्त्रियांचे इतिहास भाग देखील स्त्रीवादी सिद्धांकन वापरून तपासून घ्यावे लागतील.

थोडक्यात, स्त्रिया इतिहासलेखनाचा विषय होऊ शकतात. त्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा इतिहास लिहिला जाऊ शकतो. यासाठी आपणांस स्त्रिया इतिहासात दृश्यमान का झाल्या नाहीत या गोष्टींची कारणमिमांसा मात्र करावी लागणार आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**१) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. जॉन स्कॉट यांच्या मते स्त्रियांचा अभ्यास किती पद्धतीने करता येतो ?

२. पाश्चात्य देशातील स्त्री चळवळीच्या वाटचालीचे किती टप्पे आहेत ?

३. भारतीय महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास करण्यासाठी सन १९७१ साली नेमलेल्या समितीचे अध्यक्ष कोण होत्या ?

४. श्रीमती फुलरेणू यांनी महिलासंबंधित दिलेल्या अहवालाचे नाव काय होते ?

५. कल्हणने कोणता ग्रंथ लिहिला ?

६. ताराबाई शिंदे यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

**२) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. मुंबईत महिला अध्ययनविषयक राष्ट्रीय संम्मेलनाचे आयोजन ........ साली झाले.

(अ) १९९१ (ब) १९८१ (क) १९८० (ड) १९८४

२. पहिल्या स्त्रीअभ्यास केंद्राची स्थापना ....... विद्यापीठात झाली.

(अ) शिवाजी विद्यापीठ (ब) अमरावती विद्यापीठ

(क) एस. एन. डी. टी. (ड) सावित्रीबाई फुले विद्यापीठ

३. पुण्यात स्थापन झालेल्या स्वायत्त स्त्री अभ्यास केंद्राचे नाव ...... आहे.

(अ) अलोचना, दृष्टी (ब) गांधारी (क) माहेर (ड) क्षितीज

४. मुंबईत स्थापन झालेल्या स्वायत्त स्त्री अभ्यास केंद्राचे नाव ...... आहे.

(अ) अक्षरा (ब) स्पॅरो (क) भारती (ड) दृष्टी

५. मथुरा बलात्कार प्रकरण ........ साली झाले ?

(अ) १९७१ (ब) १९८१ (क) १९८० (ड) १९८५

### १.२.२ स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व

आजवरचा इतिहास हा पुरूषकेंद्री आहे. History या शब्दातच his story म्हणजे त्याचा पुरूषांचा इतिहास हा अर्थ प्राधान्याने येतो. इतिहासाने Her म्हणजे तिची उपेक्षाच केली आहे. मानवी इतिहासाच्या जडणघडणीत पुरूषांपेक्षा स्त्रियांना दुय्यमत्त्व का आणि कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबवयाचे मार्ग, आव्हाने व चळवळी यांची मांडणी व अभ्यास स्त्रियांच्या इतिहास लेखनामध्ये केला जातो. तेव्हा या इतिहासाचे महत्त्व आपण लक्षात घेऊन एकंदरित सर्वप्रकारच्या इतिहासलेखनाचे स्त्रीवादीदृष्टिकोन वापरून त्याचे पुनर्लेखन झाले पाहिजे. तरच मानवजातीचा समग्र इतिहास लिहिला जाऊ शकतो.

**१) स्त्रियासंबंधीचे शतकानुशतके दडले गेलेले प्रश्न ऐरणीवर येऊ लागले आहेत**

स्त्रीवादी इतिहासलेखन हा सवतासुभा नाही तर इतिहासाच्या मुख्य प्रवाहामध्ये स्त्रिया अदृश्य राहिल्या आहेत त्यांना या प्रवाहात आणणे व एक व्यक्ती म्हणून त्यांच्या स्थानाची चिकित्सा करणे आवश्यक आहे. हे कार्य स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या माध्यमातून केले जात आहे. या स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या माध्यमातून स्त्रियांसंबंधीचे शतकानुशतके दडले गेलेले प्रश्न ऐरणीवर येऊ लागले आहेत. स्त्रियांच्या विषम वागणुकीबद्दल वाचा फोडली आहे.

**भ) स्त्रियांसंबंधीच्या आकलनामध्ये भर पडली :**

समाजशास्त्र, राज्याशास्त्र, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्र इ. अनेक विषयांबरोबरच इतिहास विषयाच्या अभ्यासामुळे स्त्रियांसंबंधीच्या आकलनामध्ये भर पडत आहे. यामुळे स्त्रियांसंबंधीचा पारंपारिक दृष्टिकोन बदलण्यात मदत होणार आहे. भारतात ठिकठिकाणी उत्खनने झाली त्यातून पुरातत्त्व अवशेषांवरून स्त्रियांसंबंधीचे आकलने बदलली. डॉ. इरावती कर्वे, डॉ. दा. ध. कोसंबी, डॉ. शरद पाटील, पुरातत्त्वज्ञ डॉ. ह. दी. सांकलिया यांच्या संशोधनाने आर्यांच्या अगमनापूर्वी भारतात मातृसत्ताक व्यवस्था प्रचलित होती हे सिद्ध केले. प्राचीन आदिम समाजात स्त्रिया पुरूषांच्या वर्चस्वाखाली नव्हत्या. त्या उत्पादन

कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. या प्राचीन समुहांमध्ये स्त्रिया काठीच्या सहाय्याने शेती करत होत्या. भांडी बनविणेचे व बुरूडकामही त्या करत होत्या, धार्मिक कार्याचे पौराहित्य देखील त्या करत होत्या. स्त्रियांच्या जनन क्षमतेबद्दल या समुहांमध्ये मोठा आदर होता. रा. ची. ढेरे यांनी लज्जागौरी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी भारतातील मातृदेवतांच्या मुर्तींचा अभ्यास करून विश्वसर्जनाची देवता म्हणून वेदपूर्वकाळापासून भारतात मातृदेवताची उपासना अस्तित्त्वात होती हे महत्त्वपूर्ण संशोधन केले.

**म) इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी स्त्रीवादी इतिहास लेखनाने दिली :**

स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहासाचा अन्वयार्थ काढला तर भूतकाळाचे वेगळे आकलन होईल. ज्ञान हे वस्तुनिष्ठ असते हे प्रमेय स्त्रीवादी इतिहासकारांनी नाकारले. संशोधकांच्या सामाजिक स्थानानुसार वास्तवाचे आकलन बदलते, असेही त्यांनी सिद्ध केले. यालाच भूमिदृष्टी सिद्धांत म्हटले जाते. थोडक्यात, समग्र वास्तवाच्या आकलनासाठी विविध सामाजिक स्थानावरून झालेले आकलन लक्षात घेतले पाहिजे अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंत घेतात आणि स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव केंद्रस्थानी असले पाहिजेत असा आग्रह धरतात. या पद्धतीने केलेले संशोधन आपणांस भारतीय इतिहासासंबंधी नवी दृष्टी देणारे ठरणार आहे.

पुरूषसत्ताक व्यवस्थेला पोषक असलेली लिंगभाव जडणघडणीची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू असते हे भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या स्त्रीवादी अभ्यासातून पुढे आले. लिंगभावाच्या जडणघडणीवर मोठ्या प्रमाणात संशोधने झाली. लिंगभावाचा इतिहास हा शब्द 'लिंगभाव इतिहास म्हणजे स्त्रियांच्या/ स्त्रीत्त्वाच्या जडणघडणीचा इतिहास' अशा अर्थाने अभ्यासविश्वात रूढ झाला आहे. कोणत्याही समाजातील वर्ग व्यवस्था, उत्पादन व्यवस्था, पितृसत्ता आणि लिंगभाव निर्मितीची प्रक्रिया यांच्यातील अंतरसंबंध तपासले पाहिजेत ही दृष्टी स्त्रीवादी इतिहासलेखनाने दिली.

**य) स्त्रियांना न्याय देणाऱ्या कायद्याची निर्मिती :**

या अभ्यासातून स्त्रियांच्या अन्याय व अत्याचाराच्या व्यापकतेची जाणीव होऊ लागली. प्रामुख्याने हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, स्त्री आरोग्य, प्रसारमाध्यमातील स्त्री देहाचे विकृत प्रदर्शन या अन्यायाविरूद्ध मोर्चे, धरणे, आंदोलने होवून जाणीव-जागृती होऊ लागली. सरकारला व समाजाला स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव होऊ लागली. त्यातील क्रौर्य कळू लागले. या सर्व प्रकारच्या चळवळींच्या माध्यमातून सरकारवर दबाव निर्माण होवून स्त्रियांना न्याय देणारी अधिक कठोर कायदे निर्माण झाले. भारतीय संविधानाने स्त्रियांना समानतेचा अधिकार बहाल केली. तरी प्रत्यक्षात मात्र या अधिकाराचा फायदा स्त्रियांना मिळत नव्हता. कारण अजुनही स्त्रीया धर्म व परंपरेच्या ओझ्याखाली जगत होत्या. हुंड्यासाठी स्त्रियांचा छळ

केला जायचा. प्रसंगी त्यांना जाळूनही मारले जायचे. या विरोधात स्त्रियांच्या गटांनी चळवळी केल्या. हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ साली मंजूर करण्यात आला. स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६, गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा १९९४ साली, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २६ ऑक्टोबर, २००६ पासून लागू केला. अशा प्रकारचे विविध कायदे स्त्रियांच्या चळवळीमुळे अस्तित्वात आले. स्त्रियांच्या चळवळीचा इतिहास लिहिला जाऊ लागला, हा स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास आहे.

**र) स्त्रीवादी इतिहासलेखन वर्तमानकालीन स्त्रियांची परिस्थिती बदलण्याचे दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते :**

विविध विषयाच्या अभ्यासातून स्त्रियांसंबंधी विविध आकलने समोर येत आहेत. याचा उपयोग करून स्त्रियांचे दुय्यमत्त्व का व कसे निर्माण झाले व ते नष्ट करून स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी इतिहासलेखन उपयोगी होणार आहे. आज स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी विविध अभ्यास होत आहेत. या अभ्यासाचा उपयोग करून स्त्री सक्षमीकरणासाठी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर २५ जानेवारी, १९९३ रोजी महाराष्ट्र महिला आयोगाची स्थापना झाली. महिलांसाठी असलेल्या संरक्षणात्मक कायद्याचा भंग झाल्यास, स्त्रीवर अत्याचार झाल्यास अशा महिला राज्य महिला आयोगाकडे दाद मागू शकतात. आयोगाची एक कायदेतज्ज्ञ समिती आहे. ही समिती हुंडाबळी, बलात्कार, कुटुंब न्यायालयातील खटल्यातील प्रकरणांवर सल्ले देते. ही समिती महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या विविध कायद्यांतील तरतुदींचे परिक्षण करते आणि त्यात सोईस्कर बदलही सुचविते. तसेच स्त्रियांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी नविन कायदे सुचविण्याचे कामही ही समिती करते. थोडक्यात, स्त्रियांचे कायदेशीर हक्क सुरक्षित ठेवण्याचे काम महिला आयोग करतो. कायदेशीर हक्कांबरोबरच शासन महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करते. स्त्रियांचा दर्जा सुधारण्याच्या कामी स्त्रीवादी अभ्यासाचा इतिहास महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

इतिहासाचा अभ्यास करताना आपण आजच्या काळातील परिपेक्ष वापरतो. त्यामुळे इतिहासाच्या आकलनात मोठे घोळ निर्माण होतात. इ.स. पूर्व ५००० मध्ये कोरलेल्या भिमबेटका येथील गुहा-चित्रातून शिकार करणाऱ्या स्त्रिया चित्रित केल्या आहेत. आपण मात्र आजच्या परिपेक्षामध्ये त्या काळाच्या स्त्रियांचे चित्र रंगवतो की स्त्रियांचे कार्य चुल आणि मुल होते.

## र) स्त्रीवादी इतिहासलेखन नवसमाज निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे :

स्त्रियांच्या दडपणूकीचे कारणे समजावून घेताना समाज एका मानवतावादी सामाजिक बदलाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. हा प्रवास मात्र निरंतर चालु आहे. लिंगभेद स्त्रियांच्या आणि पुरूषांच्या जीवनातून हद्दपार झाला पाहिजे. त्यासाठी नव्या मानवतावादी मुल्यांवर उभा असणाऱ्या समाजाच्या निर्मितीमध्ये स्त्रीवादी इतिहासलेखन उपयोगी होणार आहे.

## ल) स्त्री-पुरूषाला लिंगभेदाच्या चौकटीतून मुक्त करता येणार आहे :

स्त्रीत्व व पुरूषत्व समाजरचित असते. समाजरचित या भूमिकेत स्त्रियांची दडपणूक होते तर पुरूषाला अर्थार्जनाचा व सिमेवर लढण्याचा अतिरिक्त भार सोसावा लागतो. या कामातून पुरूषांची मुक्ती होवून जीवनाची सर्व क्षेत्रे स्त्री आणि पुरूषांसाठी खुली असणार आहेत. तुमच्या आवडीनिवडी व योग्यतेनुसार व्यक्ती म्हणून घडण्याची संधी प्राप्त होवून स्त्री आणि पुरूष हे दोघेही लिंगभेदाच्या चौकटीतून मुक्त होणार आहेत. यासाठी स्त्रीवादी सिद्धांकन व स्त्रीवादी इतिहासाचे महत्त्व असणार आहे.

## ळ) स्त्रीवादी इतिहासामुळे स्त्री चळवळीची चिकित्सा करणे शक्य झाले आहे :

स्त्री चळवळ व स्त्री अभ्यास ही दोन्ही क्षेत्रे एकाच टप्प्यांवर सन १९७४-७५ च्या सुमारस विकसित होण्यास सुरूवात झाली. स्त्रियांच्या चळवळी एकसंघ, एकसाची व एकसूरी नाहीत. स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्त्रियांच्या विविध संघटना झगडत असतात. स्त्री चळवळीसंबंधी मासिके, वर्तमानपत्रे, माध्यमे यांच्यातून जे काही स्त्री चळवळ म्हणून मांडले जाते, तसेच स्त्रियासंबंधी अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात. त्याच्याकडे चिकित्सकपणे पाहिले पाहिजे. स्त्री अभ्यासकांनी यासंबंधी चिकित्सक प्रतिसाद देणे गरजेचे आहे. स्त्री प्रश्नांसंबंधित स्त्रीवादी सिद्धांकनाद्वारे ही चिकित्सा केली जाते. काळाच्या विविध टप्प्यांवर झालेल्या स्त्रीवादी सिद्धांकनाचा इतिहास यासाठी उपयोगी ठरतो.

## ळ) स्त्री चळवळीचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहासाची मांडणी स्त्रीवादी इतिहास करतो :

स्त्रियांच्या प्रश्नाला पुरूषसत्ताक समाजामध्ये दुर्लक्ष केले जाते. या संदर्भात डॉ. विद्युत भागवत म्हणतात, 'जर आपण निवड करून स्त्री चळवळ आणि स्त्री अभ्यास ही क्षेत्रे निवडली तर त्यासाठीचे मेहनतीने अभ्यास करणे, काम करणे मग त्याच्यातही अदृश्यता सुद्धा स्वीकारावी लागते. म्हणजे माझ्यासारखीला लाईम लाईट कधी मिळाला नाही, अवॉर्ड कधी मिळाले नाही. पण मग मी असा विचार केला की, मी जे काम करतेय ते इतके महत्त्वाचे आहे की, अवॉर्ड्स आणि लाईम-लाईटपेक्षा अदृश्य राहून विचार पुढे नेणे माझे काम आहे. अशा स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी कार्य करणाऱ्या,

समाजाने त्यांची दखलही घेतलेली नसते. अशा स्त्रियांचा इतिहास लिहण्याचे कार्य स्त्रीवादी इतिहासलेखनाची शाखा करते. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा इतिहास असले, आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा इतिहास असेल अशा प्रकारचे स्त्रियांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे काम स्त्रीवादी इतिहासलेखन करत आहे.

स्त्रीवादी इतिहास लेखन करताना स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक अभ्यास शाखांची मदत घ्यावी लागणार आहे. स्त्रियांच्या इतिहास लेखनातून स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहासाबरोबरच त्यांच्या दडपणुकीचा इतिहासही मांडावा लागणार आहे. जेणे करून स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होणार आहे. स्त्रियांचा इतिहास हा राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भूमिदृष्टी सिद्धांत म्हणजे काय ?

२. प्राचीन समुहांमध्ये स्त्रिया कोणते काम करीत ?

३. लज्जागौरी हा ग्रंथ कोणी लिहिला ?

४. लिंगभावाचा इतिहास हा शब्द कोणत्या अर्थाने दृढ झाला ?

५. हुंडा प्रतिबंधक कायदा कोणत्या साली पास झाला ?

६. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा कोणत्या साली पास झाला ?

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. प्राचीन समुहांमध्ये स्त्रियां ........... च्या सहाय्याने शेती करत होत्या.

(अ) काठी (ब) नांगर (क) बैल (ड) दोरी

२. ......... काळापासून भारतात मातृदेवताची उपासना अस्तित्त्वात होती.

(अ) वेदपूर्व काळ (ब) बौद्ध काळ

(क) वैदिक काळ (ड) पुराण काळ

३. गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक कायदा ......... साली पास झाला.

(अ) १९८३ (ब) १९९४ (क) १९३८ (ड) १९८४

४. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा ....... साली पास झाला.

(अ) २००६ (ब) १९९० (क) १९९५ (ड) २००१

## १.२.३ स्त्रीवाद आणि स्त्रीवादी इतिहासलेखन

**स्त्रीवादाची उपपत्ती :**

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासात स्त्रिया दीर्घ काळ शोषित व उपेक्षित राहिल्या. पाश्चात्य देशात अठराव्या शतकात स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. तथापि, विकसित व विकसनशील देशांत स्त्री चळवळ व स्त्री अभ्यास वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. स्त्रीवादही पाश्चिमात्य देशाकडून आपल्याकडे आलेली संकल्पना आहे. असे असलेतरी स्त्रीवाद म्हणजे समान हक्क, समान दर्जा व समान संधी होय.

स्त्रीशिक्षण, अन्यायी परंपरांचा विरोध व समाजसुधारणा या स्वरूपात स्त्रीमुक्तीची बीजे सापडतात. म्हणून सामाजिक सुधारणा चळवळ व स्त्रीमुक्ती यांचे अतूट नाते आहे. इतिहास या बाबींचा चिकित्सक इतिहास लिहितो. भारतात समाज सुधारणेच्या चळवळी व स्वातंत्र्याच्या चळवळीतून स्त्रीवादाचा विचार रूजू लागला. सुरूवातीला साहित्यातून व नंतर मोर्चे, चळवळी, अभ्यास केंद्र, आदी माध्यमांतून स्त्रीवादाचे भारतात बीजारोपण झाले. १९७५ हे 'जागतिक महिला वर्ष' व १९७५ ते १९८५ हे 'जागतिक महिला दशक' म्हणून घोषित करण्यात आले. भारतात वाढणाऱ्या चळवळी लक्षात घेऊन १९८१ साली मुंबईच्या एस.एन.डी.टी. विद्यापीठात पहिली स्त्रीविषयक अभ्यासाची परिषद भरली. या परिषदेतून स्त्री अभ्यासकेंद्राची संकल्पना जन्माला आली व हळूहळू विस्तारत गेली.

स्त्रीवादी चळवळीच्या व्याख्येची मांडणी वेगवेगळ्या सिद्धांकनांनी वेगवेगळ्या पद्धतीने केली आहे. असे असले तरी त्याचा गाभा स्त्री-पुरूष समानता असाच आहे.

**स्त्रीवादाची व्याख्या (Definitions) :**

फेमिनीझम (Feminism) ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. 'Feminism' हा मुळ शब्द लॅटीन भाषेतील आहे. याचा अर्थ women, having a quality of females अर्थात स्त्रियांचे गुण असलेली व्यक्ती असा आहे. १८९० च्या दशकात womanism च्या ऐवजी feminism हा शब्द

प्रथम वापरला गेला. एलिसारॉसी हिने २७ एप्रिल १८९५ रोजी हा शब्द प्रथम वापरला व पुढे तो सगळीकडे रूढ झाला.

Women हा इंग्रजी शब्द wiffman या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ स्त्रीव्यक्ती असा होतो. Womanism हा शब्द 'theory of sexual equaliand the movement for women's rights' म्हणजे लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांच्या हक्काची चळवळ या अर्थाने वापरला जाऊ लागला.

इतिहासकार लिंडा गॉर्डन (Linda Gordon) यांच्या मते, 'स्त्रियांचे दुय्यमत्त्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद आहे.'

छाया दातार सत्यशोधक मार्क्सवादी या अंकात म्हणतात, ''फेमिनीझम म्हणजे वर्ग, जात, लिंग वर्चस्व या तिन्हीचा नि:पात करून खऱ्या अर्थाने समतेवर आधारित समता प्रस्थापित करणे.''

विकिपेडिया व ऑक्सपर्ड शब्दकोषा प्रमाणे (According to Wikipedia and Oxford Dictionary), 'Feminism is a collection of movements and ideologies aimed at defining, establishing and defending equal political, economic, cultural and social rights for women'. अर्थात स्त्रियांच्या समान राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांची व्याख्या करून त्यासाठी लढणारे व हे हक्क कायम ठेवण्यासाठी लढणाऱ्या वेगवेगल्या विचारसरणी व आंदोलने यांना एकत्रितपणे 'स्त्रीवाद' म्हणता येईल.

'न्यू एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिका' मध्ये स्त्रियांची चळवळ म्हणजे स्त्रियांची भूमिका बदलू पाहणारी चळवळ अशी व्याख्या दिली आहे. त्यामध्ये बहुविध आणि व्यापक संघटना, व्यक्ती आणि कल्पना यांचा समावेश होतो आणि समाजामध्ये सौम्य सुधारणा करू पाहणाऱ्यांपासून जहाल परिवर्तन करू पाहणाऱ्यांपर्यंत सर्वांचा विचार केला जातो. सर्वांमध्ये एकवाक्यता असते ती म्हणजे, स्त्रिया स्वत:चे कार्यक्षेत्र आणि जीवनाचा ढाचा घडविण्यासाठी स्वतंत्र झाल्या पाहिजेत ह्या मुद्यावर.

स्त्रियांची चळवळ हा भला मोठा व्यापक असा पट असल्यामुळे त्यांमध्ये अनेक कप्पे अथवा उपगट असणे अपरिहार्य आहे. स्त्रियांचे भिन्न गट भिन्न पद्धतीने प्रभावित झाल्यामुळे एकात्म स्त्रीवादाची जाणीव निर्माण होण्याऐवजी भिन्न हीतसंबंध आणि अपेक्षा निर्माण झाल्या. परिणामस्वरूप स्त्रिया जे आयुष्य जगत होत्या त्यांच्या विरोधातील त्यांचे बंड हे खाजगी स्वरूपात अभिव्यक्त होत होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**स्त्रीवादाची उपपत्ती :**

सर्व जगभरातील समाज व्यवस्थांनी, संस्कृतींनी स्त्रियांना दुय्यम स्थान दिले होते. जवळपास सर्वत्र पितृसत्ताक कुटुंब व समाजव्यवस्था अस्तित्वात होती. तिला स्वत:चे असे स्वतंत्र व्यक्तिमत्व नव्हते. तिला पिता, पुत्र, पती यांच्या अधिपत्याखाली राहावे लागत होते. युरोपमध्ये सोळाव्या शतकात धर्मसुधारणा चळवळ, पुनरूज्जीवनाची चळवळ, फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती या घटनांनी समाजजीवन ढवळून निघाले. त्यामुळे कला, विद्या, साहित्य, ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय इ. क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आले. हे बदल व प्रगती अव्याहतपणे सुरू झाली. या घटनांचा प्रभाव फक्त युरोप पुरता मर्यादित न राहता सर्व जगावर पडला. यातून नवीन मूल्य व्यवस्था जन्माला आली. पाश्चात्य देशात स्त्रिया आपल्या हक्क अधिकारांसाठी झगडू लागल्या.

पुढे यातून स्त्री अभ्यासाची सुरूवात झाली. या अभ्यासातून स्त्रियांच्या दडपणुकीच्या कारणांचा शोध घेऊन स्त्री-पुरूष समानतेचा विचार गाभ्यापाशी ठेवून वेगवेगळ्या स्त्रीवादी विचारसरणींचा उदय झाला, त्या पुढील प्रमाणे -

**स्त्रीवादी विचारसणीचे प्रमुख प्रवाह :**

१. उदारमतवादी स्त्रीवाद (Liberal Feminism)

२. मार्क्सवादी स्त्रीवाद (Marxist Feminism)

३. जहालमतवादी स्त्रीवाद (Radical Feminism)

४. समाजवादी स्त्रीवाद (Socialist Feminism)

५. उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद (Post-Modernist Feminism)

हे स्त्रियांच्या दर्जासंदर्भात विविध विचार मांडणारे मुख्य स्त्रीवादी विचारप्रवाह आहेत. या प्रवाहातून स्त्रियांच्या समस्या त्यांच्यावर होणारे अत्याचार यांची जाणीव स्त्रियांसोबत समाजासही होऊ लागली. या जाणिवेतून स्त्रियांनी स्वत:च्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी तसेच स्वत:ला समाजामध्ये समानतेचे, मानाचे व सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी स्त्रियांचे प्रश्न समाजापूढे आणले. या वेगवेगळ्या स्त्रीवादी विचारप्रवाहांनी स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी आपापल्या विचारांना सैद्धांतिक बैठक निर्माण केली. या सैद्धांतिक

बैठकीचे मुलभूत तत्त्व म्हणजे मानवी हक्का होय. मानवी हक्क लक्षात घेऊन समाजवादी विचारसरणीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघितले. मार्क्सवादी उत्पादनाच्या साधनावर पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना मालकीहक्क असणे म्हणजेच सामाजिक न्याय मानतात. तर लिंगभेद दृष्टिकोनातून स्त्रीपुरूष संबंधाचा अभ्यास विसाव्या शतकाच्या सुरूवातीस करण्यास सुरूवात झाली. याचा परिणामही स्त्रीवादी सिद्धांतावर झाला.

### अ) उदारमतवादी स्त्रीवाद :

अठराव्या शतकात युरोपात उदारमतवादी स्त्रीवादाचा उदय झाला. या विचारधारेने प्रथमच स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहिले, तिच्या समाजातील स्थानाची चिकित्सा केली. जॉन स्टुअर्ट मिल याने 'दि सब्जेक्शन ऑफ विमेन' या ग्रंथातून उदारमतवादी दृष्टिकोन मांडला.

**उदारमतवादी स्त्रीवादाची वैशिष्ट्ये :**

१. स्त्रियांच्या हक्कांसाठी आग्रह धरणे.

२. स्त्रियांची निर्बंधनातून मुक्तता करणे.

३. स्त्रियांना पुरूषांएवढीच आपली भूमिका ठरवण्याचे स्वातंत्र्य उदारमतवाद देतो.

४. स्त्रियांना ज्ञानाचे क्षेत्र नाकारले होते तेव्हा स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणे या क्षेत्रात त्यांना वाव निर्माण करून देणे.

**उदारमतवादी स्त्रीवादाचे स्वरूप/तत्त्वज्ञान :**

उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा उदय अठराव्या शतकात युरोपमध्ये झाला. उदारमतवादी कायदेशीरदृष्ट्या स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्यावर भर देतात. त्याच बरोबर समाजामध्ये असणारी विषमता अवैध ठरवण्याचे कामही कायद्याने केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. स्त्रियांनी पुरूषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात सहभाग घ्यायचा तर त्यांच्या स्वत:च्या जननक्षमतेवर ताबा हवा आणि अपत्य संगोपणाची जबाबदारी घरामध्ये विभागली गेली पाहिजे. त्यांच्या मते स्त्रीस्वातंत्र्यासाठी संपूर्ण सामाजिक रचना बदलणे गरजेचे वाटत नाही तर समाजातील सर्व स्त्रिया एकाच वेळी मुक्त होतील, स्वतंत्र होतील असे त्यांना वाटत नाही. तर विविध थरातील (वर्गातील) स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या, प्रयत्न करणाऱ्या स्त्रिया व्यक्तीश: स्वत:ला स्वतंत्र करू शकतील. स्त्रीमुक्तीमध्येच पुरूषांच्या मुक्तीची बीजे आहेत असे उदारवादी मानतात. कारण स्त्रीमुक्तीमुळेच पुरूषांना जसे काही सवलतींना मुकावे लागेल तसेच अर्थोत्पादनाच्या व देशसंरक्षणाच्या एकाकी जबाबदारीतूनही त्यांना सुटका मिळेल.

थोडक्यात, उदारमतवादी स्त्रीवाद स्त्रियांसाठी कायदेशीर समान हक्क आणि समान संधीची मागणी करतो. स्त्रियांच्या मार्गातील शैक्षणिक आणि व्यावसायिक अडथळे दूर करण्यावर भर देतो. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे हक्क व अधिकार मिळवण्यासाठी समाजाची मुळ संरचना बदलणे त्यांना गरजेचे वाटत नाही तर स्त्रियांनी व्यक्तिश: स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावे तसे त्यांना वाटते. मात्र सुधारणावादी मोहिमेवर त्यांचा विश्‍वास होता. स्त्री-पुरूषांमध्ये कोणताही भेदभाव न मानता स्त्री-पुरूष समानतेची वागणूक मिळावी. त्यांना समाजात समान संधी प्राप्त व्हावी हा त्यांचा मुख्य उद्देश्य होता.

**उदारमतवादी स्त्रीवादी मांडणारे विचारवंत :**

उदारमतवादी स्त्रीवादामुळे स्त्रियांच्या शिक्षणाचा आग्रह धरला गेला. शिक्षणातून त्यांना हक्क व अधिकाराची जाणीव झाली. स्त्री-पुरूष समानता प्राप्त करण्यासाठी कायद्याची निर्मिती करण्यावर भर देण्याचा विचार त्यांनी मांडला. उदारमतवादी स्त्रीवादाची मांडणी करण्याच्या भूमिकेतून अनेक विचारवंतांनी प्रयत्न केले. त्यांतील प्रमुख विचारवंत खालीलप्रमाणे आहेत.

**मेरी वोल्स्टोनक्राफ्ट :**

हिने प्रथम इ.स. १७९२ मध्ये स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली 'A Vindication of the Rights of Women' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ ब्रिटनमधील स्त्रीवादाला चालना देणारा मानला जातो. या ग्रंथात तिने स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन केले व त्यांना समानतेची वागणूक मिळावी असे मत मांडले. स्त्रियांना समाजामध्ये मानाने जगण्याचा अधिकार आहे व स्त्री स्वतःच्या कर्तृत्त्वावर स्वतंत्र जीवन जगू शकते असे प्रतिपादन केले. तिने प्रसिद्ध तत्त्ववेत्ता रूसोच्या 'फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन' या ग्रंथात त्याने स्त्रियांना फक्त श्रृंगार, कला व काव्याबद्दल ज्ञान द्यावे असे मत व्यक्त केले होते. रूसोच्या या वक्तव्यावर मेरी क्राफ्ट हीने जोरदार टीका केली. यावर तिने आपले मत नोंदवले, ती म्हणते, स्त्रियांना सर्व गोष्टीचे शिक्षण द्यावे. त्यामुळे स्त्री ही समाजामध्ये स्वतंत्ररित्या स्वकर्तृत्त्वावर वावरू शकते व स्वतंत्र आयुष्य जगू शकते.

**जॉन स्टुअर्ट मिल :**

जॉन स्टुअर्ट मिल याने आपल्या 'The Subjection of Women' (स्त्रियांची पराधिनता) या ग्रंथातून उदारमतवादी दृष्टिकोन मांडला. त्याने स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा विचार अधिक धीटपणे आणि प्रखरतेने मांडला. त्याने या ग्रंथात इतिहासामध्ये घडविलेल्या स्त्रियांचे प्रत्यक्षातील स्थाना विषयासंबंधात तो म्हणतो, ''सद्यकालीन अस्तित्त्वात असणाऱ्या सामाजिक, संबंधांमध्ये दोन भिन्न लिंगीय व्यक्तींना नियमित करणारे जे तत्त्व आहे ज्यातून कायदेशीरपणे एकालिंगाचे दुसऱ्या लिंगासंदर्भात दुय्यमत्त्व स्विकारले जाते ते मुळातच चुकीचे आहे आणि आता मानवी जीवनाच्या सुधारणेमध्ये तोच एक मुख्य अडथळा

झाला आहे. हे तत्त्व दूर करून परिपूर्ण स्वातंत्र्याचे तत्त्व अंगिकारले गेले पाहिजे. कोणत्याही एका बाजूला सत्ता व सवलती न देता किंवा दुसऱ्या बाजूला अपंगत्व अथवा अक्षमता न लादता हे झाले पाहिजे'. त्याचा हा विचार त्याच्या काळाच्या दृष्टीने अत्यंत क्रांतीकारी होता. थोडक्यात, त्याने या ग्रंथातून स्त्री-पुरूषांमधील विषमतेचा उहापोह केला व ही विषमता स्त्रियांच्या दृष्टिकोनातून कशी हानीकारक ठरली हे त्याचे स्पष्टीकरण केले.

**बेटी फ्रिडेन :**

बेटी फ्रिडेन या अमेरिकेतील स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटनेचे (NOW) पायाभूत काम करणाऱ्या मध्यम वर्गीय स्त्रियांच्या संघटनेचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या अभ्यासक आणि कार्यकर्त्या आहेत. हिने १९७९ साली 'स्त्रियांचे गुढ' (The Feminine Mystique) हा ग्रंथ लिहिला. यात तिने स्त्रियांच्या समाजातील दुय्यम स्थानाविषयी मत नोंदविले. स्त्रियांना समाजाने दिलेल्या दुय्यम स्थानामुळे तिला आपले कर्तृत्त्व दाखवता येत नाही त्यामुळे ती स्वावलंबी बनू शकत नाही.

**उदारमतवादाच्या मर्यादा :**

पुरूषी मुल्ये हीच मानवतावादी मूल्ये म्हणून स्वीकरण्याची प्रवृत्ती आणि सामुदायिक सुखापेक्षा व्यक्तीगत सुखावर दिलेले अवास्तव महत्त्व यामुळे अलिप्ततावादी दृष्टिकोन स्त्रियांमध्ये निर्माण झाला. या तत्त्वज्ञानाने मानवी सुखाचा विकासाचा विचार करणारे राजकीय तत्त्वज्ञानातील मुलभूत प्रश्न आणि हे प्रश्न सोडवण्यासाठी कोणतेही उत्तर असत नाही असे राजकीय पलायनवाद मानतो.

**ब) मार्क्सवादी स्त्रीवाद :**

मार्क्सवादी स्त्रीवादाचा उदय युरोपमध्ये भांडवलशाहीच्या उदायनंतर अस्तित्त्वात आला. हा स्त्रीवाद मार्क्स व एंगल्स या दोघांच्या विचारांतून उदयास आला. ही विचारधारा मार्क्सप्रणित आहे.

**मार्क्सवादी स्त्रीवादाची पार्श्वभूमी :**

सुरूवातीला भांडवलशाहीची वाढ, प्युरीटन (धर्म सुधारणावादी चळवळ), विवेक आणि विज्ञान या अंगाने नवनव्या संकल्पनांचा उदय झाला. या नव्या परिवर्तनामुळे स्त्रिया आणि पुरूषांच्या नातेसंबंधांमध्येही अमुलाग्र परिवर्तन घडून आले. स्त्रियांचे कामाचे स्वरूप आणि समाजातील स्थान यामध्ये बदल घडू लागले होते. हे बदल एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या दर्जासंदर्भात अत्यंत निर्णायक आणि अपरिवर्तनीय अशा स्वरूपाचे होते.

औद्योगिक क्रांतिने तांत्रिक, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्र ढवळून निघाली. समाजाचे सर्वात महत्त्वाचा घटक असलेले कुटूंब प्रभावित झाले. मध्यम व उच्चवर्णीय स्त्रियांची आयुष्ये वेगवेगळ्या पद्धतीने प्रभावित झाली. मध्यमवर्गीय स्त्रीचा आत्मसन्मान आणि आर्थिक दृष्ट्या उपयोगी असण्याचे भान या काळात हिरावून घेतले गेले. कारण घरांमधील उत्पादन व्यवहार आता कारखान्यात स्थलांतरित झाला होता. या स्त्रिया आपणांस समाजामध्ये उपयुक्त असणाऱ्या हक्कांसाठी व शिक्षणासाठी लढा देत होत्या. तर गृहिणी म्हणून अरामशीर जीवन जगणारी उच्चभूस्त्री पुरूषप्रधानतेतून निर्माण झालेल्या स्त्रीच्या आदर्श रूपाचे प्रतिनिधित्व करत होती. कष्टकरी वर्गातील स्त्रियांची स्थिती दयनीय होती. अठराव्या शतकात अन्नधान्यासाठी झालेल्या दंगलीमध्ये या स्त्रिया मोठ्या समुहाने सामील झाल्या. कारण अन्न ही त्यांची व त्यांच्या कुटुंबाची गरज होती. या स्त्रियांच्या गरजेच्या चौकटीत पुरूषी वर्चस्वाचा विचार करण्यासाठी निवांत वेळ उपलब्ध नव्हता. तेव्हा कष्टकरी घरातील बाई आपल्या मर्यादित उपजीविकेच्या साधनांसह तिच्या भल्या मोठ्या चिंतासह, आपले मर्यादित अवलोकन घेऊन स्त्रिवाद्यांविषयी काही करूणा बाळगेल अशी शक्यता नव्हती. स्त्रीवादाचा झपाटा तिला समजणे कठीणच होते. या कष्टकरी स्त्रियांचा लढा होता तो नव्या पद्धतीच्या उद्योग आणि व्यापाराशी होता. अशा परिस्थितीत मार्क्सवादी स्त्रीवादाचा उदय झाला. एकोणिसाव्या सतकाच्या मध्यापासून १९२० पर्यंतच्या काळात प्रभावी उदारमतवादी परंपरेच्या बरोबरीने मार्क्सवाद नावाची स्वतंत्र सैद्धांतिक परंपरा अस्तित्त्वात आली.

१९६० नंतरच्या स्त्रियांच्या चळवळीमध्ये मार्क्सवादी विचार व्यवस्थेमध्ये स्त्रीवादाचे स्थान कोणते हा विषय वादविवादाचा ठरला आहे.

**मार्क्सवादी स्त्रीवादाचे वैशिष्ट्ये :**

दडपणूक आणि शोषण यांतून स्त्रियांची मुक्ती व्हावयाची तर ते मानवमुक्तीचा भाग म्हणूनच होणार आहे आणि हे सगळे व्हायचे तर सामाजिक क्रांतीला पर्याय नाही. यासाठी मार्क्सवाद्यांनी स्त्रियांचे कुटुंबातील व समाजातील स्थानाची चिकित्सा केली.

**मार्क्सवादी स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान :**

उत्पादन प्रक्रियेतील स्त्रियांच्या योगदानाची योग्य दखल प्रथम मार्क्सवाद्यांनी घेतली. स्त्रीमुक्तीशिवाय क्रांती होऊच शकत नाही. समाजासत्तावाद आणणे म्हणजे स्त्रियांना सर्व क्षेत्रात संपूर्णपणे समान अधिकार देणे. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग आणि स्त्रियांचे बंधविमोचन याबाबतचे कॉ. लेनिन यांनी १९२० साली लिहीले होते. 'सामाजिक उत्पादक श्रमात स्त्रियांना सहभागी करून घेणे, घरकामाच्या गुलामगिरीतून स्त्रियांना बाहेर काढणे हे मुख्य काम आहे. त्यांच्यामागे सतत लागलेल्या स्वयंपाकघर आणि बालसंगोपन या त्यांना बथ्थड बनवणाऱ्या कामातून आणि मानहानीकारक वातावणातून त्यांना मोकळे करा'.

सामुदायिक अर्थव्यवस्था निर्माण करून सामुहिक धनोत्पादनामध्ये स्त्रियांनी भाग घ्यायला पाहिजे त्यानंतर पुरूषांचे जे स्थान आहे तेच स्त्रियांना प्राप्त होईल असे मार्क्सवाद्यांना वाटते. वर्गीय समाजाचा पुरूषी वर्चस्व हा अविभाज्य भाग आहे. म्हणून स्त्रीमुक्तीवाद हा साम्यवादी समाज अस्तित्त्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढ्याचा एक भाग आहे. समाजसत्तावाद आणणे म्हणजे स्त्रियांना सर्व क्षेत्रात संपूर्णपणे समान अधिकार देणे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा स्त्रियांच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अगदी वेगळा आहे. कल्याणकारी उपाययोजनांनी स्त्रीमुक्ती होणार नाही तर त्यासाठी अमुलाग्र समाजपरिवर्तनच व्हावयास हवे अशी त्यांची भूमिका आहे. कम्युनिस्ट संघटित महिला चळवळीचे प्रवर्तक आहेत.

**मार्क्सवादी स्त्रीवादामध्ये कुटुंबाची केलेली चिकित्सा :**

मार्क्सवादी स्त्रीवादानुसार इतिहासाच्या अगदी सुरूवातीच्या टप्प्यांमध्ये समाजातील श्रमविभागणीची संरचना कुटुंब संस्थेने केली. स्त्रियांनी शेतीचा शोध लावल्यानंतर खाजगी संपत्तीची निर्मिती होऊ लागली. या खाजगी संपत्तीवर व उत्पादनाच्या साधनांवर पुरूषांचे वर्चस्व निर्माण झाले. यात स्त्रियांना व पुरूषांना मानवी इतिहासात विवाहसंस्था उदयास आल्यानंतर तीतूनच पुरूषाला कुटुंबामध्ये सर्वोच्च स्थान मिळाले आणि त्याच्या संपत्तीला वारस असणारी मुले त्याचीच असली पाहिजेत अशी अट निर्माण झाली. असे विवाह पत्नीच्या उघड किंवा छुप्या गुलामगिरीवर उभे असतात. त्यात पुरूषांना व स्त्रियांना दुहेरी नीतीमूल्य व्यवस्थेला तोंड द्यावे लागते. स्त्रीने शुद्ध, पवित्र असावे व पुरूषाला मात्र नीतिनियमांपासून मुक्तता असा दुट्टपीपणा सुरू झाला.

भांडवलशाहीच्या उदयाबरोबर स्त्रीचे आणखी अवमुल्यन झाले व अधिकाधिक होत गेले. स्त्रियांचे श्रम स्वस्थात मिळवून एकूण मजूरी कमी ठरली. ही भांडवलशाहीच्या लाभाची गोष्ट पुरूषी वर्चस्वातून साधली जाते. स्त्रिया घरात जे काम करतात त्याला मोल नसणे हे भांडवलशाहीच्या पथ्यावर पडले. सार्वजनिक उद्योगधंद्यात स्त्रियांना स्वतंत्रपणे समान पातळीवर सहभाग घेता आला पाहिजे असा आग्रह मार्क्सवादी विचार धरतो. यातून स्त्रियांना खरी मुक्ती मिळेल असे त्यांना वाटते.

समतावादी शासनाने बालसंगोपन, वृद्धांची देखभाल व कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम याची जबाबदारी उचलली पाहिजे, असा आग्रह असतो. ह्या विचाराने एक पतीपत्नी कुटुंबाचे उच्चाटन करावे असे मांडले नाहीतर, कुटुंब समाजाचे आर्थिक एकक म्हणून असू नये यावर त्यांचा भर दिसतो. स्वातंत्र्य म्हणजे केवळ विषम वागणूकीचा अभावच नाहीतर माणूसकीचा सर्वसमावेशक व्यवहार आहे. त्यांच्या मते समान संधी म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी स्पर्धा करण्यासाठी मिळविलेली समानता नाहीतर माणूसकीच्या गरजा भागविण्यासाठी सर्वांना समान सहभाग आवश्यक आहे.

या दृष्टिकोनानुसार मार्क्सवादींनी कुटुंबसंस्थेचे विश्लेषण करून वर्गीय समाजाचा पुरूषी वर्चस्व हा अविभाज्य भाग आहे असा विचार व्यक्त केला जातो. ऐतिहासिकदृष्ट्या खाजगी संपत्तीच्या उदयातच स्त्रियांच्या दडपणूकीची कारणे सापडतात. म्हणून त्यांच्या मते स्त्रीमुक्तीवाद हा साम्यवादी समाज अस्तित्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढ्याचाच एक भाग आहे.

**मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोन मांडणारे विचारवंत :**

**एंगल्स :**

एंगल्सने 'कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांचा उगम' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने स्त्रिया पुरूषांपेक्षा खालच्या दर्जाच्या असतात हा आरोप आणि त्यांचे दास्य या नैसर्गिक गोष्टी नाहीत. इतकेच नव्हे तर प्राचीन समाजात स्त्रियांचा दर्जा पुरूषांच्या बरोबरीचा होता. कुटुंबात व समाजात त्यांना मानाचे स्थान होते. त्यांचे हे प्रारंभीचे स्थान व स्वातंत्र्य कोणकोणत्या अव्यस्थांमधून नष्ट झाले व त्या पारतंत्र्यात गेल्या ह्याचे सखोल विवेचन केले. त्याने दाखवून दिले की, ह्या बदलाच्या मुळाशी उत्पादन साधनातील बदल आहेत. प्रसिद्ध अमेरिकन वंशशास्त्रज्ञ लेविस मॉर्गन याचा प्राचीन समाज या ग्रंथाचा आधार घेऊन सामाजिक संबंध व कुटुंब संस्था कशा निर्माण झाल्या हे एंगल्सने दाखवून दिले. एकपती-पत्नीत्वावर आधारित कुटुंबाचा पाया हा खाजगी मालमत्ता आणि स्त्रीदास्य ह्यावर आधारलेला आहे. मातृसत्ताक कुटुंब पद्धती नष्ट होवून पितृप्रधान कुटुंब व्यवस्था उदयास आली. या संदर्भात एंगल्स म्हणतो जगातील स्त्रियांचा हा ऐतिहासिक पराभव आहे. घरामध्ये पुरूषांचे स्वामित्त्व मिळवले आणि स्त्रिया खालच्या दर्जाला, दासीपदाला पोहचल्या. वर्गीय जुलमाचा प्रारंभ व पुरूषांनी स्त्रियांवर लादलेल्या दास्याचा प्रारंभ एकाच वेळी झाला.

त्याने समाजसत्ता स्थापन करण्याच्या कार्यामध्ये स्त्री-पुरूषांतील असमान संबंधाचा शेवट होवून त्यांच्यात समतेचे नवे संबंध कसे निर्माण होतात हेही दाखवून दिले.

**कार्ल मार्क्स :**

याने दास कॅपिटल हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने शास्त्रशुद्ध समाजवादाचा विचार मांडला. १८४८ मध्ये कामगारांचा जाहिरनामा प्रसिद्ध करून क्रांतीचे तत्त्वज्ञान व कार्यक्रम मांडला. आहेरे व नाहीरे वर्गातील संघर्षाचा इतिहास त्याने मांडला. जगाला समाजवादाचा विचार त्याने दिला. त्याच्या या विचारातच स्त्रीमुक्तीची विचारसरणी सामावली आहे. स्त्रिया व मुलांच्या अमानुष पिळवणूकीचे कठोर सत्य त्याने भांडवल या ग्रंथातून दाखवून दिले व पिळवणूकीची कारणे व परिणाम ही सांगितले. त्याने

स्त्रियांच्या दास्य विमोचनाचा आणि सामाजिक जीवनात सर्वक्षेत्रांत पुरूशांच्या बरोबरीचे स्थान त्यांना प्राप्त होण्याचा कम्युनिझम हाच मार्ग आहे असे सांगितले.

**मार्क्सवादी स्त्रीवादावरील टिका :**

मार्क्सवादावर टिका करताना ऑलिसन यावर म्हणतो, ''मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी वर्गीय शोषणाला महत्त्व देऊन लिंगभेदाकडे वर्गीय विषमतेचे प्रतीक म्हणून पाहिले. त्यामुळे लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाकडे कधीच महत्त्वाचा मुद्दा म्हणून पाहिले नाही. वंशसातत्य, स्त्रियांविरूद्ध अत्याचार यासंबंधित विषयाकडे मार्क्सवाद दुर्लक्ष करतो.

**समाजवादी स्त्रीवाद :**

समाजवादी विचार प्रवाहाने मार्क्सवादी सिद्धांत स्त्रीप्रश्नांचे विश्लेषण करताना अपूरा पडतो व समाजवादी क्रांतीनंतर स्त्रीमुक्ती आपोआप घडेल हे गृहीत धरतो असा आक्षेप मांडून उदारमतवाद व मार्क्सवाद यांचा संगम आपल्या मांडणीत करण्याचा प्रयत्न केला.

**समाजवादी स्त्रीवादाचे वैशिष्ट्ये :**

१. समाजवादी स्त्रीवाद लिंगभाव व वर्गवादामुळे स्त्रियांच्या शोषणाच्या व्यवस्था निर्माण होतात असे मानतो.

२. त्यासाठी समाजवादी स्त्रीवादाने कुटुंब व्यवस्थेत अमुलाग्र बदलाचा आग्रह धरला.

३. कुटुंबात मुला मुलीची जडणघडण एक माणूस म्हणून व्हावी.

**समाजवादी स्त्रीवादाचे स्वरूप/तत्त्वज्ञान :**

समाजवादी स्त्रीवादाचा जन्म मार्क्सवादी स्त्रीवादातून झाला मार्क्सवादामध्ये समाजवादी क्रांती झाल्यानंतर स्त्रीमुक्ती आपोआप होईल असे वाटत होते. मात्र असे झाले नाही. मार्क्सवादाने स्त्रियांच्या कुटुंबातील जडणघडण पुरूषसत्ताक व्यवस्थेमधून होते याकडे दुर्लक्ष केले. मार्क्सवादी स्त्रीवादाप्रमाणे वर्गवाद हा स्त्रियांच्या दुय्यम स्थितीस जबाबदार आहे असे समाजवादी स्त्रीवाद मानतो व त्या पुढे जावून लिंगभेद व वर्गवादामुळे स्त्रियांच्या शोषणाच्या व्यवस्था निर्माण होतात असे मानतो म्हणून समाजवादी स्त्रीवाद लिंगभेद व पुनरूत्पादन यावर प्रकाश टाकतो.

## समाजवादी स्त्रीवाद मांडणारे विचारवंत :

### ज्युलियट मिशेल

जुलिएट मिशेल ही समाजवादी स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखली जाते. तिचे १९७१ साली 'विमेन इस्टेट' (स्त्रियांची मालमत्ता) हे तिचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. तिचे दुसरे पुस्तक १९७४ साली सायकोअनालिसिस ॲण्ड फेमिनिझम (मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद) हे प्रकाशित झाले. ज्युलियटने जहाल स्त्रीवादातील काही महत्त्वाच्या संकल्पना व विचार आत्मसात करून त्यांना आपल्या उदारमतवादी मार्क्सवादाशी जोडण्याचा प्रयत्न केला. खाजगी संपत्तीचे उच्चाटन झाले व स्त्रिया सार्वजनिक जगतात, उद्योगांमध्ये सहभागी झाल्या की त्यांचे दुय्यमत्त्व संपत नाही तर त्यासाठी कुटुंबरचना आमुलाग्र बदलावी लागेल असे तिला वाटते. कुटुंबात मुलं मुली वाढताना दोघात असमानता निर्माण होते. त्यांच्यावर व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून संस्कार झाले पाहिजेत यावर त्यांनी भर दिला.

थोडक्यात, समाजवादी स्त्रिवाद्यांनी स्त्री पुरूष समानतेसाठी पितृसत्ताक व्यवस्था बदलली पाहिजे, यासाठी स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्वतंत्र चळवळी निर्माण झाल्या पाहिजेत व स्त्रियांनी भांडवलशाही व पुरूषप्रधानता या विरूद्ध एकाच वेळी आवाज उठवावा लागेल असे प्रतिपादन केले.

### जहाल स्त्रीवाद :

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात जहाल स्त्रीवाद पुढे आला. जहालवाद्यांनी उदारमतवाद व मार्क्सवादी विचारसरणीला आव्हान उभे केले.

### जहाल स्त्रीवादाची वैशिष्ट्ये :

१. स्त्रियांचा पुरूषाप्रमाणे लैंगिक स्वभाव असतो. हा स्वभाव निश्चित स्वरूपात बाईपणाच्या प्रवृत्ती व वागणुकीतून अभिव्यक्त होतो. या प्रस्थापित विचाराला जहालवादी स्त्रीवाद्यांनी विरोध केला व मानवी अस्तित्त्वाला लैंगिक स्वभाव अस्तित्त्वात असतो हे नाकारतो.

२. जहालवादी स्त्रीवाद स्त्रियांच्या या दडपणुकीला सर्वस्वी पुरूषच जबाबदार मानतात.

३. मानवी प्राण्यामध्ये सतत चालणारे पुनरूत्पादन हे स्त्रियांच्या शोषणाला जबाबदार आहे. तेव्हा या स्त्रीवादाने कृत्रिम पुनरूत्पादनाच्या वादविवादाला चालना दिली.

### जहालवादी स्त्रीवादाचे स्वरूप :

जहाल स्त्रीवाद स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची चिकित्सा करतो व सर्वस्वी या दुय्यम परिस्थितीस पुरूषवर्ग कसा जबाबदार आहे याची शहानिशा करतो. ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांचे शोषण हे सर्वात प्रथम

झाले. हे शोषण सर्वात जास्त व्याप्ती असणारे म्हणून त्याकडे आपणांस पाहता येईल. हे शोषण इतर शोषणाला चौकट पुरवते. अशा शोषणाला स्त्रिया बळी पडतात व स्वत: मात्र या शोषणाबद्दल अज्ञानी असतात. कारण पुरूषसत्ताक व्यवस्था स्त्रियांच्या मातृत्त्वासंबंधी काही मिथकांची निर्मिती करते या मिथकांमार्फत स्त्रियांचे जीवन बंदिस्त केले जाते. जहाल स्त्रीवादी या संदर्भात स्त्रियांच्या जाणिवा जागृती करतात. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही वंशसातत्यात स्त्री आणि पुरूषाने बजावलेल्या भूमिकेत आहेत असे मानतात. हे शोषण शारीरिक/जैविक क्रांतीनेच संपूष्टात येईल असे मानतात. थोडक्यात, स्त्रियांनी मातृत्त्वाची जबाबदारी नाकारणे असा अर्थ काढता येईल. किंवा कृत्रिम पुनरूत्पादनाच्या विचाराला या स्त्रीवादाने चालना दिली.

**जहालवादी स्त्रीवाद मांडणारे विचारवंत :**

**१) शुलामिथ फायरस्टोन :**

शुलामिथ फायरस्टोन हिने १९७३ मध्ये 'द डायलेक्टिक ऑफ सेक्स' (लैंगिक व्यवहाराची द्वंद्वात्मकता) हे पुस्तक लिहीले. यात तिने मांडले की, समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा नसून तो लिंगामधील (स्त्री व पुलिंग) संघर्षाचा आहे. समाजातील मुलभूत वर्गीय विभाजन सांगताना ती म्हणते, 'आर्थिक वर्ग हे दुय्यम आहेत पुरूषपणा आणि बायकीपणा या समजुतीतून बाहेर पडायला हवे, तिच्या मते मूलभूत वर्गीय विभाजन आणि दडपणूक ही लैंगिकतेच्या आधारे केली जाते. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही स्त्री आणि पुरूष यांनी वंशसातत्यात बजावलेल्या भूमिकांमध्ये आहे परंतु या विवेचनाचा शेवट स्त्रियांचे शोषण या शारीरिक/जैविक क्रांतीनंतरच संपुष्टात येईल.

**मातृत्त्व :**

पुरूषप्रधान समाजात वंश व वारसा चालविण्यासाठी मूल हवे असते. त्यासाठी हा समाज तीन प्रकारची मिथके तयार करतो. त्यात प्रत्येक स्त्रीस आपत्य हवे आहे. प्रत्येक स्त्रीस मातृत्त्वाचा उमाळा उपजत असतो व प्रत्येक अपत्याला आईची गरज असते. अशा मिथकामुळे स्त्रिया मातृत्त्वाच्या बंधनात स्वत:ला अडकवून ठेवतात. असे जहाल स्त्रीवाद्यांना वाटते.

**लैंगिकता व राजकारण :**

पुरूषप्रधान व्यवस्थेमधून आलेल्या या मिथकामुळे स्त्रियांचे सत्त्व व वर्तन नियंत्रित राहते. स्वत:च्या इच्छा व गरजा ओळखून त्यांना स्वत:चा विकास करता येत नाही. स्त्री-पुरूष संबंध समान पातळीवर

आले तरच स्त्रियांना राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता प्राप्त करता येईल. यासाठी स्त्रियांनी त्यांचे भावनिक, खाजगी व सामाजिक जीवनाचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी त्यांचे कुटुंबाशी असणारे, कामाच्या ठिकाणी असणारे संबंध तपासण्यासाठी जाणीव-जागृतीची संकल्पना जहाल स्त्रीवाद स्वीकारतो व जे जे खाजगी ते ते राजकीय अशी घोषणा करतो. याचा साधा अर्थ असा की, स्त्रियांच्या खाजगी बाबी सार्वजनिक जीवनाशी निगडीत असतात. या खाजगीचे राजकीयीकरण करण्यात जाणीव जागृती ही मध्यवर्ती प्रक्रिया होती. या प्रक्रियेमुळे स्त्रियांना कौटुंबिक जीवनाशी निगडीत असणाऱ्या स्वत:च्या ओळखीपलिकडे जावून स्वत:ची स्वतंत्र ओळख शोधण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाला बळ मिळेल.

### २) केट मिलेट :

केट मिलेट हिने सेक्शुअल पॉलिटिक्स Sexual Politics (लैंगिकतेचे राजकारण) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात तिने सामाजिक आणि खाजगी जीवनातील पुरूषी वर्चस्वाची रचना स्पष्ट केली आहे. ती लिहिते, ''जेव्हा एक गट दुसऱ्यावरती सत्ता गाजवतो तेव्हा या दोहोंमधील नाते राजकीय होते. अन्य दडपलेल्या गटाप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षण, प्रतिनिधित्त्व प्रतिष्ठेची प्रतिमा आणि आत्मसन्मान तसेच समानतेचा दर्जा आणि माणूस म्हणून ओळखले जाणे हे सर्व सातत्याने नाकारले जाते. तिच्या मते पुरूषाचे स्त्रियांवर असणारे लैंगिक वर्चस्व हे पाश्चात्य समाजातील पुरूषी वर्चस्वाचे कारण आहे. ही पुरूषीव्यवस्था टिकविण्यासाठी संस्कार करण्याची जबाबदारीही तिच्यावरच येते. महत्त्वाचे म्हणजे पितृनिश्चितीखेरीज मुलांना जगण्याचा अधिकार नाकारला जातो. तसेच कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय स्तरांवर पुरूषांव्यतीरिक्त स्थान नसते.

### ३) जर्मेन ग्रिअर :

जर्मेन ग्रिअर हिने 'द विमेन युनक' या पुस्तकात स्त्रियांची लैंगिकता खऱ्या अर्थाने कशी नाकारली गेली आहे याचे विवेचन केले आहे. ती म्हणते छोट्या विभक्त कुटुंबात स्त्रियांची कोंडी व दडपणूक होते आणि ती एकाकी होवून खोट्या स्त्रीत्त्वाच्या ओझ्याखाली चेंगरून जाते. म्हणून तिने विभक्त कुटुंबाऐवजी सामुहिक कुटुंबाची कल्पना मांडली. यासाठी जहालवादी स्त्रीवाद्यांनी लैंगिक क्रांतीची मागणी केली.

१. अशी क्रांती झाली तर स्त्रिया मातृत्त्वाच्या जबाबदारीतून मोकळ्या होवून अपत्यसंगोपणाचे काम सामुदायिकरित्या समाजामार्फत होईल.

२. संपत्तीची समान वाटणी झाल्याने स्त्रियांच्या व मुलांच्या आत्मअविष्काराला व व्यापक समाजबांधणीला पूर्ण वाव मिळेल.

३. लैंगिक व्यवहार साचेबंदपणातून मुक्त होईल यासाठी पितृप्रधान व्यवस्था उलथवून टाकली पाहिजे व स्त्रियांनी सबला म्हणून स्वतंत्रपणे स्वत:ची जडण घडण केली पाहिजे.

४. स्त्रियांचे शोषण समजावून घेण्यासाठी स्त्रियांच्या खाजगी व भावनिक जीवनाचे पुनर्मूल्यांकन केले असता जे जे खाजगी ते ते राजकीय अशी घोषणा केली.

**जहाल स्त्रीवादावरील टिका :**

जहाल स्त्रीवाद हा अनैतिक आहे. स्त्रिया ह्या पुरूषांपेक्षा श्रेष्ठ आहेत हे गृहीत धरूनच जहाल स्त्रीवाद्यांनी आपल्या सिद्धांताची रचना केली व त्यास अनुसरून स्त्री-पुरूष ऊेद स्पष्ट केला. जहाल स्त्रीवाद एकांगी विचार मांडणारा आहे. पुरूषांना हा विचार दुय्यम ठरवितो, अशी टिका या विचार प्रवाहावर होते.

अजिजाह अल-हिब्री (Azizahal-Hibri) फायरस्टोनवर टिका करताना म्हणतात ''ज्यामुळे पुरूष स्त्रियांवर अवलंबून आहेत असा घटक म्हणजे स्त्रियांची वंशसातत्याची भूमिका होय. ती भूमिका सोडून देण्याचे तोटे फायरस्टोन यांनी लक्षात घेतले नाही.

**उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद :**

१९७९ च्या दशकात उत्तर आधुनिकतावाद ही संज्ञा प्रचारात आली. ही संकल्पना आंतरशाखीय वादग्रस्त व गुंतागुंतीची आहे, ती आधुनिकतावादाविरूद्धची भक्कम प्रतिक्रिया आहे. याचे वैशिष्ट्ये म्हणजे प्रस्थापित परंपरांना व प्रस्थापित आधुनिक जीवन मार्गाला या कल्पनेने आव्हान दिले. उत्तर आधुनिकता वादात वंश, वर्ग, लिंग, राष्ट्रीयत्व व भिन्न वंशीयता इत्यादींचा समावेश होतो. इतिहास या ज्ञान शाखेच्या संदर्भात ही संज्ञा सत्ताहिनता, लिहिलेले न लिहिलेले असे अनेक विषय उत्तर आधुनिकतावादाचे चिंतनाचे विषय आहेत. इथेच इतिहासातील स्त्रियांचे विषय मुद्दामच दुर्लक्षिले गेले आहेत का ? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांना वाटते.

या संकल्पनेतूनच 'काळ्यांमध्येही सौंदर्य आहे' (Black is Beautiful) ही कल्पना पुढे आली व काळ्या स्त्रीवादाचा जन्म झाला. त्यांनी गोऱ्या स्त्रीवादाच्या सत्तेमध्ये हस्तक्षेप केला व असा आरोप केला की, प्रस्थापित स्त्रीवादी चळवळीने विकसित केलेले पद्धतीशास्त्र ही गोऱ्या व मध्यमवर्गीय स्त्रियांच्या अनुभवावर अवलंबून आहे. यात काळ्या स्त्रियांच्या संदर्भात विचार केलेला नाही. परिणामस्वरूप काळ्या स्त्रियांनी स्वत:संदर्भात विचार करू लागल्या. त्यांच्यात जाणीव जागृती झाली. त्यातून त्यांना गोऱ्या स्त्रीवादाच्या अधिसत्तेमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी उपयुक्त विषय त्यांना मिळाले. सन १९७४ मध्ये ब्रिटनमध्ये

काळ्या स्त्रियांचा गट स्थापन झाला. यामध्ये अमेरिका व ब्रिटनमधील स्त्रियांनी वांशिकतेच्या आणि लिंगभेदाच्या मुद्यांवर एकत्र आहे पाहिजे यावर भर दिला. यातूनच काळ्या स्त्रियांची मुक्ती होईल अशी आशा निर्माण झाली.

**उत्तर आधुनिकवादाची वैशिष्ट्ये :**

१. आधुनिक जीवनमार्गाला व प्रस्थापित परंपरांना या कल्पनेने आव्हान दिले.

२. आधुनिकवादात बुद्धीचे महत्त्व, सुनियंत्रितपणा, आधुनिक नैतिकता, कायदा सुव्यवस्था आहे या आधुनिक व्यवस्थेतून निर्माण झालेली जीवन शैली, व्यवस्था ही पूर्णत: सत्य आहे. याला आव्हान उत्तर आधुनिकवाद देतो व तुम्ही सत्य मानता ते योग्य कसे असा प्रश्न करतो.

३. इतिहासामध्ये प्रस्थापितांच्या इतिहासाला आव्हान देऊनवंचिताकडे इतिहासलेखन सरकते. स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या संदर्भात काळ्या स्त्रियांच्या व दलित स्त्रियांच्या वंचिततेचा प्रश्न घेऊन प्रस्थापित स्त्रीवादाला आव्हान दिले गेले.

**उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी इतिहासलेखक :**

मिशेल फुकोच्या (Michel Foucault) थेरीने प्रभावित होवून डेल्युझे (Deleuze) आणि इरिगॅरे (Luce Irigaray) या उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी शरीव व लिंगभावाची व्यक्तिनिष्ठता यावर आपली लेखन पद्धती तयार केली. इरिगॅरे ह्यांनी पुरूषसत्ताक संस्कृती व स्त्रियांचा पुरुषांपेक्षा 'इतर' म्हणून झालेल्या उल्लेखावर आपल्या सिद्धांताची उभारणी केली. त्यानंतर ग्रोस यांनी स्त्री शरीराच्या भौतिकवादी उपयोगावर भर दिला. बटलर यांनी मिशेल फुको यांच्या मानसशास्त्रीय विश्लेषणाचा आधार घेऊन स्त्री शरीराचा भौतिकवादी सिद्धांत मांडला. त्यानंतर गॅलॉप यांनी शरीर व संस्कृती या दोन्ही दृष्टीने स्त्रियांच्या केलेल्या विरोधाला आव्हान दिले व स्त्रियांनी पुरूषसत्ताक पद्धतीला केलेल्या विरोधाबद्दल मत मांडले.

थोडक्यात, उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी परंपरागत पुरूषसत्ताक पद्धतीचा सत्तासाधनाला म्हणजे धर्मशास्त्र व निसर्ग यांना विरोध केला. फुकोच्या विचारसरणीचा धागा पकडून त्या म्हणतात, 'सत्ता व ज्ञान एकमेकांच्या हातात हात घालून जाते. ते एकांगी व अपूर्ण असते. त्यामुळे काहींचेच हीतसंबंध जोपासले जातात. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचे मुल्यमापन हे अशा सत्याच्या संदर्भात न होता जगावर झालेल्या परिणामाच्या संदर्भात व्हावे. फक्त काळ्यांच्याच नव्हे तर अन्य वंशाच्या, जमातींच्या स्त्रियांच्या विशिष्ट गरजा व अडचणी यांच्या संदर्भाने पुढील काळात स्त्रीवादी इतिहासलेखन पुढे सरकत आहे.

हे स्त्रियांच्या दर्जासंदर्भात विविध विचार मांडणारे मुख्य स्त्रीवादी विचारप्रवाह आहेत. या प्रवाहातून स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार यांची जाणीव स्त्रियांसोबत समाजासही होऊ लागली. या जाणिवेतून स्त्रियांनी स्वत:च्या हक्कांसाठी व अधिकारांसाठी तसेच स्वत:ला समाजामध्ये समानतेचे, मानाचे व सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी स्त्रियांचे प्रश्न समाजापुढे आणले. या वेगवेगळ्या स्त्रीवादी विचारप्रवाहांनी स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी आपापल्या विचारांना सैद्धांतिक बैठक निर्माण केली. या सैद्धांतिक बैठकीचे मुलभूत तत्त्व म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क लक्षात घेऊन समाजवादी विचारसरणीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघितले. मार्क्सवादी उत्पादनाच्या साधनांवर पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना मालकीहक्क असणे म्हणजेच सामाजिक न्याय मानतात. तर लिंगभेद दृष्टिकोनातून स्त्रीपुरूष संबंधाचा अभ्यास विसाव्या शतकाच्या सुरूवातीस करण्यास सुरूवात झाली. याचा परिणामही स्त्रीवादी सिद्धांतावर झाला.

**स्त्रीवादीइतिहास लेखन :**

स्त्रीवादी इतिहास लेखनाचा प्रवाह विविध टप्यातून पुढे मार्गक्रमण करीत आहे. जसा स्त्रीवादी सिद्धांकनाचा विकास होत आहे तसे स्त्रियांच्या इतिहासासंबंधी नवे आकलन आपणा समोर येत आहे. म्हणून आपणांस स्त्रीवादी सिद्धांकनाची ओळख असणे ही स्त्रीवादी इतिहासलेखनाची पूर्व अट आहे. त्याशिवाय आपण माहितीचे विश्लेषण करू शकणार नाही. इतिहास लेखनाची साधने व लिखित इतिहास त्याचा अभ्यास स्त्रीवादी दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. ही दृष्टी कशी असावी या संदर्भात गार्डा लर्नर लिखित 'द क्रियेशन ऑफ पेट्रीआर्की' हा खंड आहे. हा १९८६ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाने प्रकाशित केला. यात आपल्या २५ वर्षाच्या संशोधन, लेखन व अध्यापनाचा दीर्घ अनुभवांवर लेखिका या ठाम निष्कर्षावर येते की, स्त्रियांचा इतिहास शोधणे व मांडणे ही स्त्रीमुक्ती साध्य करण्यासाठी अपरिहार्य अशी बाब आहे. स्त्रियांचा इतिहास लिहीत असताना यात प्रामुख्याने पितृसत्तेची विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थामधील तिचे स्वरूप व तेच स्वरूप नव्याने पुनर्स्थापन कसे केले जाते याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने परंपरा व आधुनिकता या दोन्ही संकल्पना पुरूषप्रधान विचारधारा धारण करतात. आधुनिकतेचा अर्थ फक्त परंपरेचे वरवरचे स्वरूप बदलते. त्यातील पुरूषप्रधानतेचे मुल्य मात्र कायम राहते. यातील गुंतागुंत जाणून घेणे हे स्त्रीवादी इतिहासकारांसाठी पूर्वअट आहे. पितृसत्ता ज्या परंपरांचे वहन करते त्याची चिकित्सा करण्याचे धारिष्ट्य ही स्त्रीवादी इतिहासकारांकडे असावयास पाहिजे. अशा पद्धतीने लिहीलेला स्त्रियांचा इतिहास हा मानवसंस्कृतीस शोषणाच्या पलीकडे घेऊन जाणारा मानवजातीच्या प्रगतीचा असणार आहे. स्त्रियांना वगळून मानवाचा इतिहास पूर्ण होऊ शकणार नाही.

स्त्रीवाद, स्त्रीवादी इतिहासलेखन या संकल्पनांचा उदय पाश्चात्य देशातून झाला आहे. म्हणून स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या संकल्पना, त्यात आलेले वेगवेगळे विचारप्रवाह याचा अभ्यास जागतिक स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या चौकटीत करावा लागतो. आपणांस भारतीय समाज आणि संस्कृतीच्या परिपेक्षात हा विषय जुळवून घ्यावा लागतो. स्त्रीवादाच्या विकासानंतर बऱ्याच काळानंतर स्त्रीवादी इतिहास लेखनाविषयी बोलले, लिहीले जाऊ लागले. भारताच्या संदर्भात स्त्रीवादी इतिहासलेखनाविषयी अलिकडच्या काळात लिहीले व बोलले जावू लागले. १९७० च्या दशकात स्त्री चळवळीने आणि त्यातून प्रेरणा घेऊन त्यानंतर सुरू झालेल्या स्त्री अभ्यासाने इतिहासाच्या ज्ञान शाखेचे स्वरूप बदलून टाकले. स्त्रीवाद्यांचे स्त्रीबद्दलचे आकलन जसे बदलत गेले तसे स्त्रीवादी इतिहास लेखनाचे स्वरूपही बदलत गेले. या स्वरूपानुसार स्त्रीवादी इतिहास लेखन विविध टप्यामधून प्रवाहित झाले आहे. उदाहरणार्थ, उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न महत्त्वाचा मानला, मार्क्सवाद्यांनी उत्पादन आणि पुनरूत्पादन यातील फरक पुढे आणला आणि मार्क्सवादाचे नवे अकलन विकसित केले. जहाल स्त्रीवाद्यांनी जे जे खाजगी ते ते राजकीय असे स्पष्ट करून खाजगी आणि सार्वजनिक यांच्यातील अंतरसंबंधावर प्रकाश टाकला. भारतीय संदर्भात स्त्रीवादाचा विचार करता पाश्चात्य स्त्रीवादी सिद्धांकन बाजूला सारून भारतीय समाजव्यवस्थेचा, परंपरांचा शोध घेऊन चातुर्वर्ण्य व जातीव्यवस्था या तोटीक्रमातून स्त्रियांचा इतिहास लिहिला जाऊ शकतो व भारतीय दृष्टिकोनातून स्त्रीवादी सिद्धांकन निर्माण होवून स्त्रीवादी इतिहास लेखनाला नवी दृष्टी प्राप्त होऊ शकते.

**व्याख्या (Definition) :**

स्त्रीवादी इतिहास लेखन म्हणजे केवळ स्त्रियांबद्दल लेखन करणे नव्हे, स्त्री आणि पुरूष या दोहोंचाही इतिहास सामाजिक सत्तेच्या संदर्भात पाहणे स्त्रीवादी इतिहास लेखनामध्ये अपेक्षित आहे. स्त्रीवादी इतिहास लेखनामध्ये स्त्रियांच्या इतिहासातील स्थानाची पुर्नव्याख्या करावी लागणार आहे. तसेच, स्त्रियांचा स्त्री म्हणून असणाऱ्या अनुभवांना त्याच्या सार्वजनिक आणि राजकीय कृतींना सामाऊन घेत इतिहास लेखनाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे. त्यासाठी प्रत्येक कालखंडातील स्त्रियांच्या संरचनात्मक दुय्यमत्त्वाला भिन्न भिन्न तऱ्हेने अधोरेखित करणे व त्यासाठी स्त्रियांचे सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भ शोधणे. म्हणजे स्त्रीवादी इतिहास लेखन म्हणता येईल. या संदर्भात गाठाळ एस.एस. म्हणतात की, एकांगी पद्धतीने लिहिलेले इतिहास ग्रंथ समाज मनाची पकड घेत नाहीत. म्हणून समाजाच्या स्त्री विषयक विशिष्ट धारणा त्यामागील हेतू याची पूर्व मांडणी करून स्त्रियांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेऊ पाहणाऱ्या चक्रातून सोडवणे हेच स्त्रीवादी इतिहास लेखनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**व्याप्ती (Scope) :**

भारतातील इतिहासलेखनातील स्त्रियांची बेदखल नष्ट करणे. स्त्रियांवरील अत्याचार, स्त्रियांचे शोषण यांचा इतिहास मांडणे, स्त्रियांच्या कर्तबगारीला अधोरेखित करणे आणि लिंगभावात्मक जडणघडणीतून इतिहासाची जाणीव आकाराला आणणे हे स्त्रीवादी इतिहास लेखनाची उद्दिष्टे सांगता येतील. 'रिकास्टिंग वुमेन' या संपादित केलेल्या ग्रंथात कुमकुम संगारी आणि सुदेश वैद्य यांनी स्त्रीवादी इतिहास लेखन सांस्कृतिक इतिहासाकडे कसे सरकले आहे याचे स्पष्टीकरण दिले.

**पद्धती (Method) :**

स्त्रीवादी इतिहास लेखन करताना पद्धतीशास्त्रात अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. इतिहासाला सहाय्यकारी असणाऱ्या ज्ञान शाखांच्या विकासाबरोबर नवनव्या संशोधन प्रक्रिया प्रचलित होत आहेत. नवे पुरावे उपलब्ध होत आहेत. याचा उपयोग स्त्रीवादी इतिहासलेखन करताना महत्त्वाचा ठरणार आहे. या शाखांमधून स्त्रियांच्या अभ्यासाला सुरूवात झाली आहे. यामुळे स्त्रियांचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास शक्य झाला आहे. म्हणून स्त्रियांचा अभ्यास करताना बहुआयामी पद्धतीचा उपयोग करावा लागेल. कारण स्त्रियांचा अभ्यास हा अनेक शाखा करतात.

**साधने (Sources) :**

संशोधकाला प्राथमिक साधनांमधून स्त्रियांविषयीची माहिती अतिशय त्रोटक उपलूब्ध होते. कारण इतिहास ज्या गोष्टींची चर्चा करतो त्या गोष्टींपासून (हुद्याच्या व मानाच्या/अधिकाराच्या जागेपासून) स्त्रिया दूर होत्या. तर इतिहास या सर्व अधिकाराच्या मानाच्या जागांची/व्यक्तींची त्यांच्या कर्तृत्त्वाची महती गातो. इतिहासात अशा अधिकाराच्या जागेवर स्त्रिया क्वचित दिसतात. त्याचे कारण ही त्यांच्या पुरूष जोडीदार त्यांच्या सोबत नसतो. त्याचा मृत्यू झालेला असतो किंवा काही कारणास्तव तो त्या पदाला न्याय देऊ शकत नाही. त्या वेळी अशा स्त्रियांनी पुरूषप्रधान संस्कृतीला डावलून घराण्याच्या गरजेपोटी पुरूषांसारखे कार्यकर्तृत्त्व करून दाखविले. हा इतिहासाचा वर्ण्यविषय आहे म्हणून इतिहासात अशा स्त्रियांच्या नोंदी मिळतात. पण त्या बरोबरच स्त्रियांच्या इतिहासाचे विषयही वेगळे असणार आहेत हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्याच्या जीवन संग्रामाची विविधांगी चित्रण इतिहासाचा विषय होऊ शकतो. पण या जीवन संग्रामाचा इतिहास लिहायचा तर इतिहासाच्या संदर्भ साधनाच्या व्याख्येत बसणारी संदर्भ साधने उपलब्ध नाहीत अशावेळी मौखिक साधनाचा आधार घ्यावा लागतो. स्त्रियांची जगण्याची कर्तृत्त्वाची क्षेत्रे ही वेगळी आहेत. त्याचा संबंध सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राशी जास्त आहे म्हणून या क्षेत्राचा अभ्यास स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासने व त्याचे पुनर्लेखन करणे गरजेचे आहे.

स्त्रियांच्या कार्यकर्तृत्त्वाच्या इतिहासाची नोंद घेण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक साधनांचा अभ्यास झाला नाही. समाजाने तिच्यावर घातलेल्या बंधनाचा तिच्या कार्यकर्तृत्त्वावर झालेला परिणाम या दृष्टीनेही ऐतिहासिक साधनाचे परिक्षण होणे गरजेचे आहे. पुरूषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या ऐतिहासिक साधनातून स्त्रिया अदृष्य आहेत पण जे काही त्रोटक संदर्भ या साधनांमधून येतात त्याचा अभ्यास लिंगभेदात्मक दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. ही सर्व साधने उपयोगात आणता येतील अशी नाहीत पण जरूर तेथे व जरूर तेवढ्याच साधनाचा उपयोग शक्य होणार आहे. साधनांची चिकित्सा करताना स्त्रीवादी दृष्टिकोनाचा अभ्यास मात्र इतिहास संशोधकाला गरजेचा आहे. थोडक्यात, उपलब्ध साधनांची स्त्रीवादी सिद्धांकनानुसार चिकित्सा व नवीन साधनाची निर्मिती करावी लागणार आहे. या कामी विविध ज्ञान शाखांच्या अभ्यासाची साधने संदर्भ साधने म्हणून उपयोगात आणता येतील.

**मौखिक साधने :**

स्त्रियांचा इतिहास लिहिण्यासाठी मौखिक साधनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. समाजात लोकवाङ्मयाचा किंवा मौखिक वाङ्मयाचा प्रवाह असतो. त्यातून समाजाचे सामुहिक जीवन आणि मानस प्रकट होतो. परंपरेने चालत आलेले मौखिक वाङ्मय समाजजीवनाचे अभिन्न अंग असते. ती समाजाची समाजाची स्पंदने असतात. त्यातून समाजाच्या जीवन रितीचे आणि जीवन दृष्टीचे दर्शन घडते. त्याच्या धारणा लक्षात येतात. भारतीय समाजाच्या धारणा प्रतिकांमधून व्यक्त होतात. स्त्रियांच्या जीवनात प्रतिकाला अनन्य महत्त्व आहे. या प्रतिकांचा अभ्यास स्त्रियांचा इतिहास लिहिताना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्त्रियांचे भावजीवनाशी या प्रतिकांचा जवळचा संबंध आहे. सत्यवान सावित्रीच्या कथेचे प्रतीक असेल किंवा वटसावित्री पौर्णिमेची परंपरा असेल अशी प्रतीके तिच्या जीवनाच्या कक्षा निश्चित करत होती. या प्रकारची सर्व माहिती मौखिक परंपरेतून उपब्ध होऊ शकते. या परंपरेचा अर्थ मात्र स्त्रीवादी सिद्धांकनाने लावावा लागणार आहे.

स्त्रियांचे विश्व वेगळे आहे. त्यांची जीवन जगण्याची क्षेत्रे वेगळी आहेत. त्याचे जीवन जगण्याचे स्वत्व निराळे आहे मूल्य निराळी आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास करून स्त्रियांच्या इतिहासाचा शोध घेत असताना स्त्रियांच्या इतिहास लेखनाला खालील क्षेत्रे सहाय्यभूत होऊ शकतात.

१. त्यांचे कौटूंबीक जीवन (घरगुत्ती जीवन).

२. त्यांच्यावरील अन्याय अत्याचार, त्यांचे प्रश्न.

३. त्यांचे धार्मिक/सांस्कृतिक जीवन प्रथापरंपरा/त्यांच्या धारणा.

४. त्यांचे राजकीय जीवन.

५. स्त्रियांचे कुटुंब व्यवसाय व धार्मिक जीवन यांचा समाजाशी असलेला संबंध.

६. त्यांचा गोतावळा.

७. कायदे व रूढीगत दर्जा यांच्यातील दरी.

८. त्या व्यतीत करीत असलेला फुरसतीचा वेळ.

९. लिंग भेद व स्त्रियांची जडणघडण.

वरील सर्व क्षेत्रे स्त्रियांच्या इतिहास लिहिण्यास सहाय्यभूत होऊ शकतात.

**स्त्रियांच्या इतिहास लेखनाची भारतीय परंपरा :**

भारतामध्ये शास्त्रशुद्ध इतिहासलेखनाची परंपरा १८ व्या शतकात इंग्रजांच्या काळात सुरू झाली. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतीय समाज चालीरिती, परंपरा, धर्म संस्कृती जाणून घेण्यासाठी भारताचा इतिहास लिहिण्याचे प्रकल्प हाती घेतले. स्वातंत्र्य पूर्व काळात वहासतवादी इतिहासकारांनी ब्रिटिशांच्या वसाहतवादी, साम्राज्यवादी धोरणाला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. या वसाहतवादी इतिहासकारांनी भारतातील स्त्रियांचे दयनीय स्थान अधोरेखित केले त्यांनी भारतीय स्त्रियांच्या दयनीय स्थितीची तुलना तत्कालीन ब्रिटीश स्त्रियांच्या उच्च सामाजिक दर्जाशी करण्यात आली. या साम्राज्यवादी इतिहासलेखनाला प्रत्युत्तर देत राष्ट्रवादी इतिहासलेखकांनी आर्य स्त्रीची प्रतिमा पुढे करून प्राचीन हिंदू संस्कृतीत स्त्रियांचा उच्च दर्जा होता हे सिद्ध केले. पण जातीत विभागलेल्या सामान्य स्त्रियांविषयी मौन राखले. आळतेकरांच्या लिखाणात स्त्रियांच्या कुटुंबातील स्थानाला महत्त्व देण्यात आले. वैदिक कालातील स्त्रियांच्या सुवर्णयुगाचे वर्णन ते भरभरून करतात. आणि या सुवर्ण युगाचा अंत आर्य पुरूष व आनार्य स्त्रिया एकत्र आल्याने या युगाचा अंत झाला असा दावा करतात. थोडक्यात, हिंदू ब्राम्हणी मध्यमवर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती असे समिकरण मांडण्यात आले. या संदर्भात उमा चक्रवर्ती 'Whatever happened to the Vedic Dasi' या निबंधात लिहितात, 'पौरात्यवादी व राष्ट्रवादी इतिहासलेखक आर्य स्त्रीच्या प्रतिमेला उंचावून वैदिक दासीला इतिहासलेखनातून पुसून टाकतात.'

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील इतिहास लेखनातही स्त्रियांच्या इतिहास लेखनाला दुर्लक्षित करण्यात आले. सन १९५० ते ६० च्या दशकामध्ये डाव्या विचारसरणीच्या इतिहासकारांनी इतिहास मांडताना भौतिकवादी विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आला. पण या प्रकारच्या इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नांवर भर दिला गेला. या प्रकारच्या इतिहास लेखनाच्या सैद्धांतिक चौकटीत लिंगभावा संदर्भात मांडणी होणे स्वाभाविक होते. पण कोसंबी व रोमिला थापर यांच्या लेखनातही ही चौकट दिसत

नाही. या प्रकारात जाती व्यवस्था व पुरूषप्रधान व्यवस्थेचा भौतिक पायाकडे दुर्लक्ष झाले असे म्हणावे लागेल.

'रिकास्टिंग विमेन : एसेस इन कोलोनियल हिस्ट्री' या कुमकुम संगारी आणि सुदेश वैद यांनी संपादित केलेल्या ग्रंथात पार्थ चटर्जी यांनी राष्ट्रवाद व लिंगभावाची जडणघडण यावर प्रकाश टाकला. एकोणिसाव्या शतकाच्या केंद्रस्थानी असलेला स्त्रीप्रश्न विसाव्या शतकाच्या सुरूवातीला मागे पडला. त्यांच्या मते राष्ट्रवादाच्या मांडणीमध्ये भारतीय समाज सांस्कृतिक व भौतिकक्षेत्रांमध्ये विभागला गेला. भौतिक क्षेत्रामध्ये वसाहतवाद्यांचे आदुनिकीककक्षर स्वीकारले. पण सांस्कृतिक क्षेत्रात मात्र आपली संस्कृती राखावी असा आग्रह राष्ट्रवाद्यांनी धरला. त्यामुळे नवभारतातील स्त्रियांच्या प्रतिभेची जडणघडण सांस्कृतिक चौकटीतच झाली. या चौकटीत दलित कष्टकरी वर्गातील स्त्रियांपेक्षा तिचे वेगळेपण अधोरेखित करण्यात आले. या स्त्रियांचे प्रश्न घराअंतर्गत बनले. अशा प्रकारे राष्ट्रवाद्यांनी पुरूषप्रधानता स्वाभाविकपणे पुन्हा प्रस्थापित केली. थोडक्यात लिंगभावाच्या जडणघडणीचा इतिहास मांडताना राष्ट्रवादी इतिहासकारांनी पुरूषप्रधान व्यवस्थेतील प्रक्रियांचे आधुनिकीकरण केले, असे विश्लेषण करावे लागेल.

सबाल्टर्न इतिहासप्रवाहात खरे तर वंचित म्हणून स्त्रियांच्या स्थानाबद्दल भाष्य करावयाला पाहिजे होते. पण सबाल्टर्नच्या पाचव्या खंडापर्यंत सर्व इतिहासकार पुरूषच आहेत ते स्त्रियांच्या वंचित स्थानाबद्दल भाष्य करत नाहीत. एकंदरीत, सबाल्टर्न इतिहास प्रवाहात म्हणावे तसे लिंगभावाच्या प्रश्नावर प्रकाश टाकला नाही.

सन १९८५ नंतर व मुख्यकत: १९९० नंतरच इतिहासलेखनामध्ये विश्लेषणात्मक पातळीवर मोठा बद्दल झाल्याचे आढळते. हा बदल म्हणजे विश्लेषणाचा विषय स्त्री न राहता लिंगभाव ही संक्लपना पुढे आली. या दशकात जागतिक पातळीवर काळ्या व तिसऱ्या जगातील स्त्रियांनी प्रमुख प्रवाही असलेल्या स्त्रीवादावर टीका केली व स्त्रिया-स्त्रियांमधील वर्ग, वर्ण, राष्ट्र यावरून भेद केला जातो यावर लक्ष केंद्रित केले गेले.

भारतात रूपकुंवर व शहाबानों प्रकरणानंतर व त्याचप्रमाणे नरहिंदुत्ववादामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढल्यानंतर स्त्रीवादाच्या भगीनीभावाच्या संकल्पनेला धक्का बसला. आणि याच पार्श्वभूमीवर स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र लिंगभाव या कोटीक्रमाकडे वळल्याचे दिसते. पुरूषप्रधानता ही एक संघ नसून एकाच वेळी अनेक वर्गस धर्म, जातीधिष्ठित पुरूषप्रधानता कार्यरत असते असे प्रतिपादन करण्यात आले. तसेच, पुरूषप्रधान व्यवस्थेचा व राजकारण, अर्थकारण, कायदा व संस्कृती यांच्या परस्पर जडणघडणीवर प्रकाश टाकला गेला.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. फेमिनिझम हा शब्द प्रथम कोणी वापरला ?

२. Womanism हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला जाऊ लागला होता ?

३. स्त्रीवादी विचारसरणीचा गाभाभूत घटक कोणता आहे ?

४. एकात्मक स्त्रीवादाच्या जाणीव निर्मितीस येणारी अडचण कोणती ?

५. मेरी उल क्राप्ट हिने कोणता ग्रंथ लिहिला ?

६. जॉन स्टुअर्ट मिल याने कोणता ग्रंथ लिहिला ?

७. बेटी फ्रिडन हिने कोणता ग्रंथ लिहिला ?

८. फेडरिक एंगल्स ने कोणता ग्रंथ लिहिला ?

९. कार्लमार्क्स याने स्त्रियांच्या व मुलांच्या अमानुष पिळवणूकीचे कठोर सत्य कोणत्या ग्रंथातून मांडले ?

१०. मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद हा ग्रंथ कोणी लिहिला ?

११. स्त्रियांचे शोषण शारीरिक व जैविक क्रांतीनंतर संपुष्टात येईल अशी मांडणी कोणत्या प्रकारच्या स्त्रीवादात केली आहे.

१२. शुलामिथ फायरस्टोन हिने कोणता ग्रंथ लिहिला ?

१३. केट मिलेट हिने कोणता ग्रंथ लिहिला ?

१४. जर्मेन ग्रिअर हिने कोणते पुस्तक लिहीले ?

१५. वॉटवेर हॅपन्ड टू द वैदिक दासी हा निबंध कोणी लिहिला ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. ...... साली मुंबई एस.एन.डी.टी. विद्यापीठात पहिली स्त्रीविषयक अभ्यास परिषद भरली.

(अ) १९८१ (ब) १९७० (क) १९७५ (ड) १९८०

२. Feminism (फेमिनिझम) हा शब्द मुळ .......... भाषेतील आहे.

(अ) इंग्रजी (ब) लॅटीन

(क) फ्रेंच (ड) अरेबी

३. १९९० च्या दशकात Womanism च्या ऐवजी ........ हा शब्द प्रथम वापरला गेला.

(अ) विझमॅन (ब) फेमिनिझम

(क) समाजवादी स्त्रीवाद (ड) जहाल स्त्रीवाद

४. जॉन स्टुअर्ट मिल याने ........ या ग्रंथातून उदारमतवादी दृष्टिकोन मांडला.

(अ) दि सब्जेक्शन ऑफ विमेन (ब) भांडवल

(क) स्त्रीतत्वाचे गुढ (ड) स्त्रियांच्या हक्काची पायमल्ली

५. उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा उदय ...... शतकात झाला.

(अ) सतराव्या (ब) अठराव्य

(क) सोळाव्या (ड) एकोणिसाव्या

६. स्त्री मुक्ती मध्ये पुरूष मुक्तीची बीजे आहेत .......... मानतात.

(अ) मार्क्सवादी (ब) नवस्त्रीवादी

(क) जहालवादी (ड) उदारमतवादी

७. मार्क्सवादी स्त्रीवादाचा उदय युरोपात .......... च्या उदयानंतर अस्तित्त्वात आला.

(अ) साम्राज्यवाद (ब) हुकुमशाही

(क) भांडवलशाही (ड) लोकशाही

८. वर्गीय समाजाचा ........ हा अविभाज्य भाग आहे.

(अ) पुरूषी वर्चस्व (ब) कामगारांचे वर्चस्व

(क) भांडवलदाराचे वर्चस्व (ड) स्त्रिचे वर्चस्व

९. स्त्रीमुक्ती वाद हा ...... अस्तित्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढ्याचा एक भाग आहे असे मार्क्सवादी मानतात.

(अ) समाजवादी समाज (ब) लोकशाहीवादी समाज

(क) धर्मनिरपेक्ष समाज (ड) लिंगभेद विरहित समाज

१०. उदारमतवाद व ......... वाद याच्या संगमातून समाजवादी स्त्रीवादाची निर्मिती झाली.

(अ) जहालवाद (ब) पर्यावरणवादी स्त्रीवाद

(क) मार्क्सवादी स्त्रीवाद (ड) सबाल्टर्न

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. पुरूषप्रधानता : एक प्रकारे स्त्रियांचे शरीर, प्रजनन व लैंगिकता आणि उपजीविकेचे उत्पादन करण्यासाठी लागणारे श्रम यांच्यावरील वासाहातिक वर्चस्व म्हणजे पुरूषसत्ता.

२. अनुत्पादक कार्य : पैशामध्ये मोजमाप न होणारे कार्य.

३. त्रोटक : तुरळक, कमी प्रमाणात.

४. समग्र : परिपूर्ण

५. लिंगभाव : शारीरिक भेदा पेक्षा सांस्कृतीक व सामाजिक भेदावर अधारलेली लिंग जाणीव.

६. लाईम लाईट : प्रकाश झोत.

७. स्त्रीवाद : स्त्रियांसाठी समान हक्क, समान दर्जा, समान संधीची मागणी साठीचे सैद्धांतिक विचार.

८. काळा स्त्रीवाद : अमेरिकेत प्रस्थापित स्त्रीवादी चळवळी या गोऱ्या स्त्रियांच्या होत्या त्यात निग्रो (काळ्या) स्त्रियांचा विचार केला नव्हता. तेव्हा काळ्या स्त्रियांनी गोऱ्या स्त्रीवादावर प्रश्न उभे करून स्वत:च्या हक्काची मागणी काळ्या स्त्रीवादात केली.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक - १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) १ (२) ३ (३) श्रीमती फुलरेणू

(४) समानतेच्या दिशेने (५) रजतरंगिणी (६) स्त्री पुरूष तुलना

**ब) रिकाम्या जागा भरा.**

(१) १९९१ (२) अलोचना, दृष्टी (३) अक्षरा

(४) एस.एन.डी.टी. (५) १९७९

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक - २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार वास्तवाचे आकलन बदलते, असे त्यांनी सिद्ध केले. यालाच भूमिदृष्टी सिद्धांत म्हटले जाते.

(२) प्राचीन समुहांमध्ये स्त्रिया शेती, बुरूड काम, पौराहित्य, भांडी बनवणे इ.

(३) रा. चि. ढेरे

(४) लिंगभावाचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या स्त्रीत्त्वाच्या जडणघडणीचा इतिहास.

(५) १९६१

(६) १९८६.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

(१) काठी (२) वेदपूर्व काळ (३) १९९४ (४) २००६

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक - ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) एलिस रॉसी

(२) लैंगिक समानतेचा सिद्धांत व स्त्रियाच्या हक्काच्या चळवळी.

(३) स्त्री पुरूष समानता.

(४) स्त्रियांच्या चळवळीचा भला मोठा व्यापक पट आहे व स्त्रियांचे भिन्न गट भिन्न पद्धतीने प्रभावीत झाले आहेत ही एकी चळवळी समोरील मोठी अडचण आहे.

(५) स्त्रियांच्या हक्काची पायमल्ली.

(६) स्त्रियांची पराधिनता.

(७) स्त्रियांचे गुढ.

(८) कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांचा उगम.

(९) भांडवल.

(१०) ज्युलिएट मिशेल.

(११) जहाल स्त्रीवाद

(१२) द डायलेक्टिक ऑफ सेक्स.

(१३) लैंगिकतेचे राजकारण.

(१४) द विमेन युनक

(१५) उमा चक्रवर्ती

**ब) रिकाम्या जागा भरा.**

| | | |
|---|---|---|
| (१) १९८१ | (२) लॅटिन | (३) फेमिनिझम |
| (४) दि सब्जेक्शन ऑफ विमेन | (५) अठराव्या | (६) उदारमतवाद |
| (७) भांडवलशाही | (८) पुरूषीवर्चस्व | (९) समाजवादी समाज |
| (१०) मार्क्सवादी स्त्रीवाद | | |

## १.५ सारांश

स्त्री अभ्यासाची सुरूवात अमेरिकेत झाली व तेथून ती संपूर्ण जगभर पसरली. जगभरातील स्त्रियांच्या दुर्दशेबद्दल तात्त्विक व सैद्धांतिक विश्लेषण सुरू झाले. सत्तरच्या दशकात युनायटेड नेशनने

जाहीर केले की, स्त्रियांच्या परिस्थितीसंबंधी, त्यांच्या दर्जासंबंधी अहवाल घेतला पाहिजे. भारतातही त्या अनुशँगाने १९७१ मध्ये श्रीमती फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांच्या दर्जाची पाहणी करण्यासाठी समिती नेमली. या समितीने समानतेच्या दिशेने हा अहवाल सादर केला. या अहवालातून स्त्रियांच्या स्थितीबद्दल धक्कादायक माहिती बाहेर आली. आरोग्य, शिक्षण रोजगार सर्वच क्षेत्रात महिला पिछाडीवर आहेत हे दिसून आले. तेव्हा सरकारने स्त्रियांसंबंधित अभ्यास करण्यासाठी पहिल्या स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करण्यासाठी १९७३ मध्ये मुंबईत एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात केली. यानंतर सर्व स्तरावर स्त्रियांचा अभ्यास सुरू झाला. समाजशास्त्र. राज्यसास्त्र, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इतिहास इ. व अशा सर्व प्रकारच्या विषयामध्ये स्त्रियांसंबंधीचे अभ्यास संशोधने सुरू झाली. इतिहास या शाखेनेही भूतकाळातील स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करून स्त्रियांना मिळालेल्या विषम वागणूकीबद्दल वाचा फोडली. हा अभ्यास करताना स्त्रिया इतिहासातून का अदृश्य राहिल्या आहेत यासंबंधी कारण मिमांसा सुरू झाली. त्या कारणांचा उहापोह स्त्रीवादी इतिहासातून केला जाऊ लागला. स्त्रीवादी इतिहासातून सर्वप्रकारच्या इतिहासाचे स्त्रीवादी दृष्टिकोनातून पुनर्लेखन झाले पाहिजे. तरच समग्र मानव जातीचा इतिहास लिहिला जाऊ शकतो असा विचार पुढे येऊ लागला. यातूनच स्त्रीवादी इतिहासलेखनाचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ लागले. स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या वाटचालीचा अभ्यास करताना स्त्रीवादी सिद्धांकनाची ओळख असणे अत्यंत आवश्यक आहे. उदारमतवादी स्त्रीवाद (Liberal feminism), मार्क्सवाजीस्त्रीवाद (Marxist feminism), जहालमतवादी स्त्रीवाद (Radical feminism), समाजवादीस्त्रीवाद (Socialist feminism), उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद (Post-Modernist Feminism) ही स्त्रीवादी विचार प्रवाहाची प्रमुख सिद्धांकन आहेत. या स्त्रीवादी सिद्धांकनाची निर्मिती व विकास पाश्चात्य राष्ट्रात झाला आहे. पाश्चात्याची समाजरचना व भारतीय समाजरचना यामध्ये अंतर आहे. तरीही या स्त्रीवादी सिद्धांकनातील स्त्री पुरूष समतेचा धागा लक्षात घेऊन भारतीय परिपेक्षात इतिहासाचे पुनर्लेखन झाले पाहिजे. भारतीय परिपेक्षात स्त्रीवादाची निर्मिती झाली नसली तरी तेथे स्त्रियांचा कैवार घेऊन अनेक समाजसुधारक उभे राहिले. त्यांनी स्त्रीवादी सिद्धांकन निर्माण केले. नसले तरी त्यांच्या विचारातून व चळवळीच्या माध्यमातून भारतीय परिपेक्षातील स्त्रीवादी सिद्धांकन निर्माण होऊ शकते. यात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून व चळवळीतून स्त्रीवादाची मांडणी होऊ शकते. किंबहुना भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ती केली आहे असे म्हणता येईल. एकदा ही मांडणी समजली की भारतीय इतिहासाची भारतीय स्त्रीवादाच्या संदर्भात मांडणी करावयाला सोपे जाईल आणि ही मांडणी मात्र लिंगभावात्मक जडणघडणीतून जातीप्रथेचे उतरंडीतून पुढे जाणारी पाहिजे. आपल्या स्त्रियांचा दर्जा ठरविण्यात पुरूषप्रधानतेबरोबच जात हा महत्त्वाचा घटक आहे. हे स्त्रीवादी इतिहासलेखकाने लक्षात घेतले पाहिजे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. इतिहासात स्त्रिया दृश्यमान का नाहीत याच्या कारणांचा मागोवा घ्या.

२. स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व स्पष्ट करा.

३. स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय ते स्पष्ट करून भारतीय स्त्रीवादी इतिहासलेखनाचा आढावा घ्या.

**टिपा लिहा :**

१. उदारमतवादी स्त्रीवाद (Liberal feminism)

२. मार्क्सवादी स्त्रीवाद (Marxist feminism)

३. जहालमतवादी स्त्रीवादी (Radical feminism)

४. समाजवारी स्त्रीवाद (Socialist feminism)

५. उत्तर आदुनिकतावादी स्त्रीवाद (Post-Modernist Feminism)

## १.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ


१. भारतीय इतिहासातील स्त्रिया - डॉ. पद्मजा पाटील, डॉ. सौ. शोभना जाधव, फडके प्रकाशन, कोल्हापू, प्रथामवृत्ती, २००७.

२. स्त्रीवाद - सुमती लांडे व श्रुती तांबे, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथामावृत्ती, २००७.

३. स्त्रिया आणि कम्युनिझम - अनुवाद सरला कारखानीस.

४. स्त्रीमुक्तीसंबंधी लेनिन यांचे विचार - क्लारा झेटकिन अनुवाद प्रा. निशिकांत ठाकार.

५. महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण - डॉ. नारायण भोसले, द. ताईची प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००८.

# घटक २

# स्त्रियांचा रूढिगत आणि वैधानिक दर्जा

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषयविवेचन

२.२.१ प्राचीन काळातील स्त्रियांचा रूढिगत व वैधानिक दर्जा

२.२.२ मध्ययुगीन स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

२.२.३ आधुनिक काळातील स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

१. स्त्रियांचा दर्जा म्हणजे काय हे लक्षात येईल.

२. प्राचीन भारतामध्ये स्त्रियांना मिळणारी वागणूक आणि त्यांचा दर्जा लक्षात येईल.

३. दर्जामध्ये काळानुरूप होत असणारा बदल लक्षात येईल.

४. धर्मशास्त्र, स्मृती व इतर धर्मग्रंथामध्ये स्त्रियांबद्दल असणारी भूमिका लक्षात येईल.

५. मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांच्या दर्जाची माहिती मिळेल.

६. आधुनिक कालखंडातील स्त्रियांचा दर्जा व स्त्री प्रश्नासंबंधी सुधारकांची भूमिका लक्षात येईल.

७. आदिवासी समाजातील स्त्रियांच्या दर्जावर प्रकाश टाकता येईल.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रिला महत्वपूर्ण स्थान असून स्त्रियांना सामाजिक दर्जा व स्थान निर्माण करण्यासाठी अनेक संघर्षामधून जावे लागले आहे. भारतीय स्त्रिचा सामाजिक दर्जा व स्थान ठरविण्यासाठी ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक घटकांचा प्रभाव स्त्रिजीवनावर पडलेला होता. त्या घटकांचा अभ्यास करणे अपरिहार्य असून समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या कुटुंब, नातेसंबंध, विवाहपद्धती, वारसाहक्क, धार्मिक संस्था, राजकीय संस्था इत्यादी घटक स्त्रियांच्या रूढीगत आणि वैधानिक दर्जावर प्रकाश टाकतात. एक व्यक्ती म्हणून स्त्रिला कुटुंबामध्ये व समाजामध्ये जे स्थान असते, त्यावरूनच त्या राष्ट्राचा दर्जा ठरत असतो.

कालखंड कोणताही असो स्त्रियांच्या दर्जाचा विचार हा सर्वांगिण पैलू लक्षात घेवूनच करणे आवश्यक असून प्राचीन ते समकालीन स्त्रियांच्या प्रश्नांची गुंतागुंत इतकी विलक्षण आहे की, केवळ एकाच प्रश्नांचा विचार करून त्यांच्या दर्जाची उकल होणार नाही. त्यामुळे स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास करत असताना स्त्रियांचे सर्वांगीण स्थान आणि त्याला असणारे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक कंगोरे आणि त्याचा होणारा परिणाम यातूनच स्त्रियांच्या रूढीगत आणि वैधनिक दर्जावर प्रकाश टाकला जावू शकतो.

## २.२ विषय विवेचन

दर्जा ही संकल्पना मूलतः गुणात्मक आणि संख्यात्मक या दोन्ही दृष्टीने अत्यंत उपयोगी असून स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण, जन्मदर, मृत्युदर, अत्याचाराची आकडेवारी यावरून समाजातील स्त्रियांचा दर्जा तपासता येतो आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या सत्ता व अधिकारामधून स्त्रियांच्या गुणांना मिळणारा वाव अधोरेखित होतो. समाजशास्त्रीय परिभाषेमध्ये 'दर्जा ' ही संकल्पना 'सापेक्ष सत्ता आणि अधिकार' या अर्थाने वापरली जाते. ज्या पद्धतीने समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक घटकांत ज्या गतीने बदल होत असतात त्या पद्धतीने समाजाच्या वर्तन प्रमाणकांमध्ये, मूल्यव्यवस्थेमध्ये, रचनेमध्ये बदल घडून येत नाहीत. हाच घटक स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जावर प्रकाश टाकण्यास पुरेसा आहे.

**१. डॉ.राल्फ लिंटन यांच्या मते :**

'कोणत्याही व्यक्तिला समाजव्यवस्थेत विवक्षित काळी जे स्थान असते त्या स्थानाला दर्जा असे म्हणतात.'

**२. रूथ डिक्सन यांच्या मते :**

'अन्न, उत्पन्न, जमिन आणि इतर प्रकारची भौतिक तसेच ज्ञान, प्रतिष्ठा आणि सत्ता या सामाजिक साधन संपत्तीत स्त्रियांचा वाटा, कुटुंबात, समुदायात आणि समाजात किती प्रमाणात मान्य केला जातो, तो स्त्रिचा दर्जा समजला जातो.

**३. सण्डे यांच्या मते :**

स्त्रियांना कुटूंबात व समाजात किती प्रमाणात हक्क आणि सत्ता दिली जाते यावर स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो.

स्टोलर सारखे विचारवंत तर 'स्त्रियांची स्वायत्तता ही दर्जा ठरवण्यात महत्त्वाची असते' असे मानतात. एकंदरीत स्त्रियांना स्वतःच्या आयुष्यातील निर्णयावर किती नियंत्रण ठेवता येते आणि स्त्रियांना

त्यांच्या श्रमाचा मोबदला पुरूषाइतका मिळतो का ही घटके स्त्रियांच्या दर्जाला प्रभावित करत असतात. स्त्रियांचे हक्क आणि त्याचा प्रत्यक्षातील वापर यावरच स्त्रियांचा दर्जा ठरत असतो.

सर्वच विचारवंतांनी मांडलेली दर्जाची संकल्पना आणि त्याला समाजवास्तवातून मिळणारा आधार यावरून आपणांस असे म्हणता येईल की, स्त्रियांचा रूढीगत आणि वैधानिक दर्जा हा त्या ज्या सामाजिक, सांस्कृतिक स्तरामधून आल्या आहेत, ज्या परिस्थितीतमध्ये स्त्रिया वाढतात, नियंत्रणातील प्रत्यक्ष सहभाग आणि निर्णयप्रक्रियेतील अधिकार आणि हक्क त्यांना किती प्रमाणात मिळतात यावरच स्त्रियांचा दर्जा आधारलेला असतो.

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडामध्ये स्त्रियांना मिळणाऱ्या दर्जा व स्थानामुळे त्यांच्या जीवनामध्ये अनेक चढउतार होण्याबरोबरच बदल आणि सातत्यामुळे स्त्री जीवनाचा प्रवास हा नेहमीच अधोगतीकडे वाटचाल करणारा दिसून येतो.

### १.२.१ प्राचीन काळातील स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

आर्यांच्या आगमनापूर्वीच्या कालखंडामध्ये विशेषतः ताम्राश्मयुगीन कालखंडाचे अवलोकन करताना असे लक्षात येते की या कालखंडामध्ये स्त्रियांना सामाजिक जीवनामध्ये स्वातंत्र्य होते. मान व प्रतिष्ठा होती. अर्थव्यवस्था विकसित नसल्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक स्वांतत्र्याचा प्रश्न फारसा ऐरणीवर आला नाही. एकत्र कुटुंबपद्धतीचे फायदे तोटे स्त्रियांना मिळत. आर्यांच्या आगमनापूर्वी काही समाजामध्ये मातृसत्ताक कुटूंबपद्धती प्रचलित होती. सिंधूपासून नाईलपर्यंतचा हा प्रदेश एकेकाळी मातृसत्ताक समाजव्यवस्थेखाली होता हा डॉ.मार्शलचा निष्कर्ष आता सर्वमान्य झालेला आहे. मानवी संस्कृतीच्या या प्रारंभिक टप्यामध्ये स्त्रिमध्ये अपत्य निर्मितीचे काही अलौकिक सामर्थ्य आहे असे पुरूषाला वाटत होते त्याबरोबरच कृषीचा शोधही स्त्रिनेच लावला, मात्र पुढे नांगराची शेती सुरू झाल्यानंतर स्त्रिचे महत्त्व हळूहळू कमी होवू लागले.

सिंधू संस्कृतीही मातृसंस्कृती असल्यामुळे येथे मिळणाऱ्या असंख्य स्त्री प्रतिमा, शिक्के व इतर भौतिक साधनांमधून धर्म व समाजव्यवस्थेंमधील स्त्रियांच्या मानाच्या स्थानाची कल्पना येते, सामाजिक, धार्मिक, कार्यातील स्त्रियाचा सामुदायिक सहभाग, पडदा पद्धतीचा अभाव, नृत्यकलेतील प्रगती यावरून ताम्रपाषाण युगापासून ते सिंधू युगापर्यंतच्या सामाजिक व धार्मिक जीवनामध्ये स्त्रियांचा दर्जा हा सुस्थितीत होता, हेच जाणवते.

**वैदिक कालीन स्त्रियांचा दर्जा**

वैदिक काळाचे दोन भागांमध्ये विभाजन करण्यात येते. **१. पूर्ववैदिक कालखंड २. उत्तर वैदिक कालखंड** यापैकी पूर्ववैदिक कालखंडामध्ये स्त्रियांचा रूढीगत आणि वैधानिक दर्जा हा उत्तर वैदिक कालखंडाच्या तुलनेत अतिशय उत्तम होता अपत्यसंगोपन आणि गृहकृत्ये ही स्त्रियांची मुख्य कर्तव्य होती. स्त्री म्हणजे घराचे सर्वस्व असे विश्वामित्र सांगतात. पतीबरोबर स्त्री ही घराची स्वामिनी असण्याबरोबरच स्त्रिचा सन, उत्सव, धार्मिक कर्तव्यात मुक्त वावर होता. ऋग्वेदातील काही ऋचांची निर्मिती सुद्धा स्त्रियांनीच केली होती. घोषा, लोपामुद्रा, अपाला इत्यादी, पूर्ववैदिक कालखंडामध्ये पडदापद्धती, सतीचीचाल, या सारख्या प्रथा अस्तित्वात नव्हत्या. सर्वच क्षेत्रात स्त्रियांना पुरूषांप्रमाणे वावर होता. अविवाहित मुलीला पित्याच्या मिळकतीत वाटा मिळत असे. मुलीच्या शिक्षणांची काळजी घेतली जाई मुलीचे उपनयन होत असे. वेदविद्या संगीत नृत्य यांचे शिक्षणही दिले जाई. विद्यार्थिनींचे दोनप्रकार पूर्ववैदीक कालखंडामध्ये अस्तित्वात होते. १.ब्रह्मवादिनी २. सद्योद्वाहिनीं. ब्रह्मवादिनी स्त्री आयुष्यभर अविवाहित राहून ब्रह्मचर्य पाळून वेद व ब्रह्मविद्येचा अभ्यास करत. लोपामुद्रा, घोषा, विश्वतारा, अपाला, गार्गी वगैरे स्वतंत्र वृत्तीच्या विद्याभ्यासात प्रतिष्ठा मिळविलेल्या स्त्रियांची नावे ऋग्वेदात आहेत. तर सदयोद्वाहिनी विद्यार्थिनी शिक्षण घेऊन १६ वर्षापर्यंत अनुरूप पतीशी विवाहबद्ध होत. अथर्ववेदात स्त्रीला शिक्षण मिळाले तर स्त्री उत्तम संसार करेल असे म्हटले आहे.स्त्रियांना शिक्षणामध्ये मुक्त स्वांतत्र्य होते.

विवाह हा एक धार्मिक विधी असून पूर्ववैदिक कालखंडामध्ये मुलींना वरनिवडीचे स्वातंत्र्य होते. शिवाय कन्यादानाला महत्व होते. कन्यादानामध्ये मिळालेल्या वस्तूवर स्त्रियांचा हक्क असे. वर निवडण्याच्या स्वांतत्र्यापासून अविवाहित राहण्याचे स्वातंत्र्य या पूर्ववैदिक युगामध्ये स्त्रियांना बहाल करण्यात आले होते. अविवाहित जीवनव्यतीत करणाऱ्या स्त्रिस 'अमाजू' हा शब्द उच्चारला जाई. शिवाय या युगात बालविवाह, जरठ विवाह, हुंडा पद्धती इ. प्रथा प्रचलित नव्हत्या. आंतरजातीय विवाहाचा उल्लेख येतो. याबरोबरच राजकीय कार्यामध्येही स्त्रिया सक्रीय होत्या. सभा व समितीमध्ये स्त्रियांचा सहभाग दिसून येतो.

वैदिक काळात समाज स्त्रियांच्या बाबतीत उदार होता असे म्हटले जाते मात्र ऋग्वेद व अथर्ववेदातील कोणत्याही ऋषींनी 'आपल्याला कन्या व्हावी' अशी इच्छा एकदाही व्यक्त केली नाही. पत्नी ही अर्धांगिनी, सहधर्मचारिणी समजली जाई. शिक्षणात व सण उत्सवात स्त्रियांचा सहभाग होता हे मान्य करून असेच म्हणावे लागते की ज्या प्रमाणामध्ये स्त्रियांना समाज, धर्म, अर्थ, शिक्षण, संस्कृती व राजकीय जीवनामध्ये स्थान द्यावयास पाहिजे तेवढे देण्यात आलेले नव्हते. घोषा, लोपामुद्रा, अपाला व अन्य तुरळक स्त्रियानांच सन्मान देवून एखाद्या राष्ट्राची संस्कृती विकास पावत नाही.

उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जाला व्यापक प्रमाणात ग्रहण लागले. पूर्ववैदिक कालखंडाच्या तुलनेत उत्तरवैदिक कालखंडामध्ये स्त्रियाचे समाजातील स्थान खालावले, अपत्य संगोपण व गृहकृत्ये ही स्त्रियांची प्रमुख कर्तव्य मानली गेली. मुलींचा विवाहा हा पित्याची जबाबदारी मानली जावू लागली. पूर्वीची स्वयंवराची प्रथा राजघराण्यापुरतीच मर्यादित राहिली. विधवांना पुनर्विवाह नाकारण्याबरोबरच विवाह संस्थेतील सर्वच अधिकार हिरावून घेण्यात आले. बहुपत्नीत्वाची पद्धत रूढ झाली. शिवाय सतीची प्रथा उदयास आली. पडदा पद्धती, नियोग पद्धती यासारख्या पद्धती ज्या स्त्रियांच्या अस्तित्वाला गौणरूप प्रदान करतात त्या विकसित झाल्या सार्वजनिक उत्सव समारंभामध्ये स्त्रियांचा मुक्त वावर हिरावून घेण्याबरोबरच स्त्रिचा मालमत्तेचा अधिकार काढून घेतला गेला.स्वतः मनू म्हणतो, स्त्री ही बाल्यावस्थेत पित्याच्या छत्राखाली, तारूण्यात पतीच्या

प्रभावाखाली व वृद्धावस्थेत पुत्राच्या ताब्यात असते. स्त्री ही पुरूषाची खाजगी मालमत्ता आहे. अशी सामाजिक धारणा निर्माण करण्यात आली. ऐतरेय ब्राहमण ग्रंथ व अथर्ववेदामध्ये स्त्रिबद्दल द्वेषमुलक उद्गार काढले गेले. ऐतरेय ब्राम्हणात मुलगी ही पिता, पती व तिच्या मुलांना दुःखदायक होते असे म्हटले असून शतपथ ब्राहमण ग्रंथात स्त्रीने पतीचे भोजन झाल्यानंतर जेवावे असे म्हटले आहे. एकंदरीतच वरील नोंदीचा विचार करता असे लक्षात येते की, उत्तरवैदिक युगाने स्त्रिला व्यक्तीऐवजी वस्तू म्हणून समाजापासून दूर लोटले. उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रिविषयी संकुचित विचारांची बंधने घालण्यात आली. मनुस्मृती सारख्या ग्रंथाने तर स्त्रियांना नरकाचे प्रवेशद्वार ठरवून अतिशय घृणास्पद वागणूक दिली. 'न स्त्री स्वातंत्र्यमव अर्हती' हाच उत्तर वैदिककालीन स्त्री जीवनाचा घटक ठरला होता. धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात मज्जाव हे उत्तर वैदिक युगीन स्त्री जीवनाचे वैशिष्ट्ये ठरले होते. एकंदरीत खालील घटकांच्या आधारे संपूर्ण प्राचीन कालखंडातील स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जाची चर्चा करता येईल.

**१. विवाह**

हा एक महत्वपूर्ण धार्मिक व सामाजिक संस्कार प्राचीन कालखंडामध्ये उदयास आला. वैदिक कालखंडामध्ये विवाहाचे वय १६ ते १७ वर्षे होते. पती निवडीचे स्वातंत्र्य ही स्त्रिला होते. विवाहाचा व स्त्रियांच्या दर्जाचा खूप चांगला विचार पूर्व वैदिक युगाने घालून दिला. त्यात सहधर्मचारिणी, अर्धांगीणी पतीच्या घरांवर संयुक्त अधिकार, धार्मिक कर्तव्यात साथ, मात्र उत्तरोत्तर स्त्रियांचे स्थान ढासळू लागले. धर्मग्रंथ, स्मृतिग्रंथ, सुत्रग्रंथ इत्यादीमध्ये प्राचीन काळात आठ विवाह प्रचलित होते. असा उल्लेख आढळतो.

- **ब्राम्ह्य विवाह**

या विवाह प्रकारामध्ये वेदाभ्यासात पारंगत असलेल्या मुलास, मुलीचे वडील आपल्या मुलीबरोबर विवाह करण्यासाठी आमंत्रित करत असत.

- **दैव विवाह**

या विवाहानुसार यज्ञाच्या ऋत्विजाला कन्यादान केले जात असून हा विवाहप्रकार सर्वसामान्यासाठी नसल्यामुळे हा विवाह प्रकार कालबाहय ठरला.

- **आर्ष विवाह**

या विवाह प्रकारामध्ये वरपक्षांकडून वधूपक्षाला गाय व बैल दिले जात असे. हेच या विवाहप्रकाराचे वैशिष्ट्ये होते.

- **प्रजापत्य विवाह**

या विवाहानुसार पती पत्नीचे सहधर्माचरण अभिप्रेत होते. शिवाय या विवाह प्रकारामध्ये स्त्रियांचा आदर ठेवला जात असे. पतीने पत्नी जीवंत असेपर्यंत दुसरा विवाह करू नये तसेच गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थ किंवा सन्यांस आश्रमाचा स्वीकार करू नये.

- **असूर विवाह**

या विवाह प्रकारात वरपक्षाकडून मुलीच्या वडीलांना संपत्ती देवून मुली विकत घेतल्या जात असत. अशा मुलीशी करण्यात आलेला विवाह म्हणजेच असूर विवाह होय. धर्मशास्त्र दृष्टया मान्य नसलेला हा विवाह समाजामध्ये रूढ होता.

- **गांधर्व विवाह**

हा विवाहाचा प्रकार म्हणजे प्रेमविवाह होय. परस्परांच्या संमतीने हा विवाह करण्यात येत असून काही धर्मग्रंथामधून या विवाह पद्धतीचे समर्थन करण्यात आले आहे.

- **राक्षस विवाह**

या विवाह प्रकारामध्ये मुलीला जबरस्तीने पळवून त्या मुलींशी विवाह करणे यालाच राक्षस विवाह असे म्हटले जाई. हा विवाहाचा प्रकार क्षत्रियांमध्ये रूढ होता. युद्धामध्ये जिंकलेल्या स्त्रियांसोबत विवाह केले जात असत.

- **पिशाच्च विवाह**

या विवाह प्रकारामध्ये संबंधीत मुलीला दारू पाजून बेसावध अवस्थेत असतांना तिची फसवणूक करून विवाह केला जात असे. या विवाहाला पिशाच्य विवाह असे म्हटले जाई.

वरील सर्वच विवाह प्रकार हे प्राचीन कालखंडामध्ये भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अस्तित्वात होते व यातील ब्राम्ह्य विवाह, गांधर्व विवाह, व प्रजापत्य विवाहामध्ये स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्याचे धोरण कमी अधिक प्रमाणात अंगीकारले जाई मात्र इतर विवाह प्रथांमधून स्त्रियांचा दर्जा उत्तरोत्तर खालावत गेल्याचे जाणवते.

## २. नियोग पद्धती

पतीचा मृत्यु, असाध्य रोग, निर्बीजत्व इत्यादी कारणांमुळे स्त्री निपुत्रिक असेल तर तिने केवळ पुत्रोत्पतीसाठी अन्य पुरूषांशी विधीपूर्वक समागम करण्याच्या पद्धतीला नियोग असे म्हटले जात असे. वंश चालू रहावा हा या प्रथेमागील प्रमुख उद्देश होता. या प्रथेमुळे वंश चालू राहत असे मात्र स्त्रियांचा समाजातील दर्जा व स्थान घसरले. काही धर्मशास्त्रकारांनी या प्रथेला विरोध दर्शीविला. स्त्रियांच्या पवित्र्यापेक्षाही वंश चालू राहणे महत्त्वाचे मानले जात असे.स्त्रिने नियोगाच्या मार्गाचा अवलंब करावा यासाठी पुरूषांकडून व कुंटुंबाकडून स्त्रियांवर दबावही आणला जात असे. या पद्धतीने स्त्रियांचे जीवन दुय्यम केले यात शंका नाही.

## ३. विधवा पुनर्विवाह

प्राचीन कालखंडामध्ये विधवा पुनर्विवाहाला मान्यता होती. पती हरवला किंवा मरण पावला अशा अवस्थेत स्त्रिला पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य होते. मात्र हळूहळू स्त्रियांच्या पुनर्विवाहाला विरोध होवू लागला आणि बालविवाहाची व बहुपत्नीत्वाची प्रथा सुरू झाल्यामुळे तर विधवा विवाहाचा प्रश्न ऐरणीवर आला. इ.स.१००० पासून तर बालविधवाचे हे पुनर्विवाह होणे बंद झाले. विधवेशी विवाह करणाऱ्या

पुरूषाला धर्मबहिष्कृत करण्यात येत असे. याबरोबरच सगोत्र सपिंड विवाहांवर सुद्धा बंदी घालण्यात आली. स्त्रिचा पुनर्विवाह होवू शकतो हे धर्मसंस्थेने नाकारले. परिणामतः स्त्रियांचा दर्जा घसरला.

**४. बालविवाह**

उपनिषदे व सूत्र कालखंडामध्ये कन्येचा विवाह कमीत कमी वयामध्ये करण्यात येवू लागला. उत्तर वैदिक कालखंडानंतर बालविवाहाच्या प्रथेने रौद्र रूप धारण केले. मनुस्मृतीच्या मते जो पिता आपल्या कन्येचा विवाह आठव्या वर्षी करीत नाही तो पिता नरकात जातो असे म्हटले आहे.

**५. केशवपन**

इ.स. ५०० नंतर केशवपन करण्याची प्रथा सुरू झाली ती उत्तरोत्तर वाढत गेली. धर्मग्रंथाच्या मते विधवा स्त्रियांनी केशभूषा करू नये, शिवाय विधवा सती न जाता जीवंत राहत असेल तर तीने आपल्या केसांचा त्याग करावा आणि आपले शरीर तपश्चर्येने शुष्क करावे हा विचार धर्मग्रंथानी दिला. वरिष्ठ जातीतून कनिष्ठ जातीमध्ये ही प्रथा मोठया प्रमाणत रूढ झाली. परिणामतःस्त्रियांना सहजिकच दुय्यमत्व प्राप्त झाले. महाराष्ट्रामध्ये यादव कालखंडामध्ये केशवपनाची प्रथा सुरू झाली.

**६. सती प्रथा**

जरी ऋग्वेद कालखंडामध्ये सतीप्रथा प्रचलित नसली तरी नंतरच्या कालखंडामध्ये या सतीप्रथेचे उद्दात्तीकरण करण्यात मनूचा खूप मोठा हातभार आहे. शिवाय अनेक शास्त्रकाराना पतीमृत्यूनंतर स्त्रिने जीवंत राहणे मान्य नाही.सती प्रथेचा पहीला उल्लेख इ.स.पू. ५१० मध्ये एरण अभिलेखामध्ये मिळतो.

स्त्री सती गेल्यानंतर तीला मोक्ष प्राप्त होवून तीला स्वर्ग प्राप्ती होते. या धारणेपोटी धर्मशास्त्रकारांनी सतीरूढीचा जोरदार पुरस्कार केला. काश्मीरमध्ये या प्रथेचे स्तोम मोठयाप्रमाणात होते. त्याबरोबरच क्षत्रियवर्णामध्ये ही प्रथा मोठयाप्रमाणात अस्तित्वात होती. मुळात अतिशय अमानुष व पाशवी प्रथेमुळे स्त्रियांना पतीच्या संपत्तीतील वाटा नाकारला गेला त्याबरोबरच विधवाचे जीवन कष्टप्रद होण्याबरोबरच सतीप्रथेमुळे समाजातील स्त्रियांच्या अस्तित्वावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले. ही पद्धती ब्रिटीश कालखंडापर्यंत अस्त्विात होती.

### ७. पडदा पद्धती

इ.स.च्या पहिल्या शतकापर्यंत पडदा पद्धती अस्तित्वात नव्हती. वैदिक कालखंडामध्ये तर मुलांमुलीचे सहशिक्षण होत असे. राजघराण्यांमध्ये पडदापद्धती अस्तित्वात होती. त्याचे अनुकरूण संरजामदार, जमिनदार, जहागिरदार करत असत मात्र उत्तरोत्तर पडादापद्धतीचे प्रस्थ वाढू लागले. परिणामतः पडदा पद्धतीने स्त्रियांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोठयाप्रमाणात प्रतिबंध निर्माण केला. स्त्रियाचे सहशिक्षण, विवाहाचे वय विधवांचा दर्जा इत्यादी प्रत्येकाबाबतीत पडदापद्धती प्रतिकूल परिणाम करणारी ठरली.

### ८. घटस्फोट

धर्मशास्त्राचा घटस्फोटाला विरोध होता. पतीच्या बाबतीमध्ये पत्नीची निष्टा व आचरण कायस्वरूपी असले पाहिजे. पती हाच पत्नीचा धर्म असला पाहिजे. नारद यांनी पती नपुंसक असेल किंवा संन्यासी बनला असले तरच पत्नीला घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे असे सांगितले. या सामाजिक दास्यत्वाच्या नियमामुळे स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तीत्व नाही हेच सिद्ध झाले. पती हाच धर्म माननारी मानसिकता स्त्रियांमध्ये मोठया प्रमाणात निर्माण झाली व ती आज ही दिसून येते.

### ९. बहुपत्नीत्व पद्धती

प्राचीन भारतीय समाजजीवनाचा अविभाज्य घटक असलेली बहुपत्नीत्व प्रथा उत्तरवैदिक कालखंडापासून सुरू होवून ती नंतरच्या कालखंडामध्ये फोफावत गेली हळूहळू पुरूषसत्ताक समाजसंस्थेमुळे समाजातील वरिष्ठ व धनवान वर्गाने बहुपत्नीत्त्व प्रथेला कायदेशीर रूप दिले व संबंध भारतभर हे लोण पसरले. परिणामतः स्त्रियांना आपल्या इच्छेविरूद्ध या प्रथेला बळी पडावे लागले. या अमानुष प्रथेने स्त्रियांचे जीवन अधिकच दयनिय केले.

### १०. वारसा हक्क

वैदिक युगामध्ये पती पत्नी दोन्ही घराचे व घरातील चीजवस्तुचे संयुक्त स्वामी असत. मात्र उत्तरोत्तर पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये परावर्तीत होणाऱ्या संरचनेमुळे स्त्रिला मालमत्तेमध्ये गौण स्थान

मिळायला सुरूवात झाली. जमीन, घर, पशुधन ही स्थावर मालमत्ता संपूर्ण कुटुंबाची समजली जाई तर घरातील दागदागिने, अलंकार, वस्त्रे यावर व शुल्क जंगम वस्तुवर स्त्रियांचा हक्क मान्य करण्यात आला. त्याला स्त्रिधन असे म्हटले जात असे. मनुस्मृतीने स्त्रिधनाचे सहा प्रकार सांगितले असले तरी उत्तरोत्तर स्त्रिधनावर व स्थावर मालमत्तेवर स्त्रिचा हक्क नाकारण्यात आल्याचेही दिसून येते.

देवलस्मृती, मिताक्षरा, याज्ञवल्क्यस्मृती, मनुस्मृती या ग्रंथामधून स्त्रिधनाची संकल्पना मांडण्यात आली आहे. मुळातच स्त्रियांच्या वारसाहक्काबद्दल वेगवेगळया ग्रंथकारांनी वेगवेगळी मते मांडलेली असून परिस्थिती, वेळ, काळ व गरज पाहून स्त्रियांच्या स्त्रिधन व वारसाहक्काबद्दल निर्णय घेतले जात असत. मात्र संपत्तीचा खरा मालक हा पुरूषवर्गच होता आणि अबाधितपणे हा पुरूषवर्ग या स्त्रिधन व इतर वारसाहक्काचा उपभोग घेत असे. धर्मग्रंथानी तर स्त्रियांना वडीलाच्या संपत्तीमध्ये हिस्सा न ठेवण्याचे संकेत दिले. विधवांना ज्या सती जात नाहीत अशा स्त्रियांना तर पतीच्या मृत्यूनंतर संपत्तीचा हक्क नााकराला गेला.

### ११. वेश्या व्यवसाय

प्राचीन समाजजीवनमध्ये वेश्या व्यवसाय प्रचलित होता. वात्सायनाचे कामसूत्र, धर्मसुत्र, स्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र शिवाय जैन व बौद्ध धर्मग्रंथामध्ये वेश्या व वेश्याव्यवसायाचे उल्लेख आढळतात शिवाय गणिका व देवदासीच्या माध्यमातून स्त्रियांना बंदिस्त करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्याबरोबरच वैदिक वाङ्मयामध्ये कन्याविक्रयाचा उल्लेखही आढळतो.वधुपित्याला पैसे देवून कन्या मिळवून स्त्रियांना बंधनात अडकविण्यासाठीचे सर्व उपाय शास्त्रकारांनी अवलंबविले.

### १२. सामाजिक व धार्मिक जीवनातील दर्जा

ताम्रपाषाणयुग व सिंधूसंस्कृतीचा कालखंड वगळता वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धामध्ये स्त्रिच्या अवनतीला जी सुरूवात झाली ती उत्तरोत्तर वृद्धीगत होत गेली. धर्मसुत्रांचा काळ हा स्त्रियांच्या दर्जा व प्रतिष्ठेला हानीकारक ठरला. स्त्रियांच्या विकासाला खिळ घालण्यासाठी विवाहासारख्या प्रथा पुढे आणल्या गेल्या व परिणामत स्त्रियांना शूद्र हा दर्जा देण्यात आला.सहसा सर्वच हिंदुधर्मीय धर्मग्रंथानी

स्त्रियांचे स्थान दुय्यमच ठेवण्यात धन्यता मानली. बौद्ध व जैन धर्मग्रंथामध्ये स्त्रियाबद्दल सकारात्मक दृष्टी ठेवण्यात आली मात्र वैदिक युगामध्ये स्त्रिला जी उदार वागणूक मिळत होती ती उत्तरोत्तर लोप पावत गेली व स्त्री हे नरकाचे द्वार आहे अशी समाजामध्ये स्त्रिची प्रतिमा रंगविण्यात आली.

## सारांश

एकंदरीतच प्राचीन भारताच्या इतिहासाचे सर्वांगीण सुक्ष्मावलोकन केले असता असे लक्षात येते की,स्त्रियांना कायमच दुय्यम दर्जा देण्यात आला होता. अपवादात्मक परिस्थितीत स्त्रियांना प्राधान्य दिले जाई मात्र वास्तविकता खूपच वेगळी होती. प्राचीन भारतामध्ये स्त्री ही कायम अपवित्र व नरकाचे द्वार होती.स्त्रियांना नेहमीच हीन वागणूक देण्यात येण्याबरोबरच परावलंबी जीवन जगावे लागत असे. प्राचीन भारतामध्ये स्त्रियांबाबत धर्मशास्त्रकारांनी कमालीची दुटप्पीपणाचे धोरण अंगीकारले होते आणि स्त्रियांवर लादता येतील तेवढे निर्बंध लादले.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. सिंधूपासून नाईल पर्यंतचा हा प्रदेश एकेकाळी मातृसत्ताक समाज व्यवस्थेखाली होता असे कोणी म्हटले ?

२. सती प्रथेचा पहिला उल्लेख कोणत्या अभिलेखात मिळतो?

३. आजच्या काळातील प्रेमविवाह म्हणजे प्राचीन काळातील कोणता विवाह प्रकार होता.

४. महाराष्ट्रामध्ये केशवपनाची पद्धत कोणत्या राजवटीमध्ये सुरू झाली ?

५. विवाहाप्रसंगी वधूला देण्यात येणाऱ्या भेटवस्तुस काय म्हटले जात असे ?

**ब) योग्य पर्याय निवडा**

१. मनुस्मृती या ग्रंथामध्ये स्त्रिधनाचे.........प्रकार सांगितले आहेत.

अ) ४ ब) ६ क) ८ ड) १०

२. आर्याची कुटुंबसंस्था ही ...........होती

अ) धर्मसत्ताक ब) मातृसत्ताक क) पितृसत्ताक ड) यापैकी नाही

३. प्राचीन भारतात विवाहाचे एकूण .........प्रकार होते.

अ) ८ ब) ६ क) ४ ड) २

४. ......... या विवाह प्रकारात मुलीच्या वडीलांना संपत्ती देवून विवाह केला जात असे.

अ) ब्राम्ह्य ब) पिशाच्य क) दैव ड) आसूर

५. प्राचीन कालखंडामध्ये अंत्यविधीचे अधिकार फक्त ...........ला होते.

अ) पुरूष ब) स्त्री क) दोन्ही ड) यापैकी नाही.

**१.२.२ मध्ययुगीन स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा**

इ.स.१२०६ मध्ये मुस्लिम सत्तेची स्थापना झाली, तेव्हापासून ते औरंगजेब बादशहाच्या मृत्यूपर्यंतचा काळ हा साधारणतः मध्ययुगीन कालखंड समजला जातो. इ.स.११९२ च्या तराईनच्या युद्धात मुहमद घोरीने पृथ्वीराज चव्हाणचा पराभव केल्यानंतर इ.स.१२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबक याने दिल्लीवर आपली सत्ता प्रस्थापित केली. सुलतानशाही, मुघलशाही आणि इतर छोटयामोठया मुस्लिम सत्ताधिशांनी आपली संस्कृती व धर्माची पेरणी भारतामध्ये केली. त्याबरोबरच मध्ययुगात अस्तित्वात असलेल्या वर्धन घराण्यापासून ते मराठयांच्या राजकीय जीवनसंघर्षामध्ये हिंदू व मुस्लिम समाजजीवनाच्या संकर व संघर्षाचा प्रभाव भारतीय समाजजीवनावर विशेषतः स्त्रियांचा दर्जावर पडला आणि व्यापक प्रमाणावर बदल घडून आले.

गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे, सय्यद घराणे, लोदी घराणे व मुघल घराणे यांच्या राजकीय कारकिर्दीचा आणि भारतीय राजवटीचा संघर्ष होवून काही सांस्कृतिक घटकांचा प्रभाव भारतीय समाजव्यवस्थेवर झाला आणि स्त्रियांच्या रूढीगत दर्जा व स्थानावर मध्ययुगीन कालखंडामध्ये काही नवीन घटकांनी शिरकाव करून स्त्री जीवन एका वेगळया वळणावर आणून ठेवले. परकीयांची विशेषतः मुस्लिम

आक्रमणे त्यातून उदवभवलेला धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष हा स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जामध्ये बदल करणारा ठरला.

### अ) सुलतानशाही कालखंड (१२०६ - १५२६)

इ.स.१२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबक याने स्थापन केलेले गुलाम घराणे तदनंतरचे खिलजी, तुघलक, सय्यद व लोदी या सर्व घराण्याचा कालखंड हा सुलतानशाही कालखंड म्हणून संबोधला जातो. खालील घटकाच्या आधारे या कालखंडातील स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जाची कल्पना येईल.

#### १) विवाह

मुस्लिम स्त्रिला पती निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. मुस्लिम समाजातील विवाह म्हणजे दोन कुटुंबातील करार मानला जातो. विवाह हा करार असल्यामुळे मुस्लिम स्त्रिला घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळाला होता. शिवाय घटस्फोट घेतलेल्या मुस्लिम स्त्रिला पुनर्विवाह करण्याची परवानगी होती. त्यामुळे मुस्लिम समाजातील विवाह हा स्त्रिला सुरक्षित वाटत होता. विवाह प्रसंगी स्त्रिला मेहर देण्याची प्रथा होती. त्यालाच स्त्रिधन असे म्हटले जाते.

स्त्रिचा मालमत्तेवरील वारसा हक्क मुस्लिम समाजाने मान्य केला. पती निवडीचे जरी स्वातंत्र्य नसले तरी स्त्रिच्या इच्छेशिवाय तिचा विवाह करता येणे शक्य नव्हते. मात्र मुस्लिम समाजामध्ये बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात असल्यामुळे स्त्रिजीवन दयनिय झाले होते.

#### २) पडदा पद्धती

पडदा पद्धती ही मुस्लिम संस्कृतीची भारताला मिळालेली देणगी असून मुस्लीम उच्चभ्रू वर्गामध्ये पडद्यात वावरण्याची प्रथा होती. फिरोजशहा तुघलकाने पडदा पद्धती अतिशय कडक केली. त्यामागे वांशिक शुद्धतेच्या तत्वाचे धोरण होते. रझिया सुलतान हीने पडदा पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला मात्र ते शक्य झाले नाही. उलट पुरूषसत्ताक वर्चस्ववादी लोकांनी रझिया सुलतानाला सर्व स्तरातून प्रखर विरोध केला.

### ३) तलाक/घटस्फोट

मुस्लिम समाजामध्ये तलाख हा लेखी व तोंडी स्वरूपाचा होता. तो पत्नीच्या अनुपस्थितीत व उपस्थितीतही घेतला जात असे.पुरूष इस्लाम कायद्यानुसार तीन वेळा तलाक हा शब्द उच्चारून पत्नीस केव्हाही सोडू शकत असे. तलाक देण्यासाठी काही कारण असण्याचेही बंधन नव्हते. मुस्लिम कायद्याचे वैशिष्ट्ये म्हणजे घटस्फोटासाठी न्यायालयीन आदेशाची आवश्यकता नसे शिवाय मुस्लिम स्त्रिला घटस्फोटाचा अधिकार जवळजवळ नाकारण्यात आला होता. त्याबरोबरच तलाकविरोधात दाद मागण्याची तरतुदही मुस्लिम कायद्यात नव्हती. घटस्फोटाचे चार प्रकार असून इला, सिआर, लिअन व खुला. त्यातील खुला हया प्रकारामध्ये दोघाच्या सम्मतीने घटस्फोट घेण्यात येत असे. मुस्लिम स्त्रिला घटस्फोटानंतर विवाहाची परवानगी होती.

### ४) पुनर्विवाह

सुलतानशाही कालखंडात मुस्लिम समाजामध्ये बहुपत्नीत्वाची पद्धती होती. पुरूषाने अनेक विवाह केल्यास स्त्रियास घटस्फोट घेण्याचा अधिकार होता. पुनर्विवाहाचे व बहुपत्नीत्वाचे प्रश्न वाढल्याने समाजावर अनिष्ट परिणाम घडून आला. वयस्कर पुरूषांबरोबर तरूण स्त्रियांचे विवाह मोठया प्रमाणावर घडवून आणले जात. त्यामुळे स्त्रियांना दुःखमय जीवनातूनच प्रवास करावा लागत असे.

### ५) जनानखाने

सल्तनतकालीन मुस्लिम राज्यकर्ते आपल्या जनानखान्यामध्ये अतिशय सुंदर व प्रभावी स्त्रियांचा समावेश करत असत. त्यांची संख्या भरपूर असून त्यांना एकप्रकारे गुलामीचेच जीवन जगावे लागत असे. शिवाय जनानखान्यामध्ये असंख्य दासी होत्या. अनेक हिंदू स्त्रियांचाही आपल्या जनानखान्यामध्ये समावेश मुस्लिम शासकांनी केला होता. त्यामुळे स्त्री जीवनाला अवनती आली.

## ६) शिक्षण

मुस्लिम स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी होते.कुराण वाचण्याइतक्या त्या साक्षर असत. मात्र स्त्रियांना शिक्षणाबरोबरच स्वातंत्र्यावर ही मोठया प्रमाणात बंदी होती. त्यांचा सार्वजनिक ठिकाणी वावर सुलभ नव्हता.

## ७) स्त्री पावित्र्याविषयी अवास्तव कल्पना

मुळात मुस्लिम स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते.स्त्रिच्या शुद्ध चारित्र्याविषयी पुरूष अतिशय जागरूक होते. स्त्रिच्या पावित्र्यास अधिक महत्त्व असल्यामुळे पडदापद्धती सर्रास मुस्लिम कुटुंबामध्ये वापरली जात असे. स्त्रिच्या पावित्र्याला मुस्लिम समाजात मोठे स्थान होते. तिच्या रक्षणाची जबाबदारी पुरूषावरच होती. कनिष्ठ जातीत जन्माला आलेल्या परंतु चारित्र्य संपन्न स्त्रिला समाजात सन्मानाने वागविले जाई.

## ८) राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया

स्त्रियांना राजकीय व सामाजिक जीवनामध्ये दुय्यमत्व हे सल्तनकालीन स्त्री जीवनाचे वैशिष्ट्य होते. उच्च व मध्यम वर्गीय मुस्लिम स्त्रियांना नृत्य व संगित शिक्षणाचा प्रवेश निषिद्ध होता. मात्र अशा अवस्थेतही राजघराण्यातील व सरदार घराण्यातील काही शिक्षित स्त्रियांचा राजकारण व प्रशासनावर मोठा प्रभाव होता. शाह तुर्केन, रझिया सुलताना, बिबी फातिमा, बिबी हाफीजा जमाल या स्त्रियांनी समाजकारण राजकारण व प्रशासनावर आपली पकड बसविली होती.

एकंदरीतच धर्म, समाजकारण, राजकारण व प्रशासन या क्षेत्रामध्ये कर्तृत्व गाजवणाऱ्या स्त्रियाचे प्रमाण जरी तुल्यबळ असले तरी मुस्लिम समाजव्यवस्थेमध्ये स्त्रिला कायम दुय्यमत्व बहाल केल्याचेच दिसून येते.

## ब)	मुघल कालखंड / मुघलकालीन स्त्रियांचा दर्जा

### मुघलकालीन स्त्रियांचा दर्जा

सुलतानशाहीनंतरचा कालखंड हा मुघलकालखंड(१५२६ ते १७०७) म्हणून ओळखला जातो. या कालखंडात मध्ययुगीन अरबी स्त्रिया राजकारणात मोठया प्रमाणात सहभाग घेत असत. त्याच कालावधीमध्ये भारतीय मुस्लिम स्त्रियांचा दर्जा खालील प्रमाणे होता.

### १.	बहुविवाह पद्धत

मुस्लिम स्त्रियांचा दर्जा हा बहुविवाह पद्धतीमुळे आणखीच घसरला होता. कुराणामध्ये बहुविवाहाची असलेली परवानगी मध्ययुगातील पुरूषांनी आपापल्या पद्धतीने अर्थ लावून या पद्धतीला समाजमान्य रूप दिले. त्यामुळे समाजाचे व स्त्रियाचे स्वाथ्य बिघडले. एकपत्नीत्वाचा पुरस्कार करणाऱ्या अकबरानेमात्र ३०० स्त्रियाशी विवाह केल्याचे पुरावे सापडतात. त्यामुळे बहुविवाहामुळे आर्थिक, सामाजिक  आरोग्य बिघडले.

### २.	विधवा पुनर्विवाह

जरी मुस्लिम स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार  असला तरी त्यांना तो  हक्क घेण्याइतपत स्वातंत्र्य समाजाने बहाल केलेले नव्हते.  जरी पुनर्विवाह झाला तरी कुटुंबामध्ये दुय्यम वागणूक देण्यात येई अकबराने या बाबतीत जरी सुधारणा केल्या असल्यातरी त्याला यश मिळाले नाही. बहुपत्नीत्व असलेल्या कुटुंबात पुनर्विवाहित असलेल्या स्त्रिची स्थिती हलाखीची होती. यावर इतिहासकार बदायुनीने प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर बालविवाह सुद्धा अस्तित्वातअसल्याचे उदाहरणे दिसून येतात. जरठ विवाह, बालविवाह यामुळे कौटुंबिक संघर्षात मोठया प्रमाणात भर पडली.

### ३.	पडदा पद्धत

मुगल काळामध्ये या पद्धतीचा मोठया प्रमाणावर अवलंब करण्यात आला असून उच्चभ्रू कुटुंबातील स्त्रिया पडदयामागे राहत. घराबाहेर जायचे असल्यास बुरखा घालून निघत. याबाबतीत काढलेल्या अकबराच्या आदेशाचे वर्णन बदायुनीने आपल्या ग्रंथात केल्याचे आढळते.

मुस्लिम पुरूष याबाबतीत अतिशय काळजीपूर्वक देखरेख करीत असत. डॉ.चिटणीसाच्या मते, मुस्लिम पुरूषांना त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या भाऊ व वडिलांनी भेटलेले आवडत नसे. डेला वेला यांच्या मते मुस्लिम स्त्रिया चरित्रहिनता व दारिद्रय याशिवाय कधीही घराबाहेर पडत नसत. राजपुताना, दक्षिण भारत व मलबारमध्ये ही पद्धत फारसी प्रचलीत नव्हती. मात्र राजस्थानातल्या सर्वच राजघराण्यानी ती स्वीकारली. पडदयात राहणे कुलिनतेचे व गौरवाचे मानले जावू लागले.

## ५. शिक्षण

स्त्रियांना शिक्षणाची दारे पूर्णत: उघडी नव्हती मात्र राजघराण्यातील स्त्रिया काही प्रमाणात धार्मिक व युद्धाचे शिक्षण घेताना दिसून येतात. मोगल दरबारातील नूरजहाँन, मुमताजमहल, चाँदबिबी, झेबुनिस्सा, जहाँनआरा, रोशनआरा वगैरे स्त्रिया सुशिक्षित होत्या. उच्चकुलीन स्त्रियांना काव्य, साहित्य, धर्मग्रंथ, व्याकरण, पार्शियन भाषा, नृत्य, संगीत, गायन व सौदर्यशास्त्राचे शिक्षण दिले जाई. राजघराणी व सरदार घराणे सोडली तर सर्वसामान्य स्त्री शिक्षणाचा पूर्णंतः अभाव होता त्यामुळे अज्ञान, अंधश्रद्धा व दांभिकपणा यांचा अंतर्भाव झाला.गुलबदन बेगमने हुमायूननामा या आपल्या ग्रंथामध्ये भाऊ हुमायूनच्या आठवणी लिहिल्या आहेत. मात्र गरीब मुली शिकत नसत. अकबराने फत्तेपुर शिक्रीयेथील महालात स्त्रियासाठी शिक्षण देणारा मदरसा काढला होता.

## ५. जनानखाने व मीनाबाजार

मोगल बादशहांच्या जनानखान्यास अंत:पूर म्हटले जाई. अबूल फझलच्या मतानुसार सम्राट अकबराच्या जनानखान्यात ५००० हून अधिक स्त्रिया होत्या तर मनूचीच्या मते, जनानखान्यातील स्त्रियाचे जीवन एखाद्या कैद्याप्रमाणे होते, शहाजहानच्या कालखंडामध्ये जनानखान्यात २००० स्त्रिया होत्या 'असे होते मोगल' या आपल्या ग्रंथात निकोलस मनुची याने जनानखान्याच्या अंतर्गत व्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. अकबरापासून औरंगजेबपर्यंत जनानखान्याचे स्वरूप भव्य दिव्य असल्याचे तत्कालीन प्रवासी आपल्या प्रवास वर्णनामध्ये सांगतात. अकबर स्त्रियांचा मिनाबाजार भरवून सुंदर स्त्रियांचा शोध घेत असे. जनानखाने व मिनाबाजारामुळे स्त्रियांचा सामाजिक व नैतिक दर्जा घसल्याचे स्पष्ट होते.

## ६. मनोरंजन

नृत्य व मनोरंजनाची साधने मुघलकालखंडात अस्तित्वात होती. सम्राट अकबर तर दरबारातील गुलाम वर्गांच्या स्त्रियाबरोबर बुद्धिबळाचा खेळ खेळत असे.

## ७. संगीत व गायनकला

हिंदूप्रमाणे मुस्लिम स्त्रियांनाही या क्षेत्रात कुशल असल्याचे दिसून येते. मुघल दरबारामध्ये संगीतकार व गितकारांना आश्रय देण्यात आल्यामुळे नुरजहाँ बेगम, झेब्बुनिसा बेगम या सारख्या मुस्लिम स्त्रिया गीत रचनाकार होत्या.

## ८. पोषाख व अलंकार

मुस्लिम स्त्रिया सलवार-कमीज परिधान करीत असत. श्रीमंत स्त्रिया सुवासिक तेल अत्तर यांचा वापर करीत असत सौंदर्य प्रसाधनाचा स्त्रिया मोठया प्रमाणात वापर करत असत. चंदनाच्या लेपाला प्राधान्य असे. मुस्लिम स्त्रिया डोळयात सुरमा घालत असत. कशिदाकाम केलेली सुती वस्त्रे, रंगीबेरंगी वस्त्र प्रावधान करणे हा उच्च कुलीन स्त्रियांचा महत्त्वपूर्ण पेहराव होता.

## ९. मोगल राजपूत विवाह संबंध

इ.स. १५६२ मध्ये रजपूत राजा भारमल याने आपली मुलगी अकबरास दिली. लग्नात प्रथम हिंदु मुलींना मुस्लिम करूनच मग मुस्लिम पद्धतीने लग्न लावण्यात येत असत. अकबराचा मोठा मुलगा सलिमचा विवाह जोधपूरच्या राजकन्येसोबत झाला. विवाहसंबंधामुळे प्रशासन व राजकीय संबंध दृढ होण्यास सुरूवात झाली. मात्र स्त्रियांचा वापर नातेसंबंध दृढ करण्यापेक्षा राजकीय सत्ता हस्तांतरीत करण्यासाठी होत असे.

## १०. कर्तृत्ववान स्त्रियाचे राजकारणातील स्थान

मुघलकालखंडामध्ये स्त्रियांवर अनेक बंधने असूनही राजकारण, समाजकारण व प्रशासनामध्ये अनेक स्त्रियांनी प्रभाव पाडला. एहसान दौलत बेगम ही बाबराच्या काळात प्रशासनामध्ये सहभागी होती, कुतलग निगर खान, माहीम बेगम, खानजादा बेगम, गुलबदन बेगम, हिरम बेगम, यांनी प्रशासनाबरोबरच

युद्धातही नेतृत्व केले. हुमायूननामाचे लेखन गुलबदन बेगम हिने केले. जोधबाईने अकबराच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, बख्तनुसी बेगम, मिरीयम मकानी, सलेमा सुलताना बेगम, मखदुम्माई जहान या राजकारण व प्रशासनात सक्रीय होत्या.

अहमदनगर राज्यातील चांदबिबी आपल्या कर्तृत्वासाठी प्रसिद्ध होती, नुरजहाँ हीने जहाँगिरच्या मृत्यूनंतर स्वत: प्रशासनाची सूत्रे हाताळली. कला, साहित्य व संस्कृतीच्या क्षेत्रात तीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. शहाजहाँनवर मुमताज महालचा प्रभाव होता त्याबरोबरच जहानअरा बेगम, रोशनअरा बेगम, शाहाबेगम, झेबुन्नीसा, झिनतुनिसा यांनी प्रशासनावर नियंत्रण ठेवले. विजापूरच्या दरबारामध्ये बडी साहीबा तर बंगालमध्ये अलीवर्दीखानची पत्नी, ओरीसात मुर्शिदा कुलीखानची पत्नी याबरोबरच अन्य स्त्रिया राजकीय व प्रशासकीय दृष्टया मुघल कालखंडामध्ये मुघल प्रशासन व राजकारणामध्ये प्रभावी ठरल्या.

## ११. साहित्यक्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या स्त्रिया

मुगल कालखंडामध्ये गुलबदन बेगम, गुलरूख बेगम सलिमा सुलतान बेगम इत्यादी पर्शियन भाषेत उत्कृष्ट कवयित्री होवून गेल्या. अरबी भाषेतील कवयत्रीमध्ये जान बेगम नुरजहान या बरोबरच झिनतुन्नीसा यांचा उल्लेख करता येईल. कमी अधिक प्रमाणात या स्त्रियांनी धार्मिक व निधर्मी साहित्यांची निर्मिती केली. मात्र या साहित्यनिर्मितीचे प्रमाण अत्यल्प होते.

### सम्राट अकबरांच्या स्त्री सुधारणा

अबुल फझलने लिहिलेल्या 'आईन-ए-अकबरी' या ग्रंथात अकबराच्या स्त्रीविषयक सुधारणांची माहिती मिळते.स्त्री सुधारणाबाबत त्याने अत्यंत पुरोगामी भूमिका घेतली. उदा.

१. मुलीचे वय १४ व मुलाचे वय १६ असल्याशिवाय लग्न करू नये. २. एकपत्नीकत्त्व पद्धत मुस्लिमात रूढ व्हावी. ३.हुंडा पद्धतीस विरोध केला. ४. वेश्या व्यवसायाचे नियंत्रण केले. ५. सतीच्या चालीस विरोध केला.६.पुनर्विवाहास मान्यता दिली. ७. वयस्क स्त्रियांनी बुरखा न वापरण्याच्या सूचना केल्या. अकबराच्या सुधारणेबाबत अतिशय प्रागतिक दृष्टिकोन दिसून येतो. मात्र सभोवतालच्या परिस्थितीमुळे

अकबर अमुलाग्र बदल करू शकला नाही. मात्र राजवैभवामध्ये वावरणाचा उच्चभ्रू महिलांनी त्या सुधारणाचा वापर मात्र केल्याचे दिसून येते.

एकंदरीतच मध्ययुगीन विशेषत: मुघलकालखंडामध्ये मुस्लीम स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी स्वातंत्र्य होते. सामाजिक व धार्मिक जीवनातील स्त्रियांचा दर्जाही ढासळत चाललेला होता. नैतिकतेच्या नावाखाली पडदा पद्धती, बहुपत्नीत्व, घटस्फोट, तलाकयांमुळे स्त्रियांना नेहमीच दुय्यमत्वाला सामोरे जावे लागत असे.

## क) मध्ययुगीन हिंदु स्त्रियांचा दर्जा

भारतामध्ये तुर्कांचे आगमन झाले. त्यांनी त्यांचा धार्मिक व सामाजिक वारसा सोबत आणला स्त्रियांसंबधी त्यांची जी धोरणे होती ती भारतीय हिंदू संस्कृतीने स्वीकारली व मध्ययुगीन हिंदू स्त्री जीवनामध्ये कमालीचे परिवर्तन झाले.

खालील घटकांच्या आधारे मध्ययुगीन हिंदू स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन स्पष्ट करता येवू शकते

### १. बालविवाह

जी.एन. शर्मा यांनी आपल्या 'सोशल लाईफ इन मिडीएव्हल राजस्थान' या ग्रंथामध्ये बालविवाहाचे वर्णन केले आहे. मारवाडी जमातीत मुलगी दीड वर्षाची व मुलगा तीन वर्षाचा अशा विवाहांचे उल्लेख येतात. मात्र साधारणत: ८ ते १८ वर्षापर्यंत विवाह उरकले जात. या एका घटनेवरून स्त्री अस्तित्वाबदल असणाऱ्या हिंदूधर्मिय मानसिकतेची कल्पना येते.

### २. हुंडा पद्धत

कन्या जन्म अशुभ मानण्याचे एक कारण म्हणजे हुंडा पद्धती होय. या पद्धतीलाच 'नेग' असे म्हणत. ही पद्धत राजस्थानात होती. मात्र या पद्धतीमुळे गरीब कुटुंबाचे कंबरडे मोडत असे. दक्षिण भारतात हुंडयाला 'अरनाम' म्हटले जाई.अरनम म्हणजे मुलींच्या आईवडीलांकडून मुलाच्या आई वडींलाना दिलेली भेटवस्तू. पैशाच्या लोभापायी पुरूषाचे अनेक लग्ने करण्याचे प्रकारही वाढीस लागले.

जनावरांच्या किंमती प्रमाणे स्त्रियांची किंमत ठरत असे. त्यामुळे निश्चित समाजामध्ये स्त्रियांना दुय्यमत्व प्राप्त झाले.

### ३. बालहत्या

मध्ययुगीन भारतीय समाज व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे बालहत्या होय. स्त्री अर्भकाची हत्या हे तर राजपूत समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण होते. सामाजिक स्थितीबद्धता, शिक्षणाचा अभाव व गतिशिलतेच्या अभावी एकूणच मुलीच्या जन्माला समाजात कसलेच महत्व नव्हते. भविष्यातील संकटाचा सामना न करण्यासाठी स्त्री अर्भकाची सर्रास हत्या केली जात असे. मुलीचा जन्म ही अशुभ घटना मनाली जात असे. स्त्री अर्भकाचा जन्म हा अनेक दुःखाचे कारण मानले जात असे शिवाय हुंडा पद्धतीमुळे स्त्री हा कुटुंबावरील बोजा मानला जाई. एकंदरीतच मुलीचा जन्म आणि तिचे आयुष्य अतिशय वाईट होते.

### ४. वेश्या व्यवसाय

मध्ययुगात ही पद्धत प्रचलीत होती. सार्वजनिक मनोरंजनाच्या कार्यक्रमाच्या वेळी, धार्मिक उत्सवाच्या वेळी, नृत्य व गायन प्रसंगी स्त्रियांचा वापर वेश्याव्यवसाय व हेरगिरीसाठी करण्यात येत असे. मात्र या व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रिची अवस्था शोचनीय होती.

### ५. बहुविवाह पद्धत / बहुपत्नीत्वाची रूढी

समाज व्यवस्थेतील श्रीमंत व वरिष्ठ वर्गामध्ये बहुविवाह पद्धती अस्तित्वात होती. सामाजिक प्रतिष्ठेसाठीसुद्धा बहुविवाह करण्यात येत असे. उत्तरोत्तर समाजातील अन्य वर्गामध्ये ही पद्धती विस्तारत गेली. डॉ.चिटणीसाच्या मते, 'होयसळाच्या एका शिलालेखाप्रमाणे राजा नरसिंहदेवाच्या ३८४ पत्नी होत्या. तर कृष्णदेवरायाच्या १२ पत्नी होत्या आणि त्या काळात जास्त पत्नी असणे भूषणावह मानले जात असे. निकोलो कोन्टीच्या मते, 'विजयनगर शासकाने अनेक स्त्रियांशी विवाह केले होते. डॉ.चिटणीसांनी म्हैसुरच्या राजांचे हरेमही मोठे असल्याचे म्हटले आहे. विजयनगर राज्यातील

बहुपत्नीत्वाचा व बहुविवाह प्रथेचा उल्लेख ते करतात. या पद्धतीमुळे स्त्रियांमध्ये कौटुंबिक संघर्ष उद्‌भवत असत

## ६. विधवांची स्थिती

मध्ययुगामध्ये विधवांची स्थिती अतिशय कठीण, दयनिय स्वरूपाची होती. संपूर्ण भारतातच तिला सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात भाग घेणे निषिध होते. वैधव्य हे मध्ययुगीन स्त्री जीवनाला लागलेला अभिशाप होता. स्त्रियांच्या जीवनाचा आधार पतीच असल्यामुळे पतीनिधनानंतर स्त्रिचे सर्व आयुष्यच संपल्यात जमा होते. विधवा स्त्रिला पतीच्या मालमत्तेत हिस्सासुद्धा मिळत नसे. आश्रित राहूनच ती जीवन कंठीत असे. राजपूत शासकांनी विधवांची स्थिती सुधारण्यासाठीचे प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराज राजमलने विधवेची मालमत्ता जप्त करण्यावर बंदी घातली तर कोटा व जोधपूरच्या विधवांना सरकारकडून नियमित मदत मिळत असे.

## ७. सती पद्धत

मध्ययुगामध्ये सतीप्रथेचे दोन प्रकार अस्तित्वात होते.

१. सहगमन - म्हणजे मृत पतीसोबत स्वत:स जाळून घेणे.

२. अनुगमन - मृत पतीच्या एखाद्या वस्तुसोबत स्वत:ला जाळून घेणे. प्रसिद्ध यात्रेकरू इब्नबतूता याने आपला ग्रंथ 'रेइला ऑफ इब्नबतूता' यात तत्कालीन सती जाण्याचे प्रसंग स्वत: बघितल्याचे अनेक उल्लेख आहेत.

विधवेचे दयनीय व शोचनीय जीवन जगण्यापेक्षा सती जाणेच योग्य वाटत असे. निकोलो कोन्टी ने असे लिहिले की, जर स्त्री सती गेली नाही तर तिच्या पतीची संपत्ती तिच्या मुलांऐवजी इतर नातेवाईकांना दिली जात असे. राजस्थान व बंगालमध्ये सती जाण्याची सक्ती होती. कोरोमंडल किनाऱ्याच्या प्रदेशात जमिनीत नऊ दहा फुट खोल आणि वीस पंचवीस फूट लांब-रूंद असा खड्डा खणीत तो खड्डा लाकडाच्या ओंडक्यांनी भरीत त्यावर तेल ओतून मृत पती व त्याच्या पत्नीला ढकलून पेटवून देत, ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न दिल्ली शासकांनी केला असल्याची माहिती इब्नबतूताने दिली आहे.

## ८. जोहार

मुख्यत: ही प्रथा राजपूत स्त्रियांमध्ये होती. पती रणभूमीवरून परत येणार नसल्याची किंवा युद्धात हरल्याची बातमी येताच स्त्रिया आपल्या सतीत्वाच्या रक्षणासाठी धगधगत्या अग्निकुडांत उडी घेत असत. इ.स. १३०१ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने रणथंबोरच्या किल्ल्याला वेढा दिल्यानंतर राणी पद्मावतीसह अनेक स्त्रियानी जोहार केला.इ.स.१५५३ मध्ये बहादुरशहाने चित्तोडला वेढा दिल्यानंतर राणी कर्णावती व इतर स्त्रियांनी जोहार केल्याचे दिसून येते. पतीच्या पराभवाचे पर्यावसान प्राणाहुती देवून करणे हे मध्ययुगीन हिंदुधर्माचे ठळक वैशिष्टय होते.

## ९. शैक्षणिक पिछेहाट

मुघलपूर्व कालखंडात शिक्षणाची जशी खालावलेली परिस्थिती होती तशीच मुघलकालखंडामध्ये ती जास्तच खालावली. मुस्लिम शासनव्यवस्थेमध्ये अनेक सरदार घराणी पुढे आली व त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. पण अशी घरानीं ही थोडीच होती व राजपूत राजघराण्यातील स्त्रियांना थोडेबहुत शिक्षण मिळे पण साधारणपणे स्त्री शिक्षणाचा अभावच होता. त्यामुळे सामान्य वर्गातील स्त्रियांमध्ये अंधश्रद्धा, अज्ञान, दांभिकपणा इत्यादी गोष्टी आढळत होत्या. स्त्री शिक्षणाविषयी समाजात अनेक गैरसमज होते. सामान्य वर्गातील स्त्रियासुद्धा लष्करी शिक्षण घेवून जनानखान्यात अंगरक्षक वगैरे होत असत. मात्र पडदा पद्धती, बालविवाह किंवा घरी शिक्षक बोलावण्याची ऐपत नसणे या कारणामुळे मुली शिक्षणापासून वंचित राहत असत.

## १०. कुटुंबाची मालमत्ता व स्त्री हक्क

हिंदु स्त्रियांना वडीलाच्या संपत्तीवर हक्क सांगता येत नव्हता. फक्त लग्नप्रसंगी स्त्रिधनात मिळणाऱ्या वस्तुवर तिचा हक्क असे. एकंदरीतच पुरूषाची मालमत्ता असलेल्या स्त्रिला व्यक्ती म्हणून पती निवडण्याचा अधिकार तर नव्हताच,संपत्तीवर कसल्याच प्रकारचा अधिकार नव्हता. हिंदु स्त्रियांना तर पतीच्या संपत्तीवरही हक्क सांगता येत नव्हता व संपत्तीचे खरे वारसदार कुटुंब व मुले असत.

## ११. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया

सामाजिक विषमतेची इतकी भयानक दरी असताना मध्ययुगामध्ये स्त्रियांनी आपल्या कर्तव्याला उभारी देण्याचा प्रयत्न केला. लष्करात, प्रशासनात, राजकारणामध्ये स्त्रियांनी खूपच महत्त्वाची भूमिका बजावली उदा. चित्तोडची राणी कर्णावती, गोंडवाणाची राणी दुर्गावती, शिवाय दक्षिणेतील कृष्णदेवराय यांच्या दोन राण्या. चिन्नादेवी व तिरूमलादेवी याबरोबरच राणी चन्नम्मा केळदी येथून स्वतंत्र राज्यकारभार करत होती. उत्तर बंगामधील नाटोर संस्थानची प्रमुख राणी भवानी ही आपल्या राज्य कारभारासाठी प्रसिद्ध होती.

जिजाबाई, येशूबाई, ताराबाई, आहिल्याबाई यांनी मध्ययुगीन कालखंडातील विविध चालीरीती पंरपरा अस्तित्वात असूनही आपल्या स्वकर्तृत्वाने राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रगती केली.

एकंदरीत मध्ययुगीन काळात स्त्रियाचे जीवन व दर्जा खालावलेला होता. एकूणच मध्ययुगात स्त्रियांना फारसी प्रतिष्ठा नव्हती. ९५ टक्के स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल, मूल व काबाडकष्टांची, शेतीची कामे करणे एवढेच होते. धार्मिक अंधश्रद्धा व रुंढी परंपरा यामुळे स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील वावर फारसा नव्हता. स्त्री हे भोगविलासाचे साधन अशी समाजाची धारणा होती. हिंदूस्त्रियांपेक्षाही मुस्लिम स्त्रियांचे जीवन वाईट होते. मुस्लिमातही बालविवाहाची प्रथा होती. बहुपत्नीत्व होते. बालहत्या होत असत. दत्तक वारसा नव्हता. स्त्रिला मालमतेचा अधिकार नव्हता ती फक्त वस्तुच होती. अशा कठीण प्रसंगामधून स्त्री युगानूयुगे जातच होती तुरळक प्रयत्न शासकाद्वारे जरी करण्यात आले असले तरी स्त्रियांचे स्थान व दर्जा समाजामध्ये निम्न स्वरूपाचाच होता.

## ड) मराठेशाहीच्या कालखंडातील स्त्रियांचा दर्जा

मराठेशाहीच्या कालखंडातील स्त्रियांच्या रूढीगत व वैधानिक दर्जाची मांडणी करताना या युगाच्या वैशिष्ट्यांची पाहणी करावी लागते. हा कालखंड परंपरागत आचार धर्मावर भर देणारा होता. सर्व प्रकारच्या सामाजिक बंधनांना प्रमाण मानणारा व बालविवाह पद्धती, हुंडा पद्धती, सती पद्धती, बहुविवाह

या संस्था निर्बधपणे कार्यरत होत्या आणि या युगातूनच मराठेशाही आकाराला येत होती. खालील घटकांच्या आधारे मराठेशाहीकालीन स्त्रियाच्या दर्जाचे वर्णन करता येईल

**१. बालविवाह**

आठ वर्षाच्या आतच मुलीचे लग्न झाले पाहिजे, असा धार्मिक दंडक होता. ही बालविवाह पद्धत सर्रास व सर्वच वर्गात अस्तित्वात होती. बाजीराव पेशव्यांनी तर नऊ वर्षापुढील कोणतीही मुलगी अविवाहीत राहू नये असा सक्त हुकुम काढला. बालविवाहामुळे पेशवेकाळात जरठकुमारी विवाहाला सुरूवात झाली. त्यामुळे मुलीचे जीवन धोक्यात आले. वयात येण्यापूर्वी मुली विधवा होत. हे या कालखंडाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य होते.

**२. बहुपत्नीविवाह**

अगोदरचच दयनीय असलेली स्त्रियाची स्थिती बहुविवाह पद्धतीमुळे अधिकच दयनीय झाली होती. श्रीमंत व राजघराण्यामध्ये ही प्रथा होती. मराठा व पेशवा कालखंडातील महत्त्वपूर्ण राज्यकर्त्यांनी यामध्ये योगदान दिले होते. समाजामध्ये आपला दर्जा निर्माण करण्यासाठी असंख्य स्त्रियांचे आयुष्य उध्वस्त केले गेले.

**३. हुंडा पद्धत**

उच्च वर्गामध्ये हे प्रस्थ होते. कन्येच्या वडीलांकडून द्रव्य घेणे हाच समाजाचा नैतिक धर्म होता. महाराष्ट्रभर विशेषत: देश व समुद्र किनारा परिसरात ही पद्धत जास्त प्रमाणामध्ये होती. ती कमी करावी म्हणून गोपीकाबाईने फडणविसांना विनंती केली. ही पद्धती समाजातील गरीब वर्गातही मोठयाप्रमाणात रूजल्यामुळे स्त्री जीवन असहय झाले.

**४. विधवा विवाह**

महाराष्ट्रात विधवा पुनर्विवाहाला 'पाट' असे म्हणत.स्त्रियांवर चोहोबाजूनी बंधने घालून स्त्रियांना पुनर्विवाह करू नये  हा नियम आचरण्यात आणण्याचे श्रेय ब्राह्मणांना जाते असा युक्तीवाद श्री.ना.गो.चापेकर यांनी केला. मनू म्हणतो की, पतीच्या मृत्यूनंतर परपुरूषांचे नावही घेवू नये. मात्र

महार, ठाकुर व कातकरी जमातीत पतीला बदलने अगदी सोपे आहे असे डॉ.चिटणीसाचे मत आहे. कनिष्ठ जमातीमध्ये घटस्फोटाची तरतूद असल्यामुळे स्त्रिया अधिक सुखी होत्या. सहजासहजी विधवाचा पुनर्विवाह होत नसे त्यामुळे कमी वयात विधवा झालेल्या मुलींची संख्या जास्त होती व त्यांचे जीवन असहय होते.

**५. सती पद्धत**

धर्मासिंधू यांनी निर्णयसिंधू हा ग्रंथ १७ व्या शतकामध्ये लिहिला गेला.त्याग्रंथामध्ये सती संबंधी विस्तृत चर्चा करण्यात आलेली असून मराठा व पेशवे कालखंडात सती जाणाऱ्या स्त्रिचे प्रमाण हे सर्वच जमातीत असल्याचे पहावयास मिळते. मराठा राज्यातील हिंदु राजांच्या मुस्लिम बायकाही सती जात असत. १७ व्या शतकातील प्रवासी ट्रव्हनियर ने शुद्र स्त्री सती जाताना पाहिल्याचे वर्णन केले आहे. ब्रिटीशांनी य पद्धतीला कायदेशीर विरोध करण्याचा प्रयत्न केला, असला तरीही समाजातील स्त्री जीवनाला सतीप्रथा हा लागलेला अभिशाप होता.

**६. शिक्षण**

स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी पंतोजीच्या शाळेमध्ये काही सुधारणा नक्कीच झालेल्या नव्हत्या आणि समाजातील कनिष्ठ वर्ग गुरूजींना घरी आणून आपल्या पाल्याना शिकवू शकत नव्हता. जातीयता प्रगल्भ असल्यामुळे शुद्र व स्त्रियांना मराठा कालखंडामध्ये समाजाने पवित्र शिक्षणापासून दूरच ठेवले.

उच्च वर्णीय व श्रीमंताची मुलेच पंतोजीच्या शाळेत जात असत शिवाय लष्करी शिक्षण ही घेत असत. मात्र स्त्री शिक्षणाच्या बाबतीत एकंदरीत समाजव्यवस्था स्थितीशील होती.

**७. कुटुंबातील स्त्रियांचे स्थान**

मुळातच स्त्रियांना कुटुंबात परावलंबित्व बहाल करण्यात आलेले होते. वडील, पती व मुलगा यांच्या नियंत्रणाखाली ती आजन्म असे. स्वतंत्र पणे जगणे तिला अशक्य होते. विवाह, घटस्फोट व वारसा यात त्यांना कसलीच किंमत नव्हती.

## ८. स्त्रियांना कायदेशीर हक्क

वडीलोपार्जित मालमत्तेमध्ये मुलांलाच अधिकार असे. एकत्र कुटुंबात स्त्रिची कुचंबनाच होती. पतीच्या मृत्यूनंतर तिला फक्त पोटगीच मिळत असे. स्त्रिधनाचा जरी हक्क असला तरी अडचणीच्या प्रसंगी पतीकडून तो हिरावून घेतला जात असे. हिंदू कायदयाने पत्नी ही पतीच्या मिळकतीत सहभागीदार मानलेली नव्हती. स्त्रियांना शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, स्वातंत्र्याचा अभाव होता.

## ९. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया

शिवकाळ व पेशवे कालखंडात स्वकर्तृत्वाने काही स्त्रियांनी इतिहासामध्ये आपले नाव कोरले. त्यामध्ये जिजाबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर राणी लक्ष्मीबाई या प्रमुख होत्या.

एकंदरीतच शिवकालखंड व पेशवे कालखंडामध्ये स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा विशेषत: पेशवे कालखंडामध्ये कमालीचा घसरला होता हे आपल्याला जरठविवाहातून दिसून येते. धर्माचे, कुटुंबाचे, समाजाचे सर्वांचेच बंधन निमूटपणे सहन करणारी एकमेव वस्तू म्हणजेच स्त्री होती. स्त्री हे नरकाचे प्रवेशद्वार मानणाऱ्या व्याख्येत पेशवे कालीन स्त्री ही चपलख बसत होती. मानवी मूल्ये व मानवतावाद या विचारसणीला टाकून दिलेल्या पेशवे युगात तर सतीप्रथा, बालविवाह, बालहत्या, जरठविवाह, बहुपत्नीविवाह, या व अन्य जसे विधवा पूनर्विवाहाला विरोध या सारख्या प्रथामधून रोगट समाजाची कल्पना येते.

या कालखंडामध्ये स्त्रियांचा दर्जा व स्थान पशुपेक्षाही शुद्र स्वरूपाचे होते. जगामध्ये प्रबोधन युग असताना, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विस्तार होत असताना पेशवे कालखंडामध्ये सर्रास धर्माच्या नावाखाली देवदासी, वाघ्यामुरळी या बरोबरच वरील सर्व प्रथा अगदी राजरोसपणे चालत असत. त्यांना धर्माद्वारे अभय प्रदान करण्यात आले होते.स्त्रियांना दुय्यमत्वाचा दर्जा हे या युगाचे एक महत्त्वाचे वैशिष्टये होते.

**स्वयंअध्ययन प्रश्न - २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुस्लिम कायद्यात घटस्फोटाचे कितीप्रकार होते ?

२. सल्तनत कालखंडामध्ये पडदा पद्धती कडक करण्याचा प्रयत्न कोणत्या शासकाने केला ?

३. 'सोशल लाईफ इन मिडीएव्हल राजस्थान' हा ग्रंथ कोणी लिहीला?

४. आईन -ए-अकबरी या ग्रंथाचे लेखक कोण ?

५. मुस्लिम समाजातील विवाह प्रसंगी पतीने पत्नीला दिलेल्या रकमेला काय म्हणतात ?

**ब) योग्य पर्याय निवडा**

१. 'असे होते मोगल' हा ग्रंथ . ........यांनी लिहीला.

अ) साकी  ब) इब्नबतूता  क) निकोलस मनुची  ड). अबुल फझल

२. राजस्थानात अस्तित्वत असलेल्या हुंडा पद्धतीला........ म्हणतात.

अ) मेसर  ब) नेग  क) खोती  ड) मीनाबाजार

३. मिनाबाजार ......... यांनी भरवला

अ) अकबर  ब) औरंगजेब  क) अल्तमश  ड) अल्बूकर्क

४. सम्राट अकबराच्या स्त्री सुधारण्याचे वर्णन .......... यांनी केले.

अ) इब्नबतुता  ब) अबूल फझल  क) साकी  ड) रज्जाक

५. शुद्र स्त्री सती जातांना ............. या प्रवाशांनी पाहीले

अ) निकोले डी कोंटी  ब) ट्रव्हेनियर

क) डॉ. चिटणीस  ड) . कर्नल टॉड

## १.२.३ आधुनिक काळातील स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

### अ) वसाहतकालीन स्त्रियांचा रूढीगत आणि वैधानिक दर्जा

भारतामध्ये परकीय सत्तेच्या विस्तारानंतर युरोपातील प्रबोधनाचा विचार रूजला. भारतामध्ये प्रशासन करत असताना परकीय शासकाना भारत समजून घ्यायचा होता आणि जेव्हा भारतीय इतिहासाचे व वर्तमानाचे विश्लेषण ब्रिटीशांनी करण्यास सुरूवात केले तेव्हा भारतीय सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय वास्तवाचे दर्शन त्यांना घडले.

शिक्षणाच्या व पाश्चात्य ज्ञानाच्या माध्यामातून सर्वकष समाज निर्माण करण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. मात्र हया नवविचाराचा वसा आणि वारसा घेऊन पूर्ण परिवर्तन करून घेण्याची जबाबदारी पूर्णत: भारतीयांची होती. ती पूर्ण करण्यात ते कितपत यशस्वी झाले हा मुद्दा नंतरचा मात्र आपण वसाहतकालीन भारतीय स्त्रियांच्या दर्जाचा विचार इथे करणार आहेत.

### १. सती प्रथा

बंगाल, राजपुतांना, दक्षिण भारतामध्ये ही प्रथा खूप मोठया प्रमाणात होती. इ.स.१८६८मधील जी.बी.जोशी लिखित 'पुणे शहराचे वर्णन' या पुस्तकात सती प्रथेचे वर्णन आढळून येते. संपूर्ण भारतामध्ये या प्रथेचे प्रस्थ होते. प्रथम ब्रिटीशांनीही भारतीय धर्मामध्ये ढवळाढवळ करायचे नाही असे ठरवले मात्र उत्तरोत्तर गंभीर होत चाललेल्या या सती प्रथेने ब्रिटीश प्रशासकीय अधिकारी सुद्धा उद्‌वीन झाले.

ही पद्धतीचा समूळ नष्ट करण्याचा पहिला प्रयत्न राजा राममोहन रॉय यांनी केला व ब्रिटीशांना या प्रश्नांत सखोल लक्ष घालायला भाग पाडले. ४ डिसें १८२९ मध्ये लार्ड विल्यम बेंटिग याने कायदयाने सतीबंदी केली आणि भारतातील स्त्रियांच्या अस्तित्वाची नोंद घेण्याचे रचनात्मक कार्य ब्रिटीशांनी करावयास सुरूवात केली.

### २. बालहत्या / स्त्री भ्रूणहत्या

कच्छ, गुजरात, राजस्थान, बंगाल या प्रांतामध्ये स्त्रीभ्रूणहत्येचावापर मोठया प्रमाणात होत असे. मुलगी जन्माला येणे अभिशाप समजून ती जन्मास येताच उपाशी ठेवून किंवा अफू देवून तिला मारून

टाकले जाई. कर्नल टॉड च्या मते राजस्थानमध्ये दुधाच्या उकळत्या कढईमध्ये मुलीला टाकून मारण्यात येई. या पद्धतीला 'दूध पिती' पद्धत म्हटले जात असे.

या क्रूर पद्धतीचा बिमोड भारतीय सुधारकांनी ब्रिटीशांच्या मदतीने केला. इ.स.१८०४ मध्ये बालहत्या बेकायदेशीर ठरवण्यात आली व असे करणाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येऊ लागला. पश्चिम भारतात या प्रथेविरोधी मानवतावादी कृतिशील समाजसुधारक जोतिबा फुले यांनी इ.स.१८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. इ.स. १८७० मध्ये कायदा करून जन्मलेल्या बालकांची नोंद करणे कायदेशीर ठरवण्यात आले. त्यामुळे स्त्री अर्भकाची संख्या वाढण्याबरोबरच मुलीच्या प्रति समाजामध्ये सकारात्मक आदरभाव वाढीस लागला.

**३. बालविवाह बंद**

१९ व्या शतकामध्ये ही प्रथा अगदी जोमाने सुरू होती. धर्मशास्त्राचा आधार व पितृसत्ताक संस्कृतीचा वारसा असणारी ही पद्धती बंद करावी हा विचार १९ व्या शतकात सुरू झाला. बालविवाहाचे अनिष्ठ परिणाम लक्षात घेवून सरकारद्वारे इ.स. १८६० मध्ये समंती वय १० वर्षे ठरवून कायदा करण्यात आला. १८७२ साली केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नामुळे नागरी कायदा पास झाला. त्यानुसार मुलीचे वय १४ व मुलाचे वय १८ ठरविण्यात आले. इ.स. १८९१ मध्ये बेहरामजी मलबारी यांच्या प्रयत्नाने 'संमती वयाचा कायदा पास' करण्यात आला. गुजरामध्ये इ.स.१९२९ मध्येच बालविवाह प्रतिबंधक कायद्याद्वारे बालविवाहास बंदी घालण्यात आली तर, इ. स. १९२९ मध्ये 'शारदा' कायदा पास करण्यात आला. या विविध कायद्यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारण्यास मदत झाली.

**४. विधवा विवाहास संमती**

बालविवाह व जरठविवाहामुळे जीवन सुरू होण्यापूर्वीच वैधव्य येत असे. त्यामुळे विधवांची समस्या ही समाजाला लागलेली कीड होती. भारतभर ही अमानुष प्रथा अस्तित्वात होती पण त्याविरूद्ध फारसा आवाज उठवण्यात आला नव्हता. वसाहत कालखंडामध्ये बुद्धिवादी व शिक्षित लोकांनी स्त्रिमुक्तीसाठी प्रयत्न सुरू केले. त्यामध्येईश्वरचंद्र विद्यासागर यांनी वैदिक साहित्याचा आधार घेवून

विधवा विवाहास मान्यता होती हे सिद्ध केले व एक हजार सह्यांचा विनंती अर्ज भारत सरकारकडे सादर केला व १८५६ साली लार्ड डलहौसीने विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. महात्मा फुले, धो.के.कर्वे, विरलिंगम पंतलू यांनी आपापल्या राज्यामध्ये पुनर्विवाहाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे उत्तरोत्तर भारतभर विधवा विवाहासंबंधी सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

**वारस हक्क**

१९ व्या शतकापर्यंत स्त्री आणि संपत्तीचा काढीमात्र संबंध नव्हता. किंबहुना स्त्रिधनसुद्धा बळजबरीने हिसकावून घेतले जाई किंवा एकत्रित कुटुंबपद्धतीमध्ये त्या धनाचा अन्यत्र विनियोग केला जात असे. मात्र इ.स. १९२९ मध्ये 'हिंदू लॉ ऑफ इन्हेरिटन्स ॲक्ट' मंजूर करण्यात आला. त्यानुसार कन्येला वारसाने मिळालेली मिळकत हे स्त्रिचे संपूर्ण मालकीचे धन असून ते स्त्रियासाठीच राखीव ठेवण्यात आले. इ.स. १८९६च्या मॅरेज ॲक्ट नुसार घटस्फोटित पत्नी व तिच्यामुलांना पोटगीच्या अधिकार दिला. इ.स. १९३७ मध्ये 'हिंदू वुमेन्स राईट टू प्रॉपर्टी ॲक्ट' नुसार विधवेला नवऱ्याच्या संपत्तीत हक्क बहाल करण्यात आला. वारसा हक्क कायदयाद्वारे मिळाल्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनाचा प्रश्न सुटण्याबरोबरच संपत्ती धारण व हस्तांतरण सुलभ झाले.

**घटस्फोट**

घटस्फोटासंबंधी सर्वच धर्मातील घटस्फोटाचे कायदे मुळातच वेगवेगळे आहेत. मात्र या बाबतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यमत्व देण्यात आले असून होणाऱ्या शारीरिक व मानसिक शोषणाविरूद्ध स्त्री काही घटस्फोट मागूच शकत नव्हती. मात्र १९३९ च्या कायदयाने स्त्रियांना आपल्या पतीपासून घटस्फोट मागण्याचा कायदेशीर अधिकार बहाल करण्यात आला. त्याबरोबरच १९३५ व १९३९ कायद्यानुसार मुस्लिम स्त्रियाचा दर्जा सुधारला. १९३६ च्या पारशी विवाह व घटस्फोट कायद्याने पत्नीलाही घटस्फोटाचा

हक्क बहाल केला.हिंदू, बौद्ध, जैन, पारशी, मुस्लिम या धर्मामधीलस्त्रिया या व्यक्ती असून त्यांना दडपणाशिवाय स्वातंत्र्यपूर्वक जगता येवू शकते हे या कायदयाने दाखवून दिले.

## देवदासी प्रथा

देवदासी प्रथेने स्त्री जीवन ढवळून निघाले होते. अतिशय विकृत सामाजिक संस्था म्हणजेच ही प्रथा होती.स्त्रियांना शरीरविक्रय करावा लागे. कर्नाटक व महाराष्ट्रात ही प्रथा मोठया प्रमाणात होती. दलित व इतर मागासवर्गीयामध्ये ही प्रथा मोठ्या प्रमाणात होती. डॉ.आंबेडकरांनी इ.स.१९२५ मध्ये निपाणी येथे देवदासी प्रथा बंद करण्यासाठी परिषद घेतली. इ.स.१९३४ मध्ये ब्रिटीशांनी देवदासी प्रतिबंधक कायदा पास केला. म्हैसूर सरकारने इ.स.१९१० मध्ये देवदासी प्रथा कायद्याने बंद केली आणि पिढयानवपिढयाच्या वेदनेपासून स्त्री मुक्त होण्यास मदत झाली.

## वेश्याव्यवसाय

१९ व्या शतकामध्ये संपूर्ण भारतामध्ये ही प्रथा अस्तित्वात होती.'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकरांनी त्यावर नाराजी व्यक्त केली. समाजातील प्रतिष्ठित लोक रखेल्या ठेवत. वैधव्यामुळेही लोक रखेल्या ठेवत. सामाजिक जाणिव बोथट असलेला धनाढय वर्गाने तर या प्रथेतून सामाजिक विकृतीच निर्माण केली.इ.स.१८६८ मध्ये सरकारने कायदा पास करून वेश्याची नोंदणी, शारीरिक तपासणी सक्तीची केली. रोगग्रस्त वेश्यासाठी हॉस्पीटल स्थापन करून स्त्रिजीवनाची दाहकता कमी करण्याचा प्रयत्न केला.

## केशवपन

स्त्री विधवा झाल्यानंतर तिच्या डोक्यावरचे केस काढले जात. तिला विद्रुप करत. ती कोणापुरूषाकडे पाहू नये. हा यामागचा उद्‌देश होता. बाबा पद्मनजी यांनी आपल्या 'यमुना पर्यटन' या कांदबरीमध्ये या भयंकर प्रथेचे चित्रण केले आहे.

ज्ञानोदय व इंदूप्रकाश या वृत्तपत्रांनी केशवपनाचा धिक्कार केला. काही विधवांनी या प्रथेविरूद्ध ब्रिटीश सरकारकडे अर्ज केला. पंडिता रमाबाईने २९ डिसेंबर, १८८९ च्या काँग्रेस अधिवेशनात बालविवाह व केशवपनाविरूद्ध ठराव मांडला. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, नारायण मेघाजी लोखंडे यांनी जनमत तयार केले. २३ मार्च १८९० रोजी मुंबईच्या डोंगरी भागात ५०० न्हाव्यांच्या उपस्थितीत ठराव पास करून समाजातील स्त्रियांच्या अस्तित्वाला समाजमान्यता देण्याचा सार्वजनिक प्रयत्न केला गेला.

## कुटुंब व सामाजातील स्त्रियांचा दर्जा

अगदी १९ व्या शतकातही स्त्री जन्माचे स्वागत होत नसे. पहिला मुलगा झाला की नांदणे पक्के होई. सासरचा जाच कमी होई. स्त्री म्हणजे परक्याचे धन असा पक्का समज होता. अशी केविलवाणी स्थिती वसाहतकालखंडामध्ये होती. स्त्रियांचे कुटुंबातील स्थान हे मुख्यत: गौण स्वरूपाचेच होते. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये एकमेंकांसोबत बोलणेही बंदिस्त केले होते. विवाहीत स्त्री पुरूषांची दासीच असे. पत्नीस कोणीच विश्वासात घेत नसे. कुटुंबातील आर्थिक निर्णयाबाबतीत कोणतेही स्वातंत्र्य व अधिकार स्त्रियांस नव्हते.

स्त्रियांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व आदि गोष्टी १९ व्या शतकामध्ये सुद्धा रूजल्या नव्हत्या पारंपारिक कामाव्यतिरिक्त स्त्रियांना दुसरे काम नाही,स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे. अशीच समाजाची धारणा होती. कनिष्ठ वर्गातील स्त्रियांना जातिनिष्ठ कामे करावी लागत असत. उच्चवर्णीय स्त्रियांना कष्टाची कामे जरी कमी असली तरी घरकाम होते व काडीचेही आर्थिक स्वातंत्र्य नव्हते. स्त्रियांचे कुटुंबातील स्थान हे परावलंबी व दुय्यम स्वरूपाचेच होते.

## स्त्री शिक्षणावरील बंदी

मुलींना शिक्षणाची गरज नाही हा विचार १९ व्या शतकातही अस्तित्वात होता. शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. श्रीमंत व सरदार, राजेशाही कुटुंबातील स्त्रिया थोडे फार शिक्षण घेत. शिक्षण

घेतल्याने स्त्रिया जबाबदाऱ्या व कर्तव्य विसरतील म्हणून नवीन शैक्षणिक  विचार व ख्रिस्ती मिशनऱ्यांद्वारे निर्माण करण्यात येणाऱ्या शाळाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले. मात्र १९ व्या शतकाने शिक्षणाची बीजे जनमानसात पेरायला सुरूवात केली.इ.स. १८२४, १८२६, १८२९, १८३१ या वर्षी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी काढलेल्या शाळेत मुली जाऊ लागल्या. स्कॉटिश मिशनऱ्यापासून प्रेरणा घेवून इ.स.१८५१ मध्ये फुल्यांनी बुधवार पेठेत तीन शाळा काढल्या अस्पृश्यांच्या मुलांना जागे केले. त्याचप्रमाणे देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन याने बंगालमधील मुलीच्या शिक्षणात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**ब)	स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दर्जा**

स्त्रियांना योग्य वैधनिक दर्जा व हक्क मिळवून दयायचे असतील तर कायदेशीर हक्क मिळवून दिल्याशिवाय पर्याय नाही, परिणामत: राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक आंतर्विरोधातून जात असलेल्या भारताला फक्त राजकीय स्वातंत्र्य मिळवून भागणारे नव्हते. यासाठी संसदेमध्येच नाही तर समाजामध्ये मूलभूत परिवर्तनाची लाट आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे  नाव अग्रणी आहे.त्यांनी द हिंदू मॅरेज ॲक्ट, द हिंदू सक्सेशन ॲक्ट,  द हिंदू मायनॉरीटी ॲण्ड गार्डीयनशिप ॲक्ट, द हिंदू ॲडॉप्शन अँण्ड मेंटनेन्स ॲक्ट इत्यादी स्वतंत्र कायदे बनविले. या कायदूयामुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची, न्याय व हक्कासाठी लढण्याची भावना निर्माण झाली.

**१.	बहुपत्नीकत्व**

स्वातंत्र्यानंतर या पद्धतीला उतरती कळा लागली. जवळ-जवळ ९० टक्के  प्रजा एकपत्नीत्वने बांधली गेल्याचे दिसून येते मात्र मुस्लिम स्त्रियांच्या या बहुपत्नीकत्वाच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज होती, इ.स. १९५५ च्या हिंदू विवाह कायदयाने एकपत्नीत्वाचा स्वीकार करून सेक्शन १७ प्रमाणे द्विभार्या पद्धती दंडनीय ठरवली आणि स्त्रियांचा सन्मान करण्याची ठोस पावले उचलली.

## २. विवाह वय

इ.स. १९५४ च्या विवाह कायद्याद्वारे मुला मुलीचे विवाहासाठीचे किमान वय २१ वर्षे व १८ वर्षे निश्चित करण्यात आले असून या इ.स. १९५४ च्या खास विवाह कायद्यानुसार विवाह नोंदणी अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. या कायद्याने विवाह या मूलभूत प्रश्नाला कायदेशीर सरंक्षण प्राप्त करून दिले गेले.

## ३. हुंडा

इ.स. १९६१ च्या हुंडाप्रतिबंधक कायद्यानुसार हुंडा घेणाऱ्याला ६ महिन्यांची शिक्षा व ५, ००० रूपये दंड ठरविण्यात आला आहे. भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम ११३ नुसार सात वर्षाच्या आत जर स्त्रिचा अनैसर्गिक मृत्यू झाला तर पती व त्याचे नातेवाईकांना आत्महत्येला जबाबदार धरून गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. हया कायद्याच्या माध्यमातून स्त्री जीवनाचे कायदेशीर सरंक्षण करण्याच्या शासनाच्या भूमिकेमुळे स्त्रियांच्या जिविताला असणारा धोका कमी झाला.

## ४. घटस्फोट

भारताच्या कायदेव्यवस्थेमध्ये घटस्फोट आता कायदेशीर अधिकारामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र मुस्लिम समाजामध्ये हे प्रमाण जास्त आहे. तद्नंतर हिंदू, बौद्ध, जैन, शिख व ख्रिस्ती याचा क्रम लागतो.

इ.स. १९५५ च्या हिंदू कायद्यानुसार हिंदू स्त्रियांना आठ वेगवेगळया कारणांसाठी घटस्फोट मागता येतो. तर मुस्लिम पुरूषांना घटस्फोट घेण्याचा अमर्याद हक्क मिळालेला आहे. खुल्ला किंवा मुबारआन द्वारे स्त्रियांनाही घटस्फोट घेता येवू शकतो. मात्र इ.स. १९८३ चा शहनाज नावाच्या तरूणीने तलाकाचे स्तोम वाढून देण्याची विनंती केली. शहाबानो खटल्याने मुस्लिम महिलांसाठी घटस्फोटासंबंधी वैधानिक निर्णय घेण्याची विनंती करून भारतातील मुस्लिम महिलांना न्यायासाठी सज्ज केले.

## निर्वाह

घटस्फोट झाल्यानंतर स्त्रियांच्या उदरनिर्वाहासाठी स्त्रिला आर्थिक संरक्षण देण्यासाठी हिंदू दत्तक पोटगी कायदा इ.स. १९५६ मध्ये पारित करण्यात आला. मुस्लिम कायद्यानुसार स्त्रिला मिळणारी मेहरची रक्कम पुरेसी  नसेल तर नवऱ्याला तिला पोटगी देणे आवश्यक आहे. असा निर्वाळा देवून स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांची कायदेशीर सोडवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## वारसा

इ.स. १९५६ च्या हिंदू वारसा कायदयाने महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. वडीलांच्या संपत्तीमध्ये भाऊ-बहीण याना समान हक्क मिळवून दिले, मुस्लिम कायदयाचे तत्व हे पुरूषांना दुप्पट वाटा देण्याचे आहे. तर ख्रिश्चनांना इ.स.१९२५ चा भारतीय वारसा हक्क कायदा लागू करून स्त्रिला आर्थिक क्षेत्रामध्ये स्वातंत्र्य देऊन मालमत्ता संग्रहित करण्याचा कायदेशीर अधिकार देण्यात आला.

## सती

रूपकंवर या ११ वर्षीय मुलीचा राजस्थानमध्ये सतीच्या नावाखाली खून केला गेला आणि संपूर्ण देशभर हे प्रकरण चर्चिले गेले. सर्व स्तरातील संघटनानी प्रशासनाचा विरोध केला. त्याचाच परिणाम १९८७ साली दिल्लीच्या 'जॉईट ॲक्शन फोरम' या संस्थेने एक विधेयक तयार करून अशा कृत्याविरूद्ध कठोर शिक्षेच्या उपाययोजना केल्या. आणि सती सारख्या अमानवी, अमानुष प्रथेला कायमचे हद्दपार करण्यासाठी सक्तीचे कायदे अमलात आणण्यात आले.

## गर्भजल परीक्षा

इ. स. १९७५ मध्ये अनुवांशिक दोष दूर करण्यासाठी गर्भजल परीक्षेचे तंत्रज्ञान भारतात झाले. मात्र याचा सर्रास गैरवापर होऊ लागला. स्त्री अर्भकाच्या वाढत्या हत्येमुळे जनसंख्येवर याचा परिणाम होवू लागला. याची जाणीव संस्थात्मक व वैयक्तिक पातळीवर झाली. देशभर जनजागृती करून स्त्री भ्रूणहत्या थांबविण्यासाठी विविध संघटनांच्या मदतीने देशात स्त्री जन्माचे स्वागत करण्यासाठी पावले उचलली.

## समान नागरी कायदा

कायदा कधीच लिंगनिरपेक्ष नसतो आणि समान नागरी कायदा हा संविधानाच्या तत्वानुसार मानवाला संवैधानिक अधिकार बहाल करतो. हा कायदा स्त्री व पुरूषांना समान न्याय देणारा आहे. मात्र स्त्री पुरूषांना न्याय देणारा समाज अद्याप तरी दूरचा टप्पा वाटतो.१९ व्या शतकाने व स्वातंत्र्योत्तर भारताने स्त्रियांना सामाजिक जीवनामध्ये मानाचे स्थान देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी परकीय विशेषत: युरोपातील सत्तांचा भारतातील प्रवेश, त्यांची प्रबोधनाची विचारधारा आणि भारतामध्ये वसाहतवादाची, साम्राज्यवादाची पेरणी करत असताना त्यांनी भारतामध्ये रूजविलेल्या लोकशाही, स्वातंत्र्य, समता व बंधुभावाचा विचार यातूनच भारतातील १९ वे शतक जगाशी जोडले गेले व भारताच्या प्रत्येक सामाजिक दुर्भक्ष्यावर इंग्लंडच्या संसदेत पडसाद उमटू लागले.

भारतीयांना आपल्या जातियतेची, वर्णव्यवस्थेची व गुलामगिरीची जाणीव झाली. राष्ट्रव्यवस्थेतील मानवी संसाधनातील इतका मोठावर्ग दुलर्क्षित ठेवून आपण नवयुगात प्रवेश कसे करू शकतो ही भावना नवविचारी तरूणांच्या मनात निर्माण झाली. स्त्रियांनी स्वत:च्या उद्धारासाठी तोडलेली गुलामीची बंधने यातून स्त्रियांच्या दर्जात धोरणात्मक वृद्धी झाली. कृतीशिल वृद्धी स्वत: स्त्रिवर्गाने केली. मात्र आज ही स्त्रि वर्गाची कहाणी पूर्ण झालेली नाही. स्त्रियांना समाजातील रूढीगत आणि वैधानिक दर्जा कृतीत उतरवण्यासाठी खूप मोठा पल्ला गाठायचा आहे.

### क) आदिवासी स्त्रियांचा दर्जा

भारतात ४२७ अनुसूचितजमाती असून १९९१ च्या जनगणनेप्रमाणे त्याची लोकसंख्या ७.८ टक्के आहे. या देशातील मूळनिवासी म्हणून डॉ. इल्विन तसेच ठक्कर बप्पा यांनी त्यांना 'आदिवासी' म्हटले आहे. तर डॉ.धुर्ये त्यांचा उल्लेख 'मागासलेले हिंदू' असा करतात. तसेच ते वनात राहतात. म्हणून वन्यजाती असेही म्हटले जाते.

भारतीय संविधानातील कलम ३४१ आणि ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीप्रमाणे तयार केलेल्या सूचित समाविष्टकरण्यात आलेल्या या जनसमूहांना अनुसूचित जनजाती म्हटले जाते. हा पृथक आणि

अंतर्मुखी जनसमूह असून उत्पादन आणि उपभोगाच्या दृष्टीने समरूप असतात. आर्थिक बाबतीत मागासलेल्या या समुहातील लोकांचे इतरांकडून शोषण केले जाते भाषा, वंश, धर्म, जीवनशैलीचा विचार करता त्यांच्यात इतरांपेक्षा वेगळेपणा दिसून येतो.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

आधुनिक भारतीय भाषांमध्ये वन्यजाती, आदिम-जाती, आदिवासी अशा शब्दांचा उपयोग केला जातो. या जनजातींचा प्राचीन काळ, इतिहास अभ्यासण्याचे काही विशेष प्रयत्न झाले नाहीत. मात्र भारतीय प्राचीन साहित्यामध्ये दक्षिणेतील कुरूम्ब, इरूला व पनिया, मध्यभारतातील उराँव, गोंड, संथाल, भिल्ल, उत्तरपूर्वभारतातील बोडो, अहोम यासारख्या आदिवासींचा उल्लेख मिळतो. एकूणच प्राचीन व मध्ययुगीन साहित्यात जनजातीचे उल्लेख कमी प्रमाणात मिळतात.

## ब्रिटीश कालखंड

१८३३ साली इंग्रजानी एका अधिनियमनाद्वारा स्थानिक लोकांना संरक्षण देण्याचा विचार केला. बाहेरच्या लोकांना या क्षेत्रात भूमी खरेदी करण्याचा अधिकार नाकारला. इ.स.१८७४ मध्ये अनुसूचित क्षेत्र कायदा पास करण्यात आला आणि याच वेळी आदिवासीसंबंधी सामाजिक श्रेणीची संकल्पना मांडण्यात आली. त्यानुसार आदिवासींना हिंदू, मुस्लिम व इतर धार्मिक समूहापासून वेगळे करण्यात आले व 'आदिवासींचा धर्म जीववाद' म्हणून मान्य करण्यात आला.

ब्रिटीशांनी नैसर्गिक संसाधनावर वर्चस्व मिळविण्यासाठी एवढा खटाटोप केला, भूमिसंबंधी कायदे केले. जंगलविषयक कायदे केले, त्यातूनच सावकार ठेकेदार, अधिकारी यांना जंगलात प्रवेशही मिळाला व काही भागातील आदिवासींनी या पद्धतीविरूद्ध बंडही केले. मात्र ब्रिटीशानी अतिशय सावधपणे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मार्फत पुन्हा प्रवेश करून त्यांचे शिक्षण, वैद्यकीय मदत त्यांच्यावर संशोधन करण्याबरोबरच आपल्या धर्माचा प्रसारही केला. खऱ्या अर्थाने ब्रिटीशांना या प्रदेशांच्या नैसर्गिक

संसाधनातून आपली भौतिक आर्थिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आदिवासींचे शोषण केले.

**स्वतंत्र भारत**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानामध्ये आदिवासीसंबंधी अनेक तरतुदी करण्यात आल्या. १९५० साली करण्यात आलेल्या या सूचीमध्ये २१२ आदिवासी जनसमुहाची नावे होती तर १९७१ मध्ये या सुचित ५२७ नावेसमाविष्ट करण्यात आली. प्रशासकीय दृष्टीने त्यांना अनुसूचित जनजाती असे म्हटले जाते.

भौगोलिक आधारानुसार भारताचे तीन भागात विभाजन केले जाते. या भागात ५२७ आदिवासींचे वसतीस्थान असून ते पुढीलप्रमाणे १. उत्तरपूर्व भारत, २. मध्यभारत, ३.दक्षिण भारत हया सर्व जनजाती दुर्गम पर्वतराजीत वसलेल्या असून या प्रदेशांवर पर्वतावर, टेकडया नदयावर, जलाशये, वृक्ष, प्राणी यांच्यावर अदिवासीच्या जीवनाचे अतुट नाते आहे. डॉ. गुहा यांनी वंशाच्या आधारावर त्यांना खालील तीन भागात विभाजन केले आहे.

१. प्रोटोऑस्ट्रोलाईड

२. मंगोलाईड

३. निग्रिटो

भारतातील आदिवासींच्या १०५ वेगवेगळया भाषा असून २२५ बोलीभाषा (उपभाषा) आहेत. यावरून त्यांच्यातील विविधता लक्षात येते. पृथकता आणि आंतरक्रिया यांचे वैशिष्टये असून त्याचे आर्थिक जीवन, खाद्य संकलन करणे/शिकार करणे, स्थानांतरित शेती, स्थायी शेती, कारागिर, पशुपालक, लोककलाकार, श्रमिक इ. घटकांवर असून त्यांच्या आर्थिक जीवनात उत्तरोत्तर परिवर्तन होत चालले असून त्याच्या क्षेत्रामध्ये निर्माण होणारे प्रकल्प, धरणे, उद्योग यामुळे त्यांना मोठया प्रमाणात विस्थापित व्हावे लागत आहे. सावकार, ठेकेदार, व्यापारी व अधिकाऱ्याकंडून त्याचे शोषण होताना दिसून येते.

**आदिवासी स्त्रियांचा दर्जा**

आदिवासी समाजातील स्त्रियांच्या दर्जासंबंधी विचारवंतांमध्ये एकमत आढळून येत नाही. त्यांच्यामध्ये स्त्रियांच्या दर्जाबद्दल परस्पर विरोधी मतमतांतरे दिसून येतात. मात्र अमेरिकन सामाजिक मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट लोवी यांनी आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा ठरवताना खालील बाबींचा विचार करण्यास सांगितले आहे.

१. प्रत्यक्ष वागणूक

२. कायदेशीर दर्जा

३. सार्वजनिक कामाची संधी

४. कामाचे स्वरूप व व्याप्ती

तेव्हा स्त्रियांचा दर्जा ठरविताना प्रत्येक आदिवासी जमातींचा स्वतंत्र पणे विचार केला पाहिजे.

**१. मातृपरंपरा**

आसामच्या डोंगराळ भागात राहणारी खासी जमात 'मन्नर' या आदिवासी मातृपरंपरेचा उत्कृष्ट नमुना आहे. या जमातीत मालमत्तेचा अधिकार आईकडून मुलीला दिला जातो. पुरूषांना आपली मिळकत आईकडे व लग्नानंतर बायकोकडे दयावी लागते. 'खासी' लोक स्त्री पूर्वजापासून आपल्या वंश परंपरेची गणना करतात व त्यांना देवताप्रमाणे मान देतात. यावरून हेही सिद्ध होत नाही की स्त्रियांच्या बाजूची अशी परीस्थिती असली तरी समाजात व कुटुंबात स्त्रिची निरकुंश सर्वोच्च सत्ता होती असे नाही.

**२. मातृस्थानिय निवास परंपरा**

आदिवासीच्या निवास पद्धतीतून स्त्रियांच्या दर्जावर प्रकाश टाकता येतो. त्यात मातृस्थानिय निवास पद्धत ही प्रचलित निवास पद्धत असून लग्नानंतर नवऱ्याला बायकोच्या घरी जावून कायमचे रहावे लागते. या मातृस्थानिय निवास पद्धतीमुळे स्त्रिला आपल्या आप्तस्वकीयांमध्ये रहावयास मिळते. त्यामुळे साहजिकच स्त्रिला सन्मान व वरचे स्थान मिळते. त्यामुळे बहुपत्नीत्वाच्या चालीला पायबंद बसतो व

स्त्रिचा दर्जा उंचावतो. ही पद्धत ईशान्य भारतात गारो, केरळमध्ये मथुवन व मन्नर इ. आदिवासी जमातीमध्ये प्रचलित आहे.

**३. पितृस्थानिय निवास पद्धती**

या पद्धतीत पुरूषाला प्रभावी स्थान असते. यात स्त्रिला नवऱ्याच्या घरी जावून रहावे लागते. त्यामुळे चांगली वागणूक मिळेलच याची खात्री देता येत नाही. पुरूषांच्या हाती सर्व सत्ता एकवटलेली असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र मध्यभारतातील गोंड जमातीत स्त्रियांना चांगल्या प्रकारची वागणूक देण्यात येते. तसेच थारू जमातीतील स्त्रिया 'चेटूक' क्रियेचा वापर करून आपले वर्चस्व गाजवतात.

**४. आर्थिक सहयोग**

समाजाचे आर्थिक जीवन सुकर होण्यासाठी स्त्रिया कितपत मदत करतात. यावर समाजातील स्त्रियांचा दर्जा पुष्कळअंशी अवलंबून असतो. आदिवासी समाजामध्ये उत्पादनाच्या प्रकारावर स्त्रियांचे नियंत्रण काही प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे. खारिया, कें, चेंचू, कादर, या समाजात पुरूषांबरोबर स्त्रिया उत्पादनात सहभागी असल्यामुळे स्त्रिला समान वागणूक दिली जाते. तोडा या आदिवासी जमातीमध्येही स्त्रियांचा दर्जा चांगला असल्याचे दिसून येते शिवाय शेती करणाऱ्या आदिवासी समाजात स्त्रियांची स्थिती चांगली असल्याचे आढळून येते.

**५. विवाहासंबंधी दर्जा**

आदिवासी समाजामध्ये स्त्री एक मालमत्तेचा प्रकार म्हणून गणली जाते. मुली घरकाम आर्थिक क्रियामध्ये सहभाग घेत असल्यामुळे मुलीच्या लग्नानंतर पित्याला आपल्या श्रमशक्तीला मुकावे लागते. नागा जमातीत मुलगी जन्माला आल्याबरोबर तिची हत्या करण्याचा प्रघात आहे. तर तोडा जमातीत स्त्रिला एकापेक्षा अधिक पुरूषाशी लग्ने करता येतात. या परस्पराविरोधी पद्धतीमुळे स्त्रियांच्या आरोग्य व जीवनावर खूप वाईट परिणाम पडतो. बहुपत्नीत्वाची प्रथा महाराष्ट्रातील भिल्ल, ठाकूर, गोंड, केरळमधील पलियन व उरली यांच्यामध्ये असल्यामुळे या जमातीत स्त्रियांचा दर्जा घसरल्याचे दिसून येते.

## ६. कायदेविषयक दर्जा

आदिवासी समाजामध्ये स्त्रिला घटस्फोट घेण्याचा हक्क दिला असून गारो,खासी या आदिवासी जमातीमध्ये स्त्रिवर कोणी बलात्कार केल्यास पुरूषाला त्या स्त्रिबरोबर विवाह करावा लागतो व नकार दिल्यास दंड भरावा लागतो.

मातृसत्ताक पद्धतीमध्ये जीवन व्यतित करणाऱ्या आदिवासी जमातीत स्त्रियांचा दर्जा वरचा आहे. त्यांना माता म्हणून व आर्थिक मदतीला हातभार लावत असतील तरीसुद्धा या जमाती त्यांना आदरांची वागणूक देतात. आधुनिकतेशी संपर्क वाढल्यामुळे आता बालहत्याबंदी स्त्री-पुरूषातील संबंधातील मोकळेपणावर बंदी, मुलींना मारून टाकण्यावर बंदी त्यामुळे आरोग्य व आयुष्याचा कालावधी वाढलेला आहे. हुंडयाची चाल वाढली असली तरी बहुपत्नित्वाची, चाल बंद पडली आहे. औद्योगिककरणामुळे स्त्रियांना नवीनच प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

## निष्कर्ष

१. अप्रगत समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ प्रतीचा असतो आणि प्रगत समाजामध्ये तो श्रेष्ठ प्रतीचा असतो हा निष्कर्ष चुकीचा आहे.

२. विविध आदिम समाजामध्ये सर्वसामान्यापणे स्त्रियांना चांगली वागणूक दिली जाते.

३. शारीरिक दुर्बलता व मासिक धर्मामुळे समजल्या जाणाऱ्या अपवित्रतेमुळे स्त्रियांना पुरूषांच्या मानाने कमी लेखले जाते मात्र या पवित्र अपवित्र गोष्टींना अवास्तव महत्त्व दिले जात नाही.

४. सर्व स्तरातील पितृसत्ताक पद्धती असलेल्या समाजामधून देखील स्त्रियांना चांगले वागवले जात असते. शिवाय महत्त्वाच्या निर्णयात सुद्धा स्त्रिया पुरूषांवर प्रभाव पाडू शकतात.

५. स्त्रियांचा दर्जा हा श्रेष्ठ किंवा कनिष्ठच असतो. ही समजूतच मुळात चुकीची आहे. स्त्रियांच्या दर्जासंबंधी हे द्विधाकरण चुकीचे व दिशाभूल करणारे आहे. कारण दर्जामध्ये अनेक प्रती असू शकतात.

**स्वयंअध्ययन - ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आदिवासींचा उल्लेख 'मागासलेले हिंदू' असे कोणी केलेले आहे ?

२. १९७१ च्या भारत सरकारच्या आदिवासी अनुसूचीत किती आदिवासी जनसमुहाची नावे आहेत ?

३. डॉ.गुहा यांनी वंशाच्या आधारावर आदिवासीची विभागणी किती भागात केली आहे ?

४. आदिवासी जमातींचे वैशिष्ट्ये काय आहे ?

५. 'शारदा' कायदा कोणत्या वर्षी पास करण्यात आला ?

**ब) योग्य पर्याय निवडा**

१. ... .......याने कायदयाने सतीबंदी केली.

अ) लार्ड डलहौसी ब) लार्ड विल्यम बेंटिक क) लार्ड कॅनिंग ड) लार्ड डफरीन

२. दुधाच्या उकळत्या कढईत मुलीला टाकून मारण्याच्या पद्धतीला........म्हटले जाई.

अ) दुधनहाती ब) दुध खेलती क) दुधपिती ड) दुधशकरा

३. संमती वयाचा कायदा ....... यांच्या प्रयत्नाने पास करण्यात आला.

अ) रानडे.म.गो. ब) बेहरामजी मलबारी क) महात्मा फुले ड) आगरकर

४. डॉ.आंबेडकरांनी १९२५ मध्ये देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी .......येथे परिषद घेतली.

अ) बेळगाव ब) कागल क) निपाणी ड) रत्नागिरी

५. बाबा पद्मनजी यांनी आपल्या .. या ग्रंथात केशवपनाचे वर्णन केले.

अ) यमुनाकाठ ब) यमुनातीर क) यमुनापरिसर ड) यमुना पर्यटन

## पारिभाषिक शब्द

| | | |
|---|---|---|
| दर्जा | : | एखादी व्यक्ती विशिष्ट व्यवस्थेत विशिष्ट वेळी जे स्थान भूषविते त्याला त्या व्यक्तीचा दर्जा म्हणतात. |
| अर्जित दर्जा | : | व्यक्तीने ज्ञान, कौशल्य, शिक्षण, परिश्रमाने स्वकृर्तत्वाने प्राप्त केलेला दर्जा. |
| मातृसत्ताक कुटुंब | : | ज्या कुटूंबात मातेची सत्ता प्रमुख असते त्या कुटुंबाला मातृसत्ताक कुटूंब पद्धती असे म्हटले जाते. |
| बहुपतीत्व | : | एका स्त्रिचा एकापेक्षा जास्त पुरूषांसमवेत झालेला विवाह |
| सामाजिक स्तरीकरण | : | समाजाची उच्च निम्न स्तरात झालेली विभागणी |
| नियोग | : | पुत्र प्राप्तीसाठी अन्य पुरूषाशी विधीपूर्वक केलेला समागम म्हणजे नियोग होय. |

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न १ उत्तरे**

**अ)** १) डॉ.मार्शल

२) एरण

३) गांधर्व विवाह

४) यादव घराणे

५) स्त्रिधन

**ब)** १) ब. २) क ३) अ ४) ड ५) अ

**स्वयंअध्ययन प्रश्न २ उत्तरे**

**अ)** १) चार

२) फिरोजशहा तुघलक

३) जी.एन.शर्मा

४) अबुल फझल

५) मेहर

**ब)** १) क २) ब ३) अ ४) ब ५) ब

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ उत्तरे**

**अ)** १) डॉ.घुर्ये

२) ५२७

३) तीन

४) पृथक आणि अंतर्मुखी जनसमूह

५) १९२९

**ब)** १) ब २) क ३) ब ४) क ५) ड

## १.५ सारांश

आधुनिक मूल्यांनी आत्मभान जागृत झालेल्या स्त्रियांनी संघटीत होवून स्त्रिमुक्ती चळवळ उभी केली. अनेक आव्हानांना सामोरे जावून स्त्रिमुक्ती चळवळीचे बीजारोपण झाले. बंगाल पाठोपाठ महाराष्ट्रामध्ये स्त्रिमुक्ती चळवळीने स्त्री दास्याविरोधी परखड मांडणी करताना सती आणि सता, सवत आणि सवता असे भेद मांडत स्त्रि-पुरूष विषमतेच्या प्रश्नाला थेट हात घातला.म.फुले, ताराबाई शिंदे, छत्रपती शाहू यांनी बहुजन समाजातील वंचित स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग दाखवला तर न्यायमूर्ती रानडे,

आगरकर, गोपाळकृष्ण गोखले, लोकहितवादी, बैरामजी मलबारी, कर्वे व इतरांनी समाजातील मध्यमवर्गीय व उच्चवर्णीय स्त्रियांच्या उत्कर्षासाठी प्रयत्न केले.

शारदा सदन, आर्य महिला समाज, सेवा सदन, लेडिज होम क्लास, हिंद सेविका संघ, या द्वारे स्त्री उन्नतीच्या कार्याला संस्थात्मक रूप प्राप्त झाले. स्त्रिला 'स्वायत्त व्यक्ती' म्हणून मान्यता देण्यासाठी अजूनही खूप मोठा संघर्ष करावयाचा आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. प्राचीन भारतातील स्त्रियांचा दर्जा आणि परंपरांची माहिती लिहा ?

२. मध्ययुगीन मुस्लिम स्त्रियांच्या सामाजिक आणि धार्मिक दर्जाची माहिती लिहा ?

३. मध्ययुगीन कालखंडातील हिंदू स्त्रियांच्या रूढीगत आणि वैधानिक दर्जावर प्रकाश टाका ?

४. आधुनिक कालखंडातील स्त्रिजीवन आणि त्यासंबंधी करण्यात आलेल्या सुधारणाची माहिती लिहा ?

५. आदिवासी समाजातील स्त्री जीवनाची चर्चा करा ?

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. डॉ.सांळुखे आ.ह.-हिंदु संस्कृती आणि स्त्रिया, लोकवाङ्मयगृह, मुंबई

२. गायधनी र.ना., प्राचीन भारताचा इतिहास अनिरूद्ध पब्लिशिंग हाऊस,पुणे

३. डॉ.गाठाळ.एस.एस., भारताचा इतिहास व संस्कृती (इ.स.६५० पर्यंत) कैंलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००७

४. डॉ.गाठाळ.एस.एस.भारताचा इतिहास व संस्कृती (इ.स.१७६२ ते १९५०) कैंलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगबाद

५. डॉ. सौ पाटील पद्मजा व डॉ.जाधव शोभना- भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मार्च २००७

६. डॉ.संगवे विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

७. संत.डी.के.,स्त्रिजीवन अन्वयार्थ, महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर.

८. चिटणीस कृ.ना., मध्ययुगीन भारताच्या संकल्पना व संस्था भाग ०३

९. डॉ.कठारे अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद, जून २०१३

१०. डॉ.जोशी पी.जी. -प्राचीन भारताचा इतिहास, के.सागर पब्लिकेशन्स, पुणे, २०१३

११. भावे पुष्पा ,शोध बाई माणसाच्या जिण्याचा,अक्षर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती,४ ऑक्टोबर २००४

१२. साने गीता, भारतीय स्त्रीजीवन , मौजप्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९७

१३. प्रा.भिडे गजानन- प्राचीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर,

❋❋❋

# घटक ३
# स्त्रीयांच्या चळवळींचा उदय

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ विभाग पहिला - स्त्रीयांचे शिक्षण

  ३.२.२ विभाग दुसरा - १९ व्या शतकातील स्त्री आणि सुधारणा

  ३.२.३ विभाग तिसरा - स्त्रीयांच्या संघटनांचा उदय

  ३.२.४ विभाग चौथा - स्त्रीयांच्या अधिकाराच्या चळवळी

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकात आपल्याला लक्षात येईल की,

- प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात स्त्रीयांच्या शिक्षणाची अवस्था कशी होती.
- १९ व्या शतकात भारतीय स्त्रीयांचा शैक्षणिक विकास कसा झाला.
- १९ व्या शतकात स्त्रीयांच्या विविध सुधारणा चळवळी समजून घेता येईल.

- स्त्रीयांच्या संघटनांचा उदय का व कसा झाला ते समजून घेता येईल.
- स्त्री संघटनाच्या उदयाचे परिणाम काय झाले ते लक्षात येईल.
- स्त्रीयांच्या हक्काच्या, अधिकाराच्या चळवळी कोणत्या झाल्या ते लक्षात येईल.

## ३.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या किंवा समाजाच्या नवनिर्माणात शिक्षण हा घटक अत्यंत मोलाची कामगिरी बजावीत असतो. शिक्षण हे एक समाजपरीवर्तनाचे साधन आहे व संस्कृतीच्या दृष्टीने वाटचाल करणारी एक प्रक्रिया आहे. प्राचीन भारतातील वैदिक कालखंडात स्त्रियांना यज्ञापुरते धर्मशिक्षण फक्त ब्राह्मण कुळातील स्त्रीयांना मिळत असे. स्त्रियांजवळ कौशल्ये नव्हती, ज्ञान नव्हते असे नाही पण धार्मिक साहित्याचे पठण एवढाच शिक्षणाचा मर्यादित अर्थ होता. जिथे स्त्रीयांना समानतेने शिकण्याचाच अधिकार नव्हता तेथे एकत्र येऊन स्वत:च्या न्याय हक्कांबाबत चळवळी करण्याचा प्रश्न तर खूप दूर होता. मध्ययुगीन काळात स्त्रीयांच्या शिक्षणाची स्थिती शोभनिय झाली. राजेरजवाडे, सरदार, उमराव यांच्या महिला थोड्याफार प्रमाणात शिकल्या पण संपूर्ण समाजातील स्त्रीया ह्या शिक्षणात मागेच ठेवल्या गेल्या.

ब्रिटिशांच्या आगमनाने भारतात पाश्चात्य विचार, कल्पना व तत्त्वज्ञान आले. त्यामुळे सर्वच क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडून आले. पाश्चात्य शिक्षणामुळे धार्मिक व सामाजिक जागृती होऊन पुनरूत्थान चळवळ ही सुरू झाली. जुने फेकणे व नवे स्विकारणे ही प्रवृत्ती निर्माण झाली. राजकीय हक्कांबाबत जाणीव होऊन ते प्राप्त करण्यासाठी स्त्रीया एकत्र येऊन विचार करू लागल्या. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेल्या शैक्षणिक प्रयोगामुळे एक 'नविन स्त्री' निर्माण झाली. भारताच्या इतिहासात प्रथमच तीने घराबाहेर इतर स्त्रीसमुहांशी संवाद साधण्यास सुरूवात केली. छोटे-छोटे क्लब स्थापन झाले. या छोट्या क्लबपासून ते भारतीय राष्ट्रीय सभा, विविध सामाजिक परिषदा, विविध संस्था या मधून स्त्रीयांच्या प्रश्नांचा विचार केला जाऊ लागला. शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यामुळे आत्मभान जागे झालेल्या स्त्रीया हळूहळू सामाजिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या जागृत होऊ लागल्या. त्यांच्या चळवळींचा समग्र अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ विभाग पहिला - स्त्रीयांचे शिक्षण

आधुनिक भारतातील स्त्रीशिक्षणाच्या इतिहासाची पाळेमुळे १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीत व तत्कालीन राजकीय परिस्थितीत गुंतलेली आहेत. धार्मिक साहित्याचे पठण करणे एवढाच शिक्षणाचा अर्थ मर्यादित होता. मात्र व्यापाऱ्याच्या निमित्ताने भारतात आलेल्या ब्रिटिशांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरूवात केली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मानवतेच्या भूमिकेतून प्रारंभीपासूनच भारतात शिक्षण देण्यास प्रारंभ केला. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या संस्थांना मिशनरी असे म्हणतात. ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे ही यामागील प्रमुख हेतू होता. भारतीयांना शिक्षण देण्यामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांना देखील हवे होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्यामधील सुधारणा हे नव्हे तर प्रशासनात कारकुनांची गरज होती ती पूर्ण होईल. कोणत्याही कारणांने का असेना स्त्री-पुरूष यांना शिक्षण देण्याची सुरूवात मिशनऱ्यांनी केली.

**अ) १९ व्या शतकातील भारतातील स्त्री शिक्षण**

आधुनिक भारतामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणाची सुरूवात १९ व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच झाली.

**१) १८१३ चा सनदी कायदा**

भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या मिशनऱ्यांसोबत ब्रिटिश सरकारने उदारतेचे धोरण स्विकारावे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांना वाटत होते. त्यांनी तशी मागणी सुद्धा केली होती. त्यांच्या या प्रयत्नांस यश आले. ब्रिटिशांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ केला. १८१३ च्या सनदी कायद्यात प्रथमच भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी १ लाख रूपये खर्च करावेत असे ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीला बंधन घातले. परंतु १८२३ पर्यंत कंपनीने हे पैसे भारतीयांच्या शिक्षणासाठी खर्च केले नव्हते. मात्र मिशनऱ्यांनी पुढील काळात या पैशाचा वापर करून भारतीयांना शिक्षण देण्यास सुरूवात केला.

**२) ख्रिश्चन मिशनऱ्यांचे प्रयत्न**

मिशनऱ्यांनी धर्मांतराचा एक मार्ग म्हणून स्त्रीयांच्या शिक्षणांकडे विशेषत्वाने लक्ष दिले गेल्याचे दिसते. चर्च मिशनरी सोसायटी, मुंबई बायबल सोसायटी, स्कॉटीश मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, अमेरिकन मराठी मिशन संस्था या विविध मिशनरी संस्थांनी महाराष्ट्रासहीत भारतामध्ये शिक्षण देण्याचे महत्त्वाचे काम केले. केवळ धर्मप्रसार करून अनुयायी मिळणार नाहीत तर शाळा स्थापन करून येथील समाजाशी नाते जोडले तरच आपला हेतू साध्य होईल असे मिशनऱ्यांना वाटत होते. त्यामुळे सन

१८१५ मध्ये अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुंबईमध्ये शाळा सुरू केली. मुलांसाठी क्रमिक पुस्तकेही काढली. १८१८ पर्यंत शाळांची ही संख्या २१ पर्यंत पोहोचली. १८२० साली फिमेल जुव्हेनाईल सोसायटीने कलकत्ता मध्ये 'बंगाली मुलींची शाळा' ही हिंदी मुलींची पहिली शाळा काढली. स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मिस मेरी कुक भारतात आल्या व त्यांनी कलकत्यात दुसरी शाळा सुरू केली. अमेरिकन मिशनऱ्यांनी १८२६ पर्यंत मुलींसाठी ९ शाळा सुरू केल्या. या ९ शाळेत जवळजवळ २०० मुली शिकत होत्या. मुंबई इलाख्यातील भायखळा शाळेला जोडून वसतिगृहही सुरू केले. १८५० पर्यंत मुंबई, मद्रास इलाख्यात मिळून जवळजवळ ८००० मुली शिक्षण घेऊ लागल्या. १८७० मध्ये पुणे व १८७१ मध्ये अहमदाबाद येथे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी दोन संस्था निघाल्या. स्त्री शिक्षकांची संख्या वाढविण्यासाठी या संस्थेने भरीव कामगिरी केली.

### ३) समाजसुधारकांचे प्रयत्न

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतातील पहिल्या फळीतील नेत्यांना असे वाटू लागले की, स्त्रीयांना जागृत केल्याखेरीज राष्ट्राचे पाऊल पुढे पडणार नाही. यामुळे स्त्रीशिक्षणाच्या कार्यात समाजसुधारकांनी मोलाची कामगिरी केली. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी प्रयत्न केले. हिंदू धर्मातील जातिभेद, अस्पृश्यता, बुरसटलेल्या धार्मिक कल्पना, या नाहिशा करण्यासाठी स्त्रीयांचे विचार प्रथम सुधारले पाहिजेत, त्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहीजे, अशी या सुधारकांची धारणा होती. महाराष्ट्रामध्ये याबाबतचा पहिला प्रयोग महात्मा जोतिराव फुले यांनी १८४७ साली केला. स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय देश पुढे येणार नाही या विचारांवरती श्रद्धा असल्यामुळे म. फुले यांनी मुलींची पहिली शाळा १८४८ साली पुणे येथे उघडली. लोकमताची पर्वा न करता त्यांनी हे काम केले. शिक्षिका मिळत नसल्याने त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाईस शिकवून तयार केले व तीला शिक्षीकेचे काम करण्यास सांगितले. राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी ब्राम्हो समाजाच्या मार्फत बंगालमध्ये स्त्रीशिक्षणास सुरूवात केली. दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी लाड, न्यायमूर्ती रानडे यांनी स्त्री शिक्षणांस मदत केली. जगन्नाथ शंकर शेठ यांनीही स्त्री शिक्षणांसाठी मदत केली. १८६३ पर्यंत मुलींच्या शाळांची संख्या ९३ इतकी झाली. त्यामध्ये जवळजवळ ३/४ मुली कनिष्ठ वर्गातील होत्या हे विशेष. १८८२ पर्यंत सर्व भारतातील ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकणाऱ्या स्त्रियांची संख्या ५१५ पर्यंत गेली. सहशिक्षण देण्यास लोक तयार नव्हते तरीही १८८२ साली १,२७,०६६ मुली शिकत होत्या. त्यापैकी ४२,०७१ मुली, मुलींच्या शाळेत जात होत्या.

१८८२ ते १९०२ या काळात मुलींच्या महाविद्यालयीन शिक्षणास सुरूवात झाली. सन १८८८ साली कु. कार्नेला सोराबजी या मुलींने लॅटीन विषय घेऊन बी.ए. (ऑनर्स) उत्तिर्ण झाल्या. त्या पहिल्या भारतीय पदवीधर होत. त्यापूर्वी कलकत्ता महाविद्यालयामधून इ.स. १८८३ मध्ये प्रथम पदवी संपादन

केलेल्या स्त्रिया म्हणजे कादंबिनी आणि चंद्रमुखी बोस या होत. यानंतर हळूहळू महाविद्यालयीन शिक्षणात वाढ होत गेली. १९०१-०२ मध्ये मुंबई इलाख्यात ७५ स्त्रिया महाविद्यालयीन शिक्षण घेत होत्या. तर संबंध देशात १२ महाविद्यालये निव्वळ मुलींसाठी शिक्षण देत होती. संपूर्ण देशात १९०१-०२ पर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणारी स्त्रीयांची संख्या २६४ पर्यंत गेली. त्यापैकी १७७ स्त्रीया कला महाविद्यालयामधून, ७५ वैद्यकिय महाविद्यालयामधून तर ११ एज्युकेशन कॉलेजमधून शिक्षण घेत होत्या.

## ब) २० व्या शतकातील भारतातील स्त्रीशिक्षण

२० वे शतक हे स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे व चालना देणारे ठरले. जवळजवळ १९२० पर्यंत स्त्रियांचे शिक्षण हा सामाजिक प्रश्न बनला होता. याच काळात अनेक सामाजिक विषमता निर्माण करणारे जूने नियम मोडून नवीन कायदे आमलात आले. त्यामध्ये सतीबंदीचा कायदा (१८२९), विधवा पुनर्विवाहाचा कायदा (१८५४) या मुळे स्त्रीयांच्या  बाबतीत लक्षणीय बदल घडून येऊ लागले.

### १) वुडचा खलिता (१८५४) :

भारतीय शिक्षणाच्या व्यापकतेबाबत चार्लस् वुडने प्रथम मांडणी केली. भारतीयांच्या शिक्षणासाठी जी विस्तृत योजना मांडली तीला मॅग्नाकार्टा म्हणतात (१८५४). समाजाची सांस्कृतिक पातळी उंचावण्यासाठी स्त्री स्वातंत्र्याची गरज आहे आणि यासाठी स्त्रीयांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी भूमिका वुडने आपल्या खलीत्यामध्ये मांडली. त्यामुळे पुढील काळात स्त्रीशिक्षण झपाट्याने वाढत गेले.

### २) हंटर आयोग (१८८२) :

सन १८८२ मध्ये डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना केली. त्यालाच हंटर आयोग म्हणतात. वूडच्या खलित्यानंतर भारतीयांची शैक्षणिक प्रगती किती कशी झाली हे तपासण्याच्या दृष्टीने या आयोगाची निर्मिती झाली. या आयोगाने प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षणासाठी स्त्री-पुरूष असा भेद न करता समान शिक्षण द्यावे अशी शिफारस केली. यातूनही स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली.

### ३) कलकत्ता विद्यापीठ आयोग (सॅडलर आयोग) (१९१९) :

या आयोगाने स्त्रीयांच्या शिक्षणाबाबत तरतूदी करताना ज्या ठिकाणी पडदापद्धती आहे अशा ठिकाणी मुलींना पडद्यातून शिक्षण देण्याची योजना सुरू करावी. स्त्रीविषयक आरोग्य शिक्षणाची सोय करावी. ज्या ठिकाणी पडदापद्धती नाही तेथे सहशिक्षणाला उत्तेजन द्यावे. प्रशिक्षित शिक्षिका तयार कराव्यात

धंदेशिक्षण, व्यवसाय शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण यांची तरतूद करण्यात यावी इ. ची शिफारस केली. यामुळे मोठ्या प्रमाणात स्त्रीवर्गात आत्मविश्वास निर्माण झाला. १९१४ मध्ये मद्रास येथे मुलींसाठी पहिले मेरी क्वीन्स कॉलेज स्थापन केले. १९१६ मध्ये धोंडो केशव कर्वे यांनी भारतातील स्त्रीयांचे पहिले विद्यापीठ 'भारतवर्षीय महिला विद्यापीठ' स्थापन केले. पुढे याचेच एस.एन.डी.टी. असे नामकरण झाले.

### ४) इतर प्रांतातील स्त्रीशिक्षण :

भारताच्या विविध भागात स्त्रीशिक्षणाच्या हालचालींना वेग आला. आर्य समाजाच्या प्रेरणेने लालदेवराज सोंधी यांनी सन १८९८ मध्ये पंजाबमध्ये गुरूकुल धर्तीवर एक 'जालदंर कन्या गुरूकुल' सुरू केले. कडक शिस्त ही या गुरूकुलचे वैशिष्ट्य होते. पंजाबच्या आत्माराम पंडीत यांनी बडोदा संस्थानात १९२५ मध्ये 'आर्य कन्या महाविद्यालय' सुरू केले. सन १९२२ मध्ये प्रयाग महिला विद्यापीठ मुलींच्या माध्यमिक व उच्चशिक्षणासाठी स्थापन केले. या ठिकाणी मातृभाषा, देशी भाषा, विविध शास्त्रे व काल इ. विषयांवर अभ्यासक्रम तयार केले होते. याशिवाय विधवा व परितक्त्यांसाठी निराळ्या संस्था काढण्यात आल्या. विधवाश्रम, अनाथाश्रम हे विभाग सुरू केले.

## क) स्वातंत्र्यानंतरच्या काळातील स्त्रीशिक्षण :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतापुढे ज्या अनेक समस्या होत्या त्यामध्ये शिक्षणाच्या क्षेत्रातील पुनर्गठन आणि स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यावरती विशेष भर दिला. सरकारने शिक्षण ही राष्ट्राची गरज आहे हे ओळखून मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न प्रकर्षाने हाती घेतला. विविध आयोग नेमून मुलभूत सुधारणा करण्यावरती भर ठेवला.

### १) राधाकृष्णन आयोग (१९४८-४९) :

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर १९४८ रोजी राधाकृष्णन आयोगाची स्थापना केली. त्यांनी स्त्री शिक्षणासंबंधी पुढील शिफारसी केल्या.

१. शिक्षणाच्या अधिकाधिक संधी स्त्रियांना उपलब्ध कराव्यात.

२. स्त्रियांना आपल्या आवडीप्रमाणे शिक्षण घेता यावे यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे.

३. महाविद्यालयातील सहशिक्षणाला उत्तेजन द्यावे व सोई सुविधा द्याव्यात.

४. स्त्री-पुरूषांना समान दर्जाचे शिक्षण मिळावे.

### २) हंसा मेहता समिती (१९६१-६३) :

श्रीमती हंसा मेहता यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली.

१. प्राथमिक स्तरावर मुला-मुलींना समान अभ्यासक्रम शिकविण्यात यावा.

२. माध्यमिक स्तरावरती अभ्यासक्रमामध्ये गृहशास्त्राचा समावेश करावा व हस्तव्यवसायाचेही शिक्षण द्यावे.

३. मुलींच्या रहाण्यासाठी वसतीगृहांची सोय करावी. संबंधित सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

४. सर्व शाळामध्ये महिला शिक्षिकांची संख्या असावी.

### ३) कोठारी आयोग (१९६४-६६) :

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. डी. एस. कोठारी यांच्या नेतृत्वाखाली या आयोगाने खालील शिफारसी केल्या.

१. पुरूषांचे शिक्षण आणि स्त्रीयांचे शिक्षण यामधील अंतर शक्य तितक्या लवकर कमी करावे.

२. मुलींच्या शिक्षणासाठी जनमत जागृती करून स्त्री शिक्षिकांची संख्या वाढवावी.

३. ११ ते १३ वयोगटातील मुलींना शाळेत येणे शक्य नसेल तर अंशकालीन शिक्षणाची सोय करावी.

### ४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६-९२) :

स्त्रीयांना व्यापक शिक्षण देण्यासाठी मुलींना प्राथमिक व स्त्रीयांना प्रौढशिक्षणाची सोय करण्यात यावी असे प्रयत्न केले गेले. शिक्षणामुळे स्त्रियांच्यामध्ये प्रगती होईल. त्या साक्षर होवून जागरूक होतील. त्यामुळे लोकसंख्येला आळा बसेल तसेच सुशिक्षित स्त्रिया बाळाचे संगोपन व त्यांच्यावर योग्य प्रकारे संस्कार करू शकतील. आरोग्य जपतील, पालनपोषण योग्य प्रकारे करतील. त्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून स्त्री शिक्षणावर भर दिला गेला. त्यांना व्यवसायिक व तांत्रिक अशा प्रकारचेही शिक्षण देण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या विविध उपाययोजनाद्वारे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढली. त्यांचे शिक्षणाबरोबरच, सामाजिक, आर्थिक विकास झाला. चूल आणि मूल या मर्यादेच्या कक्षा ओलांडून पुरूषांच्या बरोबरीने शिक्षणक्षेत्रात महिलांनी आघाडी घेतली. स्त्री साक्षरतेचे प्रमाण झपाट्याने वाढले. त्यांचे दुय्यम स्थान नष्ट होवून बरोबरीचा दर्जा मिळू लागला. स्त्रीया अबला न रहाता त्या आत्मनिर्भर बनल्या.

**स्वंयअध्ययन प्रश्न - १ :**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ....... च्या सनदी कायद्याने प्रथमच भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी १ लाख रूपये खर्च करण्याचे ठरले.

(अ) १८१५ (ब) १८२० (क) १८१३ (३) १८१७

२. ......... साली अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुंबईमध्ये शाळा सुरू केली व मुलींसाठी क्रमिक पुस्तके काढली.

(अ) १८२० (ब) १८१९ (क) १८१५ (ड) १८४५

३. १८४८ साली लोकमताची पर्वा न करता मुलींची पहिली शाळा म. फुले यांनी ........... येथे उघडली.

(अ) मुंबई (ब) पुणे (क) अहमदनगर (ड) सातारा

४. ...... यांनी भारतातील स्त्रियांचे पहिले विद्यापीठ स्थापन केले.

(अ) म. फुले (ब) डॉ. आंबेडकर (क) म. कर्वे (ड) राजाराम मोहन रॉय

५. ......... यांच्या अध्यक्षतेखाली हंटर आयोगाची स्थापना झाली.

(अ) सॅडलर (ब) कोठारी

(क) डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर (ड) डॉ. राधाकृष्णन

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वुडच्या खलित्याला काय म्हणतात ?

२. डॉ. राधाकृष्णन आयोगाची स्थापना केंव्हा झाली ?

३. मुंबई येथे 'सेवासदनची' स्थापना कोणी केली ?

४. प्राथमिक स्तरावर मुलामुलींना समान अभ्यासक्रम शिकविण्यात यावा ही कोणत्या समितीची सूचना होती ?

५. कोणत्या साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यात आले ?

### ३.२.२ विभाग दुसरा : १९ व्या शतकातील स्त्री आणि सुधारणा

भारतीय इतिहासामध्ये स्त्रीसुधारणेच्या दृष्टीने १९ व्या शतकाला अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कारण या काळात झालेल्या सर्व सुधारणावादी व पुनरूज्जीवनवादी चळवळी या प्रामुख्याने स्त्री प्रश्नाभोवती गुंतलेल्या होत्या. स्त्रीयांची स्थिती अत्यंत हलाकीची व अपमानास्पद होती. स्त्रीयांना सामाजिक, कौटुंबिक प्रतिष्ठा नव्हती. धर्म व्यवस्थेने स्त्रीयांना शिक्षणाचे, समतेचे सर्व हक्क नाकारलेले होते. अंधश्रद्धा आणि रूढीपालनावरती भर होता. अंधश्रद्धा, बालविवाह सतीपद्धती, विषम विवाह, बहुपत्नीपद्धती या सर्वांमुळे विषमतावादी सामाजिक व्यवस्थेच्या त्या बळी ठरल्या होत्या. या प्रश्नांना ऐरणीवरती आणण्यासाठी त्यांना न्याय देण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी कार्य केले. त्यामध्ये बंगालमधील रजाराम मोहन रॉय ते महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक कार्य अभ्यासणे आवश्यक आहे.

**स्त्री-शिक्षणाबाबत सरकारचे धोरण :**

१९ व्या शतकाच्या पूर्वाधात कंपनी सरकार स्त्री सुधारणा आणि स्त्रीशिक्षण याबाबतीत फारसे उत्सुक नव्हते किंवा हस्तक्षेप करीत नसे. जनतेच्या धार्मिक भावना दुखावतील म्हणून ते फारसे सुधारणाबाबत अनुकूल नव्हते. पण सरकारच्या या धोरणात बदल करण्याचे श्रेय ग. ज. लॉर्ड बेटिंग कडे जाते. त्याने १८२९ साली सती बंदीचा कायदा केला आणि सरकारच्या स्त्री शिक्षणाच्या धोरणात बदलही केला. स्त्री शिक्षणाची जबाबदारी उघडपणे स्विकारली आणि त्यासाठी सनातन्यांचा विरोध सहन करीत स्वकियामध्येच स्त्री शिक्षणाचे स्फूलींग पेटवून या कामामध्ये त्यांची मदत घेतली आणि स्त्री सुधारणेचा व स्त्री शिक्षणाचा पाया रचला गेला. स्वकियामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी बंगालमध्ये तर महात्मा फुले यांनी महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचे नेत्रदिपक कार्य केले. लॉर्ड डलहौसी याने स्त्रि शिक्षणाचे फायदे समाजाला पटवून दिले आणि स्त्री शिक्षण हा सरकारच्या शिक्षण मंडळाच्या कक्षेतील विषय आहे हे सरकारलाच पटवून दिले यामुळे सरकारने स्त्री शिक्षणाची जबाबदारी उघडपणे स्विकारली.

### विविध समाज आणि स्त्री सुधारणा

**१) राजाराम मोहन रॉय आणि ब्राम्होसमाज :**

धर्मशास्त्राचा चिकित्सकपणे अभ्यास करून आधुनिक विचारसरणी निर्माण करणे व त्या पद्धतीने वर्तन-व्यवहार झाले पाहिजेत अशी म्हणणारी पहिली प्रबुद्ध व्यक्ती म्हणजे राजाराम मोहन रॉय. त्यांनी स्त्री विषयक समानतेचा पुरस्कार केला आणि त्यासाठी आयुष्य वेचले.

## १) सती बंदी :

सन १८१५ साली राजाराम मोहन रॉय यांनी सती प्रथेवर हल्ला चढवणारे पहिले पुस्तक लिहले. या पुस्तकाचे इंग्रजांनी १८१८ मध्ये इंग्रजीमध्ये भाषांतर केले. मात्र याला विरोध म्हणून ११८ पंडीतांनी जाहीरनामा काढून रॉय यांची मते चूकीची ठरविली. ब्रिटिश मिशनऱ्यांनी सुद्धा रॉय यांची बाजू घेत सतीप्रथा ही रानटीपणाचे उदाहरण आहे असे निदर्शनास आणून दिले.

आधुनिक भारताचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्यांनी सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता स्त्री सुधारणेचा पाया बंगालमध्ये रचला. यासाठी त्यांनी इंग्रजी, फ्रेंच, लॅटीन, ग्रीक, बिब्रू, पर्शियन, अरेबिक इ. भाषा शिकल्या आणि १८२८ साली ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. ब्राह्मोसमाज हा भारतातील धर्म, समाज आणि स्त्री उन्नतीच्या चळवळीत अग्रेसर होता. राजाराम मोहन रॉय हे मानवतावादाचे भोक्ते होते. त्यामुळे स्त्री सुधारणेच्या बाबतीत अत्यंत मोलाचे कार्य करून भारतात स्त्री उन्नती व सुधारणा चळवळीचा पाया घातला. जवळजवळ १८ वर्षे म्हणजे समाजातील ही अनिष्ठ चाल कायद्याने बंद होईपर्यंत त्यांनी मोठ्या हिमतीने या विरूद्ध लढा दिला. शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि तत्कालीन ग. ज. लॉर्ड बेंटिंग यांनी इ.स. १८२९ साली सतीबंदीचा कायदा मंजूर केला. या कायद्याच्या द्वारे सती जाणे अगर सती जाण्यास भाग पाडणे किंवा जीवंत जाळणे, पुरणे हे बेकायदेशीर ठरविण्याक आले आणि तो मनुष्यवधाचा गुन्हा समजून फौजदारी शिक्षेची तरतूद केली. पुढे हा कायदा मुंबई आणि मद्रास प्रांतातही लागू झाला. आणि राजाराम मोहन रॉय यांनी हिंदू धर्मातील ही अत्यंत क्रूर चाल कायद्याने बंद करून स्त्री सुधारणेचा पाया घातला.

## २) भृणहत्या विरोध :

मुलगी जन्माला येणे हे १९ व्या शतकात पाप समजले जात होते किंवा शाप समजले जाई. यामुळे मुलीचा जन्म होताच त्यांना मारून टाकले जात असे. यासाठी मुलींना आफू सारखे मादक पदार्थ देवून मारले जात. या वाईट प्रथे विरूद्ध बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी आवाज उठविला. परिणामी कायद्याद्वारे बालहत्या बेकायदेशीर घोषित करण्यात आले.

## ३) बालविवाह व विधवा विवाह प्रतिबंध पद्धतीस विरोध

सन १८३३ साली राजाराम मोहन रॉय यांचे निधन झाले आणि ब्राह्मो समाजाचे कार्य थोडे थंडावले पण स्त्री सुधारणा बाबत आणि त्यांच्या जागृतीला सुरूवात झाली. 'समाचार दर्पण' मध्ये स्त्रीयांच्या प्रश्नांची झोड उठवली गेली. १८३५ साली स्त्रीयांच्या स्थितीची निदर्शक पत्रे म्हणून यांचे महत्त्व आहे. यामध्ये

१. वय वर्षे ४ ते १२ असणाऱ्या मुलींची लग्ने लावली जात होती.

२.	मुलींना नवरा निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते.

३.	मुलींना पाश्चात्य शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला.

देवेंद्रनाथ यांनी या बाबत पुढाकार घेतला आणि १८७२ साली मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा १४ वर्षे असावी असा 'नेटिव्ह सिव्हिल मॅरेज ॲक्ट' आणि 'ब्राह्मो मॅरेज ॲक्ट' मंजूर करून घेतला. तर केशवचंद्र सेन यांनी स्त्री सुधारणा व सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. स्वत:च्या पत्नीला पडदा पद्धतीतून बाहेर काढले. पती-पत्नीच्या मैत्रीवर नांदणारा गृहस्थाश्रम हेच ब्राह्मो समाजाचे अधिष्ठान मानले.

ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहावरील बंदी हटविण्यासाठी मोहिम सुरू केली. १८५५ मध्ये ब्रिटिश सरकारकडे विनंतीपत्र सादर करून विधवा पुनर्विवाहाचा कायदा समंत करण्याची विनंती केली. यासाठी एक बील सुद्धा सादर केले. पण या बिलाविरूद्ध कट्टर उच्चवर्गियांनी कडाडून विरोध केला. पण तरीसुद्धा सन १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह बिल पास झाले. यामुळे त्याकाळात भारतभर जवळजवळ ५०० च्या वर विधवांचे विवाह झाले. त्या सर्व कुमारी विधवा होत्या.

**४)	स्त्रीशिक्षण :**

स्त्रीयांच्या वरती होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी स्त्रीयांना शिक्षित होणे आवश्यक होते. आणि हा मुद्दा ब्राह्मो समाजाने उचलून धरला. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत ब्राह्मो समाजाने स्त्रीशिक्षणाची मोहीम सुरू केली. सुरूवातीला उच्च जातीतीलच मुली शाळांमध्ये जाऊ लागल्या. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी बंगाली चालीरीतींचा मेळ घालणारा अभ्यासक्रम तयार केला. त्यांना 'बंगाली' व 'संस्कृत' या दोन्ही भाषा शिकविल्या जाऊ लागल्या. केशवचंद्र सेन यांनी 'नॉर्मल स्कूल' आणि उच्चशिक्षणासाठी व्हिक्टोरिया इन्स्टिट्युट या संस्था १८८३ साली स्थापन केल्या. १८५७-५८ पर्यंत बंगालमध्ये ३५ मुलींच्या शाळा सुरू झाल्या. स्त्रीयांच्या दयनिय स्थितीचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव हे ओळखून ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्रीशिक्षणाकडे लक्ष दिले त्यांच्या या नवोदित विचारांचे लोण भारतात अनेक ठिकाणी पसरले.

## २)	आर्यसमाज : स्वामी दयानंद सरस्वती

स्त्रीयांच्या सुधारणा चळवळीच्या कामात १९ व्या शतकाच्या उतरार्धात आर्यसमाजाने केलेले कार्य अनन्य साधारण आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी भारतभ्रमन करून १८७५ साली आर्य समाजाची स्थापना केली. या समाजाने वेदांचा अभ्यास, स्त्रीशिक्षणावर भर, बालविवाह व बहुपत्नीकत्वाला विरोध,

विधवा विवाहाला पाठींबा इ. बाबींवर भर दिला. सुवर्णयुगाचा सिद्धांत मांडून वेदकाळात स्त्रीयांना उच्चदर्जाचे स्थान होते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला. १८३९ मध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी 'तत्वबोधीनी' स्थापन केली आणि त्यानुसार वेदांचा प्रसार व उपनिषधांतील एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये 'सत्यार्थ प्रकाश' ग्रंथ लिहिला. त्यामधून स्त्री-पुरूष समानतेवरती भर दिला. वयाच्या ५ व्या वर्षी मुलींनी संस्कृत, हिंदी व परकिय भाषांचा अभ्यास केला पाहीजे. मुलींनी वयाच्या १६ व मुलांनी वयाच्या २५ वर्षापर्यंत ब्रह्मचर्य राहून शिक्षण घ्यावे असे त्यांचे मत होते.

### १) बालविवाह आणि विधवापुनर्विवाह

स्वामी दयानंद सरस्वती यांनी बालविवाहाचा निषेद करून प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला. त्याकाळी मुलीच्या ७ किंवा ८ व्या वर्षी विवाह केला जात असे. बालविवाहाप्रमाणे बहुपत्नीकत्वाची पद्धतही समाजामध्ये रूढ होती. या प्रथेलाही आर्य समाजाने प्रखर विरोध केला. बालविवाह त्यामुळे बालविधवा नंतर केशवपन यामुळे विधवेचे जीवन हलाखीत जात असे. या समाजाने वृत्तपत्रांमध्ये विधवाविवाहाची जाहीरात देवून विधवा विवाहाची पद्धत सुरू केली. १८८२-८३ मध्ये विधवा विवाहाचे समर्थन करणाऱ्या दोन पुस्तिकासुद्धा काढल्या.

### २) शिक्षण :

आर्य समाजाने १८९० साली मुलींसाठी जालंधर येते आर्य कन्या शाळा सुरू केली. या शाळेची मुख्याध्यापक सुद्धा स्त्री होती. बालविधवाना अविवाहीत मुली म्हणून शाळेत प्रवेश दिला, स्त्रीयांसाठी वैदिक शाळा तर विधवांसाठी आश्रम उभारली. १८९१ मध्ये मुलींच्या उच्चशिक्षणासाठी कन्या महाविद्यालय सुरू केले. मुलींना उच्चशिक्षण द्यावे की नको ? यावर आर्य समाजात वाद झाला पण तरीसुद्धा मुलींना शिक्षण देण्यापासून या समाजाने काढता पाय घेतला नाही.

पंडिता रमाबाई या उत्तम व्याख्याती होत्या. त्यांना कलकत्ता येथे बोलावून 'बुद्धीची देवता' म्हणजे पंडिता ही पदवी प्रदान केली. त्यांच्या विवाह मेधवी या बंगालमधील शूद्र जातीतील वकीलाशी झाला. पण पतीच्या निधनानंतर त्यांनी भारतीय शिक्षणावरती लक्ष केंद्रीत केले. स्त्रीयांनी ज्ञानसंपादन करून उन्नती करावी असे त्यांचे मत होते. 'आर्य महिला सभा' (१८८२), शारदा सदन (१८८९) मार्फत स्त्रिशिक्षणाच्या क्षेत्रात पंडिता रमाबाई यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण आहे.

## ३) थिऑसॉफिकल सोसायटी

भारतीय संस्कृती आणि विचारसरणीने प्रभावित झालेल्या पाश्चात्य विदुषी एच.पी. ब्लाव्हाटस्की या महिलेने १८७५ मध्ये अमेरिकेत या संस्थेची स्थापना केली. डॉ. ॲनी बेझंट या त्यांच्या शिष्या होय. या सोसायटीने विधवा पुनर्विवाहावरती भर दिला. त्यांनी बहुपत्नीकत्व, बालविधवा, हुंडा, देवळातील नर्तीका या प्रश्नाविरोधी मोहिम उघडली. ॲनीबेझंट या आयरीश होत्या. त्यांनी नास्तिकता, संततीनियमन, स्त्रीयांच्या मतदानाचा अधिकार इ. चळवळी इंग्लंडमध्ये चालविल्या होत्या. त्याचा प्रयो त्यांनी येथेही केला.

### १) शैक्षणिक कार्य :

डॉ. ॲनी बेझंट यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य फार महत्त्वाचे आहे. हिंदू दर्शन आणि भारतीय संस्कृती यावरती त्यांचा पूर्ण विश्वास होता आणि याद्वारेच भारतीय महिलांची प्रगती होवू शकते असे त्यांचे मत होते. बनारस येथे यासाठी 'सेंट्रल हिंदू स्कूल' स्थुापन केले. त्याचेच पुढे हिंदू विश्वविद्यालयात रूपांतर झाले. नॅशनल कॉलेज, नॅसनल युनिव्हर्सिटी स्थापन करून सहभोजने, बालविवाहास प्रतिबंध, स्त्रीयांची सुधारणा यासाठी या संस्थांचा वापर केला गेला. १८१७ साली 'वुमेन्स इंडिया असोसिएशन' ही संस्था स्त्रीयांच्या प्रश्नांची सामाजिक व राजकीय पातळीवर चर्चा करण्यासाठी स्थापन केली. विविध महिला कॉलेजची स्थापना केली.

## ४) सत्यशोधक समाज (२४ सप्टेंबर १८७३)

स्त्रीया आणि शुद्रांच्यासाठी अथक परिश्रम करणारे महाराष्ट्रातील समाजसुधारक म्हणून महात्मा जोतिबा फुले यांना मान दिला जातो. पुण्याच्या पेशवाईमध्ये फुलेंचा जन्म १८२७ मध्ये झाला. या काळात स्त्रीयांनी शिक्षण घेणे हा मनुस्मृतीप्रमाणे गुन्हा होता. म. फुले यांनीही मनुस्मृतीच नाकारली. अनेक ग्रंथांची रचना केली. त्याद्वारे स्त्रिया आणि शुद्रादीशुद्रांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा मूलभूत विचार त्यांनी मांडला आणि यासाठी त्यांनी स्त्रीशिक्षणावरती भर दिला.

### १) शैक्षणिक कार्य :

सन १८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा उघडली. आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षीत करून त्या स्वत: मुलींना शिकवू लागल्या. तत्कालीन ब्राह्मण वर्गाला या गोष्टीचा संताप आला. त्यामुळे त्यांनी सावित्रीबाईंना शाळेत जाताना दगड-गोटे मारून, शिव्या-शाप देवून, चिखलगोळे मारून त्रास द्यायला सुरूवात केली. म. फुले यांना बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी

स्वत:चे घर सोडावे लागले. १८५३ पर्यंत म. फुले यांनी मुलींसाठी तीन व अस्पृश्य मुलांसाठी एक शाळा काढली. मात्र त्यांना उच्चवर्गीय हिंदू जातीच्या रोषाला सामोरे जावे लागले. सावित्रीबाईंच्या शाळेत मुक्ता साळवे सारखी पुरूषप्रधान संस्कृतीला सडेतोड प्रश्न विचारणारी शिष्या तयार झाली.

**२) बालविवाहास विरोध :**

त्याकाळी हिंदू धर्माच्या नियमानुसार बालविवाह केले जात जे अत्यंत चूकीचे होते. बालविवाह ही अनिष्ट आणि दुष्ट प्रथा आहे. ती मोडून काढण्यासाठी फुले दांपत्याने प्रचंड प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मुलाचे वय १९ व मुलीचे वय ११ या खालील विवाहास मान्यता असू नये असा कायदा करण्यास भाग पाडले. आणि या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालकांवर कर बसवावा व तो पैसा शाळेसाठी वापरावा असे म. फुले यांनी सुचविले.

**३) विधवापुनर्विवाह :**

बालविवाहावरती बंदी आणून विधवांचा पुनर्विवाह झाला पाहिजे अन्यथा सक्तीचे वैधव्य आलेल्या विधवांचा तरूणपणात पाय घसरतो आणि त्यातून भ्रूणहत्यासारखी क्रूर कृत्ये घडतात. त्यामुळे बालविवाह थांबविले पाहिजेत की ज्यामुळे विधवांचे प्रमाण थांबेल आणि स्त्रीयांचे दु:ख कमी होवून त्यांची प्रश्ने संपतील.

**४) बालहत्या प्रतिबंधकगृह :**

अडचणीत सापडलेल्या विधवा स्त्रीयांच्या अनौरस मुलांना सांभाळण्यासाठी म. फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना स्वत:च्या घरामध्येच केली आणि त्या लहान मुलांचा सांभाळ, संगोपन स्वत: सावित्रीबाई करीत असत. स्वत:च्या घरामध्ये असा आश्रम स्थापन करणारे व इतर उच्चवर्गीय स्त्रीयांची अनौरस संतती सांभाळणारे फुले दांपत्य हे भारतातील पहिले असावे.

**५) केशकर्तनाविरोधी चळवळ :**

त्याकाळी विधवा स्त्रीयांना समाजामध्ये सन्मानाने जगता येत नव्हते किंबहूना जगणे हे मरणापेक्षा वाईट होते. विधवेने एक तर सती जावे किंवा तीचे केशवपन करून विद्रूप केले जात असे. अपमानिताचे जिणे तीच्या वाट्याला आले होते. म. फुले यांनी मुंबईतील न्हाव्यांचा संप घडवून आणला की आम्ही विधवांचे केस कापणार नाही. अशी चळवळ महाराष्ट्रा पहिल्यांदा उभारली. एकूणच अंधश्रद्धा, दैववाद, बालविवाह, जुन्या-रूढी-परंपरा यावरती एकच औषध होते ते म्हणजे शिक्षण. हे म. फुले यांनी ओळखले होते आणि त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

याशिवाय माता तपस्विनी यांनी १८९३ साली कलकत्ता येते महालक्ष्मी पाठशाळा काढली. १८९६ साली महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेची स्थापना केली. पुढे १८९१ साली भारतीय फॅक्टरी ॲक्ट नुसार स्त्रीयांच्या दिवसाचे कामाचे तास ११ ठरविले. एकूणच १९ व्या शतकामध्ये स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी अथक परिश्रम घेतले गेले.

**स्वंयअध्ययन प्रश्न - २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ....... साली सतीबंदीचा कायदा पास झाला.

(अ) १८२९ (ब) १८३० (क) १८२७ (ड) १८३१

२. आधुनिक भारताचे जनक म्हणून ...... यांना ओळखले जाते.

(अ) लो. टिळक (ब) राजा राममोहन रॉय

(क) भादुराजी लाड (ड) लॉर्ड बेंटिंग

३. एकेश्वरवादाचा पुरस्कार ....... यांनी केला.

(अ) ईश्वरचंद्र विद्यासागर (ब) राजा राममोहन रॉय

(क) स्वामी दयानंद सरस्वती (ड) महात्मा जोतिबा फुले

४. एच. पी. ब्लाव्हाटस्की या महिलेने ....... समाजाची स्थापना केली.

(अ) थिऑसॉफीकल सोसायटी (ब) सत्यशोधक समाज

(क) आर्यसमाज (ड) प्रार्थना समाज

५. सत्यशोधक समाजाची स्थापना ............... यांनी केली.

(अ) म. फुले (ब) लो. टिळक (क) आगरकर (ड) महर्षी कर्वे

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सावित्रीबाई फुले यांची शिष्या कोण होती ?

२. हिंगणे स्त्रिशिक्षण संस्थेची स्थापना कोणी केली ?

३. मुंबईमध्ये नाभीकांचा संप कोणी घडवून आणला ?

४. कोणत्या ग. ज. ने सतीबंदीचा कायदा पास केला ?

५. विधवा पुनर्विवाहावखरील बंदी हटविण्यासाठीची मोहीम कोणी सुरू केली ?

### ३.२.३ विभाग तिसरा : स्त्रियांच्या संघटनांचा उदय

स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच स्त्रियांनी एकत्र येऊन संघटना निर्माण करावयास सुरूवात केली होती. त्यांचा मुख्य हेतू हा स्त्रियांचा विकास करणे, अस्पृश्यता निवारण करणे, स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, आत्मविश्वास निर्माण करणे हा होता. १९७० नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्त्रियांच्या संघटनात्मक कार्याचा, विचारांचा प्रभाव भारतातील स्त्रीवादी संघटनावरती झाला. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरती स्त्रिविषयक दृष्टीकोनातून बदलाचे वारे वाहू लागले. विविध समस्या घेऊन महिला एकत्र येऊ लागल्या. याशिवाय महागाई, स्त्रियांवरील अत्याचार, पोलीस दमनशाही, राजकीय दडपशाही, कौटुंबिक अत्याचार या प्रश्नांना घेवून विविध स्तरांवरती स्त्रियांनी संघटना निर्माण केल्या आणि आपला दबाव सरकारवरती ठेवला. याचा परिणाम म्हणून शासनाला महिलाविषयक विविध सुधारणात्मक कायदे करणे भाग पडले.

### १) स्त्रीवाद म्हणजे काय ?

''मानवी इतिहासाच्या जडणघडणीमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम स्थान का व कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबण्याचे मार्ग, आव्हाने, चळवळी यांची मांडणी व अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय.'' किंवा पुरूषप्रधान समाजामध्ये स्त्रियांचे होणारे शोषण व त्यांना दिली जाणारी दुय्यम भूमिका याबद्दल वेगवेगळ्या मतांच्या किंवा विचारसरणीच्या स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून अभ्यास करणे.'' थोडक्यात स्त्रियांची सर्व क्षेत्रातील कामगिरी दुर्लक्षिली गेली, ती विकृत स्वरूपात मांडली गेली. याशिवाय सर्व स्त्रीजात समस्या एक ही भूमिका न गेता समाजातील उच्चवर्णीय स्त्रियांच्या सहभागाविषयी ठसठसीतपणे लिहीले गेले, पण ज्यांचे योगदान प्रशंसनीय आहे अशा आदिवासी स्त्रिया, दलित स्त्रिया, ग्रामीण भागातील अशिक्षित व अर्धशिक्षित स्त्रियांना या लेखनांतून वगळले गेले.

### २) स्त्री अभ्यासाची सुरूवात :

स्त्री अभ्यासाची सुरूवात प्रथम अमेरिकेत झाली. पाश्चिमात्य राष्ट्रातील महिलांचे प्रश्न आणि भारतीय महिलांचे प्रश्न यामध्ये तफावत होती. भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांवरती बालविवाह, रूढी, चालीरीती, अशिक्षितपणा, जातीयवादी धर्मवादी, हिंसा यासारख्या घटनांचा प्रभाव होता.तर इंग्लंड-अमेरिका मधील

स्त्रियांनी १९२० मध्ये मतदानाच्या हक्कासाठी चळवळ सुरू केली होती. भारतीय महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास व्हावा यासाठी १९७१ मध्ये एका राष्ट्रीय समितीची निर्मिती श्रीमती फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली केली गेली. या समितीने स्त्रियांच्या आरोग्य, शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग याविषयी माहिती अहवालातून प्रसिद्ध केली. १९७३ मध्ये मुंबईत एस.एन.डी.टी. या महिला विद्यापीठात पहिल्या स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना झाली. १९८१ मध्ये मुंबईमध्ये महिला अध्ययन विषयक राष्ट्रीय संमेलन आयोजित केले आणि त्यामध्ये 'अखिल भारतीय स्त्री परिषद'ची स्थापना केली गेली. त्यानंतर अशा संघटना संपूर्ण राज्यात निर्माण होवू लागल्या विद्यापीठ अनुदान आयोगानेही विद्यापीठ व महाविद्यालयामधून स्त्री अभ्यास केंद्र स्थापन केली. या सर्व अभ्यासांमधून विविध स्तरावरती स्त्रियांच्या संघटना निर्माण होवू लागल्या. त्या विविध स्त्री संघटनांचा उगम कसा झाला ते पहाणे महत्त्वाचे आहे.

## अ) वसाहतकालीन स्त्री संघटना / स्वातंत्र्यपूर्वकालीन स्त्री संघटना

### १) स्थानिक महिला संघटना

बंगालमध्ये केशवचंद्रसेन यांनी ब्राह्मोसाजाची स्थापना केली. स्त्री-पुरूष समानतेसाठी ही संस्था स्थापन केली. प्रार्थना समाजाचे डॉ. भांडारकर व रानडे यांनी स्त्रियांचा दर्जा सुधारण्याकडे विशेषत्वाने लक्ष दिले. न्यायमूर्ती रानडे यांनी पंडिता रमाबाई रानडे यांना आर्य महिला समाज स्थापन करण्यास मदत केली. दर आठवड्याला या महिलांनी व्याख्याने आयोजित करावी असे ठरल्याने स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. पंडिता रमाबाई रानडे यांच्या कार्याने धोंडो केशव कर्वे यांना प्रेरणा मिळाली. १९०५ मध्ये भारतीय महिला परिषदेची स्थापना झाली. निष्काम मठ, समता संघ यासारख्या स्थानिक संघटना निर्माण होवून स्त्रियांचा उद्धार, जातीभेद व अस्पृश्यता निर्मूलन, शिक्षण यासारख्या क्षेत्रात स्त्रिया काम करू लागल्या. १९०५ मध्ये क्रांतीवीर बाबासाहेब सावरकर यांच्या प्रेरणेने 'आत्मनिष्ठ युवती संघ' या नावाची स्त्रियांची संघटना नाशिक येथे स्थापन झाली. पारशी समाजातील स्त्रीयांनीसुद्धा आपली संघटना निर्माण केली. लाहोरमध्ये २०० शीख स्त्रीयांनी एकत्र येवून मुलींची शाळा सुरू केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी १९१६ मध्ये होमरूल लीगची स्थापना केली आणि लो. टिळकांनी महाराष्ट्रात लीगची स्थापना केली. आणि इंग्लंडमधील स्त्रियांना मताधिकार मिळण्यासाठी चळवळ सुरू केली. रमाबाई रानडेंच्या नेतृत्वाखाली १९ संघटना कार्यरत झाल्या. यामुळे मताधिकार आणि सोयीसवलतींचे फायदे घेणे स्त्रियांना शक्य झाले.

## २) प्रादेशिक महिला संघटना :

भारताच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात स्त्रियांचा प्रत्यक्ष मोठ्या प्रमाणात सहभाग झाला तो महात्मा गांधीजींच्या मुळे, त्यांच्या प्रत्यक्ष भाषणांतून स्त्रियांमध्ये पुरूषांच्या बरोबरीने कार्य करण्याची किंबहुना पुरूषांपेक्षा अधिक निष्ठेने कार्य करण्याची सक्ती असते असे म्हणत असत. त्यामुळे स्त्रियां जागृत झाल्या. म. गांधीची पहिली शिष्या अवंतिकाबाई गोखले यांनी दलितोद्धार व स्त्रीजागृतीचे काम केले. १९१८ साली हिंदू महिला सभेची स्थापना झाली आणि या सभेने 'हिंदू महिला' हे पहिले मराठी साप्ताहिक सुरू केले. म. गांधींच्यामुळेच पेरीत कॅप्टन, हंसा मेहता, जयश्री रामजी, अवंतिकाबाई गोखले, यशोदाबाई भट, कृष्णा घुमटकर यांनी 'देशसेविका संघ' स्थापन केला. पुढे हिंदूस्थानी सेविकादलची स्थापना होवून महिलांचा विकास हे ध्येय समोर ठेवून महिलांनी काम सुरू ठेवले. म. गांधींच्या आंदोलनामध्ये स्त्रिया सहभागी झाल्या पाहीजेत यासाठी महिलांच्या विविध संस्था उभ्या केल्या.

## ३) राष्ट्रीय महिला संघटना :

स्त्रियांच्या समस्या, त्यावरील उपाय, स्त्री हितसंबंध या संदर्भात स्त्रीया परखड बोलू लागल्या व कृतीही करू लागल्या. २० व्या शतकाच्या पूर्वाधापर्यंत भारतभर महिला विविध संघटनांच्या माध्यमातून एकत्र येवू लागल्या. सरलादेवी चौधरी यांनी 'भारत स्त्री महामंडल'ची स्थापना १९१० मध्ये केली आणि याच्या शाखा लाहोर, दिल्ली, कराची, अमृतसर, हैद्राबाद, कानपूर, कलकत्ता, अलाहाबाद इ. ठिकाणी स्थापन केल्या. विविध वृत्तपत्रे नियतकालीकांमधून स्त्रियांच्या नैतिक आणि भौतिक उन्नतीसाठी पुरूषांच्या जाचातून सुटका करून घ्यावी लागेल असे क्रांतीकारी विचार मांडले. स्त्रियांची 'पडदापद्धत' ही स्त्री शिक्षणातील मुख्य अडथळा होता म्हणून त्यांच्या घरी जाऊन त्यांना लिहिणे, वाचणे, संगीत, शिवणकाम, विणकाम इ. चे शिक्षण दिले गेले. पहिल्या महायुद्धानंतर म्हणजे १९१७ ते १९२७ दरम्यान राष्ट्रीय स्तरांवरती कार्य करणाऱ्या महिला संघटनांच्या स्थापना झाल्या.

## ४) भारतीय महिला संघटना :

श्रीमती मार्गारेट कझिन्स या स्त्रीवादी आयरिश नेत्यांच्यामुळे स्त्रियांना शिक्षण, हस्तव्यवसाय व मैदानी खेळ आले पाहिजेत यासाठी महिलांची भारतीय संघटना मद्रासमधील अड्यार येथे सन १९१५ मध्ये स्थापन झाली. श्रीमती ॲनी बेझंट, श्रीमती मार्गारेट कझिन्स, श्रीमती मालती पटवर्धन इ. नी भारतीय महिला संघटना स्थापन केली. या संघटनेच्या जवळपास ४० च्या वरती शाखा सुरू झाल्या. या संघटनेमध्ये धर्म, शिक्षण, राजकारण आणि लोकोपकार असे चार विभाग होते. प्रत्येक स्त्रीने आपल्या आवडीनुसार विभागामध्ये काम करावे असे ठरले. या संघटनेने 'स्त्रीधर्म' नावाचे इंग्रजी मासिकही सुरू केले होते. या

संघटनेने पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाविरूद्ध लढण्यासाठी आत्मसन्मान चळवळ उभी केली. ब्राह्मण प्रतिकारांचा अस्विकार या चळवळीने व संघटनेने केला.

### ५) भारतीय स्त्रियांचे राष्ट्रीय मंडळ :

महेराबाई टाटा यांच्या पुढाकाराने सन १९२५ मध्ये मुंबईत भारतीय स्त्रीयांचे राष्ट्रीय मंडळ स्थापन झाले. या मंडळामधील स्त्रीयांनी घरोघरी जाऊन पडदापद्धतींतून स्त्रियांना मुक्त करा असे पुरूषांना आवाहन केले. मात्र या मंडळामधील स्त्रिया श्रीमंत व मोठ्या हुद्यावरील असल्यामुळे ग्रामीण भागात काम करणे यांना जमले नाही. याशिवाय स्वातंत्र्य चळवळी पासूनही हे मंडळ फारच लांब राहिले.

## ब) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री संघटना :

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या प्रश्नांना शिक्षण, जातीभेद, धर्म, राजकारण इ. प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. तसेच स्वातंत्र्य चळवळीतही स्त्रियांनी बहुमोल योगदान दिले. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये प्रश्नांचे स्वरूप बदलले. त्यामध्ये खास करून दुष्काळ, पेट्रोल दरवाढ, महागाई, जिवनावश्यक वस्तूंची टंचाई इ. विषयी स्त्री संघटनांनी आंदोलने केली. १८७२ मध्ये 'महागाई प्रतिकार संयुक्त महिला समिती' स्थापन झाली. तसेच १९७५ मध्ये स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या संपन्न करण्यासाठी 'अन्नपूर्ण महिला मंडळ' निर्माण झाले. स्त्रीमुक्ती संघटना, नारीमंच, क्रांतीकारी महिला संघटना, महिला दक्षता समिती, जनवादी महिला संघटना याशिवाय विविध राजकीय पक्षांच्या महिला संघटनाही स्थापन झाल्या आणि विविध विषय घेवून त्यांनी जनआंदोलने केली. वसाहत काळातील किंवा स्वातंत्रपूर्व काळातील स्त्री संघटनांनी स्त्रियांचे सामाजिक प्रश्न, मतदानाचा हक्क, स्त्रियांचा छळवाद, देवदासी प्रथा, वेश्या व्यवसाय इ. प्रश्न राष्ट्रीय स्तरावरती नेऊन संघर्ष केला. तर स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या संघटनांनी वरील विषय हातळले. या संघटनामध्ये प्राध्यापक, डॉक्टर, वकील, नर्सेस यांची संख्या लक्षणीय होती. स्वातंत्र्यानंतर यु.जी.सी. सारख्या राष्ट्रीय शैक्षणिक संस्थेने महाविद्यालयीन स्तरावरती अभ्यासकेंद्रे स्थापन केली. यामध्ये पुणे, मुंबई, एस.एन.डी.टी. सारखी विद्यापीठ प्रथम स्थानावरती राहीली.

## भारताच्या विविध भागातील स्त्रियांच्या संघटना

### १) आसाम :

लेनिनच्या विचारांवरती अधारीत असलेली 'नारीमुक्ती संस्था' १९७९ मध्ये आसाममध्ये स्थापन झाली. या संस्थेने स्त्रियांची छळवणूक थांबविणे, स्त्री-पुरूष समानहक्क यासाठी संघर्ष केला. प्रसंगी जनआंदोलनाचा कार्यक्रम स्विकारला.

२) **बिहार :**

१९७९ मध्ये बिहारमध्ये 'छात्र युवा संघर्ष वाहिनी' या संघटनेने महत्त्वपूर्ण कार्य केले. हुंडा विरोधी भूमिका तसेच दलित स्त्रियांच्या जमिनीविषयक हक्कांचा पुरस्कार या संघटनेने केला. वर्ग व जातविरोधी कार्य करणारी ही एक महत्त्वाची संघटना होती.

३) **गुजरात :**

सन १९७० नंतर स्त्रीयांना रोजगार देण्यासाठी गुजरातमध्ये अनेक संघ स्थापन झाले. त्यामध्ये महत्त्वपूर्ण काम करणारी स्त्रियांची संस्था अहमदाबाद येथे स्थापन झाली. ती म्हणजे 'सेल्फ एम्पॉईड वुमेन्स असोसिएशन' स्त्रियांना बाळतपणाचे फायदे. विधवाना विविध सोयी-सवलती, हस्तोद्योगांची निर्मिती याशिवाय भव्य मोर्चे काढून स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या संघटनेने केले.

४) **महाराष्ट्र :**

देशाच्या विविध भागात स्त्री संघटनानी जोर धरला असताना महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या विविध संघटना स्थापन झाल्या. आपल्या न्याय हक्कांसाठी शासनांशी संघर्ष करून कांही सवलती मिळवून घेण्यामध्ये 'महाराष्ट्रातील स्त्री संघटना यशस्वी झाल्या. या संघटनांनी फक्त महाराष्ट्राबाहेरील झालेल्या चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले असे नाही. तर १९ व्या शतकांपासून महाराष्ट्रात समाजसुधारणा चळवळी सुरू झाल्या होत्या. म. फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे या सुधारकांनी स्त्रियांचा प्रश्न ऐरणीवरती मांडला. यातूनच स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रामध्ये अनेक महिला मंडळे व संघटना स्थापन झाल्या. पुणे, नाशिक, लातूर, औरंगाबाद, धुळे या ठिकाणी स्त्री संघटना कार्यरत होत्या. मथुरा बलात्कार, मंजुश्री सारडा हुंडाबळी, जळगाव वासनाकांड, लैंगिक छळवणूक, एकतर्फी प्रेमातून स्त्रीयांच्या केल्या जाणाऱ्या हत्या या विरोधी महाराष्ट्रातील स्त्री संघटना संघटीतपणे प्रतिकार करू लागल्या. यामध्ये स्त्रीमुक्ती संघटना, मैत्रीणी, फोरम अगेन्स्ट ऑपरेशन, वुमन सेंटर, नारीसमता मंच, श्रमिक मुक्ती संघटना, क्रांतीकारी महिला संघटना इ. संघटनांनी स्त्रीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात डॉ. सौ. पद्मजा पाटील आणि डॉ. शोभना जाधव यांनी आपल्या भारतीय इतिहासातील स्त्रीया या ग्रंथात अत्यंत बारकाव्यानिशी विवेचन केले आहे. अखिल भारतीय महिला काँग्रेस शिवसेना महिला आघाडी, भारीप बहुजन महासंघ महिला आघाडी याद्वारेसुद्धा प्राथमिक सुविधा, शिक्षण, सत्ता यापासून अलिप्त असणाऱ्या स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम या महिला संघटनांनी केले.

अशा प्रकारे विविध महिला संघटनांचा उदय महिलांच्या विविध समस्यांच्या निराकरणांसाठी झालेला दिसून येतो.

**स्वंयअध्ययन प्रश्न - ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ....... साली मुंबई एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात पहिल्या स्त्रीअभ्यास केंद्राची स्थापना झाला.

(अ) १९७०  (ब) १९७१  (क) १९७२  (ड) १९७३

२. भारतीय महिला परिषदेची स्थापना ...... यांनी केली.

(अ) कर्मवीर भाऊराव पाटील  (ब) महर्षी कर्वे

(क) न्या. रानडे  (ड) म. फुले

३. हिंदू महिला सभेने .......... हे पहिले मराठी साप्ताहिक सुरू केले.

(अ) हिंदू महिला  (ब) जागर  (क) केसरी  (३) द हेरॉल्ड

४. 'भारत स्त्री महामंडळाची' स्थापना ........ यांनी केली.

(अ) रमाबाई रानडे  (ब) सरलादेवी चौधरी

(क) अवँतिकाबाई गोखले  (ड) ॲनी बेझंट

५. 'नारीमुक्ती संस्था' ....... या राज्यात स्थापन झाली.

(अ) आसाम  (ब) बिहार  (क) गुजरात  (ड) महाराष्ट्र

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवाद म्हणजे काय ?

२. स्त्री अभ्यासाची सुरूवात प्रथम कोणत्या देशात झाली ?

३. भारतीय स्त्रीयांचे राष्ट्रीय मंडळ कोणाच्या पुढाकाराने स्थापन झाले.

४. छात्र युवा संघर्ष वाहिनी कोणत्या राज्यात होती ?

५. श्रीमती मागरिट कझिन्स कोणत्या देशाच्या नेत्या होत्या ?

## २.४ विभाग चौथा : स्त्री हक्कांसाठींच्या चळवळी

मागील भागात १९ व्या शतकातील स्त्रीयांचे शिक्षण, त्यांच्या सुधारणा, स्त्रीयांच्या न्याय हक्कांसाठी त्यांनी देशभर उभ्या केलेल्या संघटनांचा अभ्यास केला आहे. या विभागामध्ये आपण भारतामध्ये स्त्रीयांच्या हक्कांसाठीच्या, त्यांच्या अधिकारासाठीच्या कोणकोणत्या चळवळी निर्माण झाल्या याचा अभ्यास करणार आहोत.

भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरूवात सत्यशोधक चळवळीने केली आहे. ''स्त्रीमुक्तीचा विचार म्हणजे स्त्रियांचे शोषण करणाऱ्या संस्थांच्या विरोधातील विचार होय.'' समाजाच्या सर्व अंगामध्ये स्त्री-पुरूष समानता यावी यासाठी असे स्त्रीमुक्ती चळवळीचे स्वरूप आहे.

**१) सत्यशोधक चळवळीमधील स्त्रिया :**

म. फुले यांनी स्त्री-पुरूष समानता आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. सन १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पुरूषसत्ता जातीय व्यवस्था व धर्मसंस्था यांच्याकडून स्त्रियांचे शोषण कसे होते हे सत्यशोधक चळवळीने मांडले. सत्यशोधकांचा स्त्रियाबाबतचा दृष्टीकोन उदार होता. सत्यशोधक समाजाने दलित मजूर स्त्रियांना आत्मभान, आत्मसन्मान मिळवून दिला. सत्यशोधक चळवळीमध्ये सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्या व्यतिरिक्त इतर स्त्रियांनाही आपल्या न्याय हक्कांसाठी या चळवळीमध्ये योगदान दिले.

**(१) सगुणाबाई क्षिरसागर :**

पुणे येथे १५ मे, १८४८ रोजी महारवाड्यात मुलींची जी दुसरी शाळा फुले यांनी सुरू केली त्या शाळेमध्ये शिक्षिका म्हणून सगुणाबाई क्षिरसागर यांनी केले. बालकाश्रम, अनाथ बालकांचे संगोपन त्यांनी केला.

**(२) फातिमा शेख :**

म. फुले यांच्या सामाजिक क्रांतीकारी विचारांशी शेख परिवार सहमत असावा. फुले यांच्या नॉर्मल स्कूल मधील पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका आणि १९ व्या शतकातील मुस्लिम समाजातील पहिली स्त्री शिक्षिका फातिमा शेख होय.

(३) सावित्रीबाई रोडे, (४) तान्हुबाई बिर्जे, (५) मुक्ता साळवे, (६) लक्ष्मीबाई पाटील, (७) रत्नम्माबाई आय्यावारू, (८) पार्वती महाधट, (९) कमलताई विचारे, (१०) लक्ष्मीबाई नायडू, (११) विमलताई देशमुख, (१२) नलिनी लढके इ. महिलांनी सत्यशोधक चळवळीची विचारधारा पुढे नेताना स्त्री हक्कांच्यासाठी अनेक संकटांना सामोरी गेल्या.

## २) आत्मसन्मान चळवळ :

तामीळनाडू प्रांतात रामस्वामी पेरीयार यांच्या नेतृत्वाखाली १९२६ मध्ये समाजसुधारणेसाठी आत्मसन्मान चळवळ सुरू झाली. ही नास्तिकांची चळवळ होती. म्हणून तिच्यावर टिका झाली. या चळवळीची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.

(१) अस्पृश्यता निवारण, (२) स्त्रियांचा विकास, (३) विधवांचे पुनर्वसन, विधवांच्या पुनर्विवाहाचा आग्रह, (४) देवधर्म, अंधश्रद्धा यापासून मुक्ती (५) स्त्री-पुरूष समानता, (६) स्त्री शिक्षणाचा आग्रह, (७) भटभिक्षूकांपासून होणाऱ्या धार्मिक शोषणाचा निषेध (८) ब्राह्मण्याचा अस्त (९) वैधव्याच्या सक्तिचा निषेध. या उद्दिष्टांसाठी स्त्रीयांनी ब्राह्मणी पुरूषसत्ताक व्यवस्थेला आव्हान दिले. या चळवळीतील स्त्रीयांनी स्त्रियांच्या मालमत्तेचा हक्क, घटस्फोट, पुनर्विवाह व संतती नियमता सारख्या स्त्रियांच्या प्रश्नांवर आवाज उठविला गेला.

## ३) दलित स्त्रीयांची चळवळ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध सभा, परिषदा, चळवळी व वृत्तपत्रांच्या माध्यमांतून दलित महिलांना उपदेश केला व त्यांच्या न्याय हक्कांसाठी, संघर्षाची आवश्यकता आहे हे पटवून दिले. त्यासाठी विधायक चळवळींची आवश्यकता सांगितली. महाड सत्याग्रह परिषद (२७ डिसेंबर, १९२७) मध्ये स्त्रीयांना केलेल्या  भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित स्त्रीयांनी लुगडी नेसण्याची पद्धत बदलावी, वरिष्ठ वर्गाच्या बायकांप्रमाणे लुगडी नेसावीत, गळ्यात कथलाचे दागीने घालू नये. मेलेल्या जनावरांचे मांस खावू नये असे निष्ठून सांगितले. १९२८ पासून पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या परिषदा, सभा भरवण्यावर डॉ. बाबासाहेबांनी भर दिला. देवदासी प्रथेमध्ये दलित समुहातील स्त्रियांच्या लैंगिक शोषणाला अधिमान्यता होती. या प्रथेविरूद्ध दलित स्त्री नेत्यांनी संघटन केलेले दिसते.

नाशिकच्या काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३०-३५ या काळात मोठा लढा दिला. या मंदिर सत्याग्रहात हजारो दलित स्त्रीयांनी मुलेबाळे खांद्यावर घेवून राम मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ कित्येक दिवस अहोरात्र सत्याग्रह केला. यामध्ये शांताबाई दाणी, श्रीमती भिकनबाई साळवी, श्रीमती शांताबाई गांगुर्डे स्त्रिया आघाडीवरती होत्या. विविध ठिकाणी अस्पृश्य महिला परिषद भरवून स्त्रीयांच्यामध्ये जागृती घडवून आणली. १९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री झाल्यानंतर त्यांनी महिलांसाठी पगारी प्रसुती रजा विधेयक मंजूर करून घेतले. १९४५ मध्ये कामगार मंडळावर महिला प्रतिनिधींची नेमणूक करण्याचे आदेश दिले. दलित स्त्रीयांनी आपल्या हक्कांसाठी पुढे आले पाहिजे असे आवाहन ही त्यांनी केले.

भारताचे  कायदामंत्री झाल्यावर त्यांनी मांडलेले हिंदू कोड बील म्हणजे त्यांच्या स्त्रीमुक्तीच्या प्रयत्नांचा कळस होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन दिले. सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन, शिक्षण प्राप्ती, राजकीय हक्कांची जाणीव इ. गोष्टीस महत्त्व दिले. 'जनता', 'मूकनायक', 'प्रबुद्ध भारत', 'समता' या पत्रांच्या माध्यमातून स्त्री प्रबोधनाचे फार मोठे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या स्त्रीयांमध्ये शांताबाई दाणी, बेबी कांबळे, उर्मिला पवार, रूथ मनोरमा, गीताबाई गायकवाड, सुधाताई रामटेके, भगीरधी नंदेश्वर, लक्ष्मीबाई नाईक, श्रीमती मिनाम्बक शिवराज इ. ची नोंद करावी लागते. याशिवाय निरक्षरता, अज्ञान, राजकीय जाणीवांचा अभाव असतानाही दलित स्त्रिया कमी संख्येने का असेनात पण भारतीय स्वातंत्र्य लढ्यातही सामील झाल्या.

**४) आदिवासी, शेतकरी, कामगार स्त्रीयांच्या हक्कांच्या चळवळी :**

आदिवासी स्त्रियांना मारहाण, बलात्कार, मालमत्तेचे, अपहरण इ. प्रश्नांना सातत्याने सामोरे जावे लागते. गैरआदिवासी लोकांनी त्यांच्या जमिनी बळकावणे, धातधपटशा दाखविणे, आदिवासींच्या घरांना आगी लावणे हे भयंकर दु:ख आदिवासींच्या वाट्याला आले होते. असाच  लढा वारली आदिवासी जामातीने गोदाताई परूळेकरांच्या नेतृत्वाखाली उभा केला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या जमिनी इतर लोकांनी आदिवासींना फसवून व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून बळकावल्या. गोदाताई परूळेकरांनी या गावक्याविरूद्ध आणि सरकारविरूद्ध २ ते ३ वर्ष सतत लढा उभारला. आदिवासींचे शोषण, त्यांचा सरकारकडून होत असलेला जुलूम, सातात्याने लोकांसमोर आणला. परिणामी गोदाताईंनी आदिवासी यांच्या मध्ये जागृतीचे मोठे काम केले. आणि सावकार, जमिनदार यांची येथून पिछेहाट झाली. आदिवासींच्या अन्न, वस्त्र, शिक्षण, रूढी-परंरा यातही मोठा बदल झाला. याचे सर्व श्रेय परूळेकर पती-पत्नींना जाते.

पुणे नगर जिल्ह्यातील स्त्री शेतकऱ्यांनी सावकारांच्या त्रासाला कंटाळून किंवा त्यांच्या शोषणाचा त्रास झाल्याने कर्जाचे दस्तऐवज फाडण्याचे आंदोलन सुरू केले. यास रोखेफाडीचे बंड असे म्हणतात. चंपारण्य सत्याग्रहामध्ये व खेडा सत्याग्रहामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयासुद्धा सामिल झाल्या होत्या. राजस्थानामध्ये सुद्धा जहागीरी व्यवस्थेविरूद्ध स्त्रीयांनी आवाज उठविला.

मुळशी सत्याग्रह, बार्डोलीचा सत्याग्रह, बिळाशी सत्याग्रह, तेभागा लढा, केरळमधील लढे, बिहारमधील लढे या सर्व लढ्यामध्ये स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीने लढे दिले. आणि ही सर्व आंदोलने यशस्वी केलीत. म. गांधीजींच्या पासून शरद जोशी पर्यंतच्या सर्व शेतकरी संघटनामध्ये महिलांची भूमिका, त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

कामगार चळवळीचा लढा सुद्धा यापेक्षा वेगळा नाही. श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रीयांचे स्थान दुय्यम आहे. एकसारखेच काम करणाऱ्या स्त्री-पुरूषांच्या वेतनात फरक असतो. इतकेच नाही तर भारतात स्त्री कामगार मोठ्या प्रमाणात शोषणाच्या बळी ठरल्या आहेत. कारखानदारीच्या विकासाबरोबर कामगारांची संख्याही वाढू लागली. कापड, ताग, कोळसा कारखाने, खाणीमधून स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीने काम करू लागल्या.

सुरूवातीला स्त्रीयांच्यापुढे अनेक समस्या होत्या. (१) बाळंतपणाची रजा नसणे, (२) साप्ताहीक सुट्टी नसणे, (३) कामावरून केव्हांनी काढून टाकण्याची भीती, (४) कामाचे तास अनिश्चित, (५) गैरहजर राहील्यास पगार कपात, (६) आरोग्याच्या समस्या इ.

नारायण मेघाजी लोखंडे यांनी प्रथम गिरणी कामगारांचे संघटन केले. त्यांचे नेतृत्व केले. त्यांनी विविध समस्यावरती मात करून कामगारांना न्याय मिळवून दिला. साप्ताहिक सुट्टी ही सर्वात महत्त्वाची मागणी मान्य करून घेतली. स्त्रीयांना कामाचा मोबदला योग्यरित्या मिळत नाही म्हणून मालकांची गाडी अडवून त्यावर दगडफेकसुद्धा केली. १९२८-२९ च्या काळात मुंबई गिरणी कामगार संपात स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. १९३० नंतर या कामगारांचे नेतृत्व कम्युनिस्ट स्त्री नेत्यांनी केले. त्यामध्ये मणीबेन काबरा, उषाताई डांगे, प्रभावती देवी इ. गोदावरी परूळेकरांनी स्त्री कामगारांच्या प्रश्नावर मोठे काम केले अहिल्याबाई रांजणेकर, सुशिल गोपालन, विमला रणदिवे, उषाताई डांगे, मिनाक्षी साने, मणीबेन कारा, पार्वती भोर, शांताबाई भालेराव इ. स्त्री नेत्यांनी स्त्री कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रसंगी तुरूंगवास भोगला पण त्यांची प्रश्ने मार्गी लावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री असताना अनेक खाणी व कारखान्यांना भेट दिली व तेथील स्त्रीयांसाठी विशेष सवलती दिल्या. त्यांचे प्रश्न मार्गी लावले. याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द्यावे लागते.

### ५) चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन व स्त्रीया :

१९७० नंतर भारतात अनेक पर्यावरणवादी चळवळी उभ्या राहिल्या. त्यामध्ये चिपको चळवळ, झारखंड चळवळ, अप्पीको चळवळ, सायलेंट व्हॅली प्रकल्पा विरोधातील चळवळ इ.

चिपको चळवळ ही गढवाल हिमालयातील पर्यावरणवादी चळवळ आहे. या चळवळीत स्त्रीयांनी मोठ्या प्रमाणात सहभाग व नेतृत्व केले. १९७४ मध्ये चामोलीच्या रेणी जंगलात २५०० झाडे व्यापारी तोडणार होते. स्त्रीयांना अन्न, चारा व सरपण यासाठी जंगलावरती अवलंबून रहावे लागत होते. त्यामुळे स्त्रीयांनी या वृक्ष तोडीस विरोध केला. ही वृक्ष तोड थांबविण्यासाठी त्या झाडांना घट्ट पकडून चिपकून

राहील्या. आधी आम्हाला कापा नंतर वृक्ष कापा असे या स्त्रियांचे म्हणणे होते. म्हणून या चळवळीला चिपको चळवळ म्हणतात. या आंदोलनात स्त्रीया आपल्या घरातील पुरूषाच्या विरोधात उभ्या राहिल्या.

नर्मदा नदीवर बांधण्यात येणाऱ्या सरोवराच्या जलाशयामुळे महाराष्ट्र आणि गुजरात मधील आदिवासी शेतकरी कुटुंबे विस्थापित होणार होती. याशिवाय त्यांची सुपीक जमीन नष्ट होणार होती. याशिवाय या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न यावरती मेधाताई पाटकरनी आंदोलन छेडले व ते देशभर गाजले. या आंदोलनात स्त्रीयांचा सहभाग लक्षणीय होता.

बालविवाह, सती प्रथाविरोधी, हुंडाविरोधी आंदोलनामध्ये स्त्रीया हीरहिरीने भाग घेत आहेत. स्त्रीया भ्रृणहत्या ते बेटी बचाओ आंदोलनापर्यंत सक्रिय आहेत. साहित्य, वृत्तपत्रे, आंदोलनाचा मार्ग स्विकारून न्याय मिळवून घेण्यासाठी स्त्रीया पुढाकार घेत आहेत.

## ३.३ सारांश

ब्रिटिशांच्या आगमणांमुळे भारतामध्ये युरोपीयन विचारांचे वारे वाहू लागले. विचार, कल्पना, तत्त्वज्ञान या सर्वच क्षेत्रात क्रांतीकारी बदल होवू लागले. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतातील पहिल्या पीढीने आधुनिक विचाराची कास धरली. यातून जून्यांचा त्याग व नव्याचा स्विकार होवू लागला. पुरूषांप्रमाणे स्त्रीयांनाही शिक्षित केले पाहिजे ही भावना भारतीयांच्यामध्ये निर्माण होवू लागली. पण अशांची संख्या कमी होती. यातूनच स्त्रीयांचे शिक्षण १९ व्या शतकांमध्ये स्त्री सुधारणा बाबत आलेल्या समस्या व त्याचे केलेल निराकरण यातूनच स्त्रियांच्या संघटनांचा झालेला उदय आणि स्त्रियांच्या न्याय हक्कांसाठी स्त्रीयांनी उभारलेल्या चळवळी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

पुरूषप्रधान संस्कृतीने धार्मिक कायद्याचा धाक दाखवून स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात दुय्यम मानले पण विविध समाज, राष्ट्रपुरूषांच्या कामातून आज स्त्रीयांना न्याय मिळताना दिसत आहे. तो पुरेशा प्रमाणात जरी नसला तरी स्त्रीयांना संघटीत करण्यासाठी स्त्री नेतृत्व पुढे येताना दिसत आहे ही जमेची बाजू आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द

मिशनरी : ख्रिश्चन धर्माचा प्रचार आणि प्रसार करणारे प्रसंगी भारतीयांचे धर्मांतर करणारे युरोपियन.

प्रतिबंध : विरोध

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयंअध्ययन प्रश्न - १

**अ)** १. (क) १८१३

२. (क) १८१५

३. (ब) पुणे

४. (क) महर्षी कर्वे

५. (क) डब्ल्यू, डब्ल्यू. हंटर

**ब)** १. मॅग्नाकार्टा

२. १९४८-४९

३. महर्षी कर्वे

४. हंसा मेहता समिती

५. १९८६

### स्वयंअध्ययन प्रश्न - २

**अ)** १. (अ) १८२९

२. (ब) राजाराम मोहन रॉय

३. (क) स्वामी दयानंद सरस्वती

४. (अ) थिऑसौफीकल सोसायटी

५. (अ) म. फुले

**ब)** १. मुक्ता साळवे

२. महर्षी धोंडो केशव कर्वे

३. म. फुले

४. ग. ज. लॉर्ड बेंटिग

५. ईश्वरचंद्र विद्यासागर

**स्वयंअध्ययन प्रश्न - ३**

**अ)** १. (ड) १९७३

२. (ब) महर्षी कर्वे

३. (अ) हिंदू महिला

४. (ब) सरलादेवी चौधरी

५. (अ) आसाम

**ब)** १. समाजामध्ये स्त्रीयांचे होणारे शोषण स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून अभ्यासणे

२. अमेरिका

३. मेहराबाई टाटा

४. बिहार

५. आयरीश

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टिपा लिहा

१. स्त्रीवाद

२. १८१३ चा सनदी कायदा

३. वुडचा खलीता

४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

५. राजा रामोहन रॉय

६. आत्मसन्मान चळवळ

७. दलित स्त्रीयांची चळवळ

८. चिपको आंदोलन

९. नर्मदा आंदोलन

### ब) दिर्घोत्तरी प्रश्न

१. १९ व्या शतकातील भारतातील स्त्रीशिक्षण विषद करा.

२. २० व्या शतकातील भारतातील स्त्रीशिक्षण स्पष्ट करा.

३. स्वातंत्र्यानंतरच्या विविध आयोगांची माहिती सांगा.

४. १९ व्या शतकातील स्त्रीयांच्या सुधारणावर निबंध लिहा.

५. राजाराम मोहन रॉय यांचे व ब्राह्मो समाजाचे कार्य सांगा.

६. आर्य समाजाच्या कार्यावरती भाष्य करा.

७. म. फुलेंचे सत्यशोधक समाजाचे कार्य सांगा.

८. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीसंघटनाचे योगदान कथन करा.

९. दलितस्त्रियांनी उभारलेल्या स्त्री हक्काच्या चळवळी सांगा.

१०. आदिवासी व शेतकरी व कामगार स्त्रीयांच्या हक्कांच्या चळवळी सांगा

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया.

२. डॉ. गाठाळ एस.एस., भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन.

३. प्रा. शिंदे श्रीधर, २० व्या शतकातील भारतीय महिला (सीम), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,. पान नं. २५ ते ४४.

४. डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास.

५. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास.

६. पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन.

७. बगाडे उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजाती प्रभुत्व.

८. फडके य. दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ५.


❋❋❋

# घटक ४

# स्वातंत्र्य आंदोलन आणि स्त्रियांचा सहभाग


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ विभाग पहिला : गांधीजींची चळवळ

  ४.२.२ विभाग दुसरा : क्रांतिकारी चळवळ

  ४.२.३ विभाग तिसरा : शेतकरी आणि कामगार चळवळ

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकात आपल्याला लक्षात येईल -

- स्वातंत्र्य आंदोलनाची गरज कितपत होती व ती कशी आली.
- म. गांधीजींच्या चळवळीमधील स्त्रीयांचे काय योगदान होते.
- स्त्रीयांच्या चळवळीमधील सहभागाचा परिणाम देशावर काय झाला.
- क्रांतीकारी चळवळीचा इतिहास माहित करून घेणे.

- क्रांतीकारी चळवळीचा परिणाम होऊन क्रांतीकारक म्हणून स्त्रीयांचे योगदान काय होते.
- २० व्या शतकातील शेतकरी चळवळ स्त्रीयांचे लढे कसे उभे राहिले.
- २० व्या शतकातील कामगार चळवळीचा उदय आणि तिचा परिणाम काय झाला.

## ४.१ प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्यचळवळ ही सर्वात मोठी लोकचळवळ होती. या चळवळीमध्ये लाखो स्त्री-पुरूष, जात-पात, उच्च-नीचता हे सर्व विसरून एकत्र आल्यामुळे साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेला माघार घ्यावी लागली. इ.स. १८८५ ते १९४७ या कालखंडात स्वातंत्र्यचळवळीचे तीन टप्पे झाले. हा खरोखरच गौरवशाली कालखंड होता. देशाच्या स्वातंत्र्यासाठी समाजातील सर्व घटक एकत्रित आले होते. त्यामध्ये स्त्रीयांचा सहभाग लक्षणिय होता. मात्र त्यांच्या सहभागाचा इतिहास १९७५ नंतर ते १९८५ पर्यंत आंतरराष्ट्रीय महिला दशकात संशोधक लिहू लागले. परंतू यांचे स्वरूप मर्यादित राहिले किंबहुना वरिष्ठ वर्गांपूरता इतिहास लिहिला गेला. २० व्या शतकात म. गांधींच्या प्रेरणेने वरिष्ठ वर्गापासून सामान्य वर्गातील स्त्रीया चळवळी मध्ये सहभागी झाल्या. त्या राजकारण व समाजकारणाकडे वळल्या. क्रांतीकारी चळवळी, सत्याग्रह, असहकार चळवळ, संप, मोर्चे यामध्ये स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. म. गांधींच्या आवाहनाला हजारो स्त्रीयांनी प्रतिसाद दिला. अनेक स्त्रीयांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात आहुती दिल्या. सुभाषचंद्र बोस म्हणतात, ''स्त्रीयांच्या सक्रीय सहानुभूतीशिवाय आणि पाठिंब्याशिवाय पुरूषांना स्वातंत्र्य मिळविणे शक्य होणार नाही.'' तर म. गांधीजींच्या मते निर्भयता आणि धैर्य ही फक्त पुरूषांची मक्तेदारी नाही. हजारो अज्ञात स्त्रीयांच्यामध्ये हे गुण म. गांधीजींच्यामुळे निर्माण झाले.

गांधीजींच्या आगमनामुळे हिंदी राजकारणात नवे युग आले. गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रह या दोन तत्त्वांच्या साहाय्याने दक्षिण आफ्रिकेतील लढा पुकारला. ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरूद्ध त्यांनी पुकारलेल्या या स्वातंत्र्य लढ्यात स्त्रीयांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता.

**स्वातंत्र्यचळवळीचे टप्पे :**

१८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली आणि विधायक मार्गाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला सुरूवात झाली. या भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या १८८५ ते १९०५ या कालखंडात मवाळ नेत्यांवर काँग्रेसचा प्रभाव होता. काँग्रेसच्या ब्रिटिशांविरोधी आंदोलनात स्त्रीया जाहीरपणे भाग घेऊ लागल्या. १८८९ नंतर पंडिता रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या अधिवेशनाला काही स्त्रीया हजर राहात.

गांधीजींना स्त्री शक्तीची प्रथम जाणिव आफ्रिकेमध्ये झाली. गांधीजी आफ्रिकेमधील सत्याग्रहाचे नेतृत्व करत होते. तेव्हा त्यांना जाणवले की, ''पुस्तकी विद्येने नव्हे तर सहनशक्ती व विश्वास यातून निर्माण झालेले कणखर मन हे नेतृत्वासाठी गरजेचे आहे.'' गांधी १८९३ ला दक्षिण आफ्रिकेत गेले. गांधीवर टॉलस्टॉय यांच्या लिखाणाचा प्रभाव होता. याशिवाय पत्नी कस्तुरबा यांच्यापासून ही त्यांना प्रेरणा मिळाली. कस्तुरबा यांच्या नेतृत्वाखाली आफ्रिकेतील भारतीय महिलांनी सत्याग्रह सुरू केला. त्याचे कारण असे होते की १९०८ साली आफ्रिकन न्यायाधिशाने एक आदेश काढला की, ''आफ्रिकेतील कायद्याने केलेला विवाह अधिकृत मानला जाईल.'' त्यामुळे आफ्रिकेत राहणाऱ्या भारतीयांचे भारतीय प्रथेनुसार झालेले विवाह अनाधिकृत मानले गेले. याविरूद्ध श्रीमंत छगनलाल गांधी, श्रीमती जया कौर, श्रीमती हरिभाई पटेल, श्रीमती राजगोविंदा इ. महिलांनी सत्याग्रहात भाग घेतला. या महिलांना ३ महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली. शिवाय १६ वर्षाची विलीअम्मा अमानुष वागणूकीमुळे शहीद झाली. परिणामी आफ्रिकन सरकारला विवाह नोंदणी विषयक कायदा रद्द करावा लागला.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या १९०५-१९२० चा दुसऱ्या टप्प्यात टिळकांच्या नेतृत्वाखाली लढा चालू झाला. त्यांच्या स्वदेसी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुसूत्रीच्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र आणि बंगालमधील अनेक स्त्रीया सामील झाल्या. स्त्रीयांमध्ये उत्साह व चेतना निर्माण झाल्या. सन १९०४ साली पं. रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अखिल भारतीय स्त्रीयांच्या सभेत विविध प्रांतिक स्त्रिया एकत्र आल्या. डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूल चळवळीद्वारे ब्रिटिश सरकारला विरोध केला. वंगभंग चळवळीतील स्त्रीयांचा सहभाग लक्ष वेधून घेण्यासारखा होता. ॲनी बेझंट आणि सरोजिनी नायडूसारख्या नेतृत्व संपन्न महिला निर्माण होऊ लागल्या.

**सत्याग्रह चळवळी व त्यातील स्त्रिया :**

दक्षिण आफ्रिकेमध्ये वर्णभेदा विरूद्ध लढा देत असतानाच गांधीजींनी प्रथम सत्याग्रह चळवळीची सुरूवात केली. त्याची प्रेरणा गांधीजींना कस्तुरबा गांधी या त्यांच्या पत्नीकडून मिळाली. त्यांनी वर्णभेदाविरूद्ध सत्याग्रहाचा अवलंब करून लढा पुकारला. गांधीजी दक्षिण आफ्रिकेमध्ये जाण्याच्या आधीपासून भारतीय लोक तेथे राहात होते. तेथे इंग्रजांकडून त्यांचा छळ व त्यांच्यावर अन्याय होऊ लागला म्हणून हा दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह घडून आला. भारतीयांमध्ये विवाह हा करार मानला नसून ते एक बंधन मानले गेले होते. दक्षिण आफ्रिकेतील कायद्यानुसार विवाहाला मान्यता प्राप्त झाली असून पहिले विवाह रद्द मानण्यात यावे असे मानले गेल्यामुळे गांधींच्या नेतृत्वाखाली हा सत्याग्रह उभारला गेला. आफ्रिकेमधील सत्याग्रहात भारतीय महिलांनी भाग घेतला. त्यामध्ये श्रीमती जया कुवर, श्रीमती काशी, श्रीमती पटेल इत्यादी महिलांचा सहभाग होता. या सत्याग्रहात भाग घेणाऱ्या स्त्रीयांना शिक्षा दिल्या होत्या. या सत्याग्रहामध्ये एक स्त्री १६ वर्षाची होती. तिचा कारागृहातील अमानुष छळामद्ये

मृत्यू झाल्याचे पुरावे आढळतात. अशा अनेक स्त्रीयांचा सहभाग पुरूषांच्या बरोबर होता. त्यांच्या प्रयत्नातून पुढे हा आफ्रिकन कायदा रद्द करण्यात आला. त्यातूनच गांधीजींना स्वातंत्र्य लढ्याच्या संघर्षाची प्रेरणा मिळाली आणि भारतामध्ये अशा अनेक प्रकारचे सत्याग्रह घडून आले व देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले.

**१) चंपारण्य व खेडा सत्याग्रह :**

चंपारण्य सत्याग्रह हा निळीसंबंधी होता. सन १९१७ मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली गुजरातमधील खेडा जिल्ह्यामध्ये 'करबंदी' सत्याग्रह झाला. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांवर लादलेल्या कराविरूद्ध हे आंदोलन होते. त्यामध्ये स्त्रीयांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. कारण याची खरी झळ महिलांना व कुटुंबाला पोहचत होती.

सन १९१८ मध्ये बिहारमधील 'चंपारण्य' या जिल्ह्यात सत्याग्रह झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखालील हा पहिला सत्याग्रह होता. चंपारण्य जिल्ह्यात निळीची शेती करावी असा आग्रह धरणाऱ्या इंग्रजांविरूद्ध लहान शेतकऱ्यांनी व मजुरवर्गानी केलेला हा सत्याग्रह 'चंपारण्य' सत्याग्रह म्हणून प्रसिद्ध होता. या शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने निळीची शेती करून घेतली जात होती. तसेच त्याचा मोबदला सुद्धा दिला जात नसे. मजुरांकडून खूप काम करून घेऊन अगदी कमी पैसे दिले जात असल्यामुळे हा सत्याग्रह केला गेला. यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्त्रीया सहभागी झाल्या. यातूनच म. गांधींना स्त्री शक्तीची जाणिव झाली.

**२) शैलेट कायदा व जालियानवाला बाग हत्याकांड :**

या कायद्यानुसार सरकारने दडपशाही पद्धतीने अनेक कायदे भारतीयांवर लादले. त्याचा प्रतिकार करण्याच्या उद्धेशाने गांधीजींनी सत्याग्रह पुकारला. १३ एप्रिल, १९१९ रोजी जालियानवाला बागेत जनरल डायरने केलेल्या गोळीबारात झालेल्या हत्याकांडात स्त्रीया व मुली मिळून ४२ जण मृत्यूमुखी पडल्या. माता अमर कौर आणि रतनदेवी या रात्रभर मृतांचे संरक्षण व जखमींना संभाळत होत्या. रौलट कायद्याविरूद्ध म. गांधींनी पुकारलेल्या सत्याग्रहात अनुसया बेन सारख्या स्त्रीयांनी महत्त्वपूर्ण भूमिका व कार्य केले. तसेच सरोजिनी नायडू यांनी लंडन मध्ये जालियानवाला बाग हत्याकांडाबद्दल निर्भयपणे भाषण केले. आणि या घटनेकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले.

**३) असहकार आंदोलन व स्त्रीया ( १९२० - १९३०) :**

१९२० ते १९४७ हा स्वातंत्र्यचळवळीचा तिसरा आणि अंतिम टप्पा फारच महत्त्वपूर्ण ठरला. या काळाचे संपूर्ण नेतृत्व म. गांधीजी यांच्याकडे आले. त्यांनी देशातील जनतेला असहकाराचा कार्यक्रम दिला. त्यामध्ये शाळा, कॉलेज व न्यायालयावर बहिष्कार, विदेशी दारू, कपडे, दुकानांवर बहिष्कार, निवडणूक व विधीमंडळांवर बहिष्कार असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. गांधीजींच्या या असहकार चळवळीत लाखो लोक सहभागी झाले. यामध्ये स्त्रीयांचा सहभाग सुद्धा कौतुकास्पद होता. मुंबई आणि गुजरात मध्ये कस्तुरबा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात अनेक महिला एकत्र आल्या. त्यामध्ये

दंडाबहन, दाईबहन, भक्तीबा, मीठूबहन, मणीबेन, नंदूबेन, नर्मदाबेन, नरहरीबेन इत्यादी महिलांनी सहभाग घेतला. कस्तुरबांच्या या सत्याग्रहात चरखा वर्ग चालविणे, खादी घराघरातून विकणे, स्वयंसेविकांचे गट तयार करणे, स्वदेशी कापड, स्वदेशी बांगड्या वापरण्याबद्दल घरोघरी जाऊन स्त्रियांच्यात जागृती निर्माण करणे इत्यादी कार्यक्रमांचे नियोजन केले होते. स्त्रीयांनी सूतकताईच्या कार्यक्रमामध्ये मोठा भाग घेतला यशोदाबाई भट्ट, राधाबाई आपटे यांनी काँग्रेसची ध्येये, हुतात्म्यांचे बलिदान इतिहासकालीन स्त्री-पुरूषांची चरित्रे इत्यादी विषय किर्तनातून प्रभावीपणे मांडले आणि खेड्यात व शहरात जागृती घडवून आणण्याचे महान कार्य केले. १९२० ते १९३० या दशकात गांधीजींच्या विधायक, कार्यक्रमात स्त्रीयांची संख्या वाढू लागली. केवळ संख्याच वाढली नाही तर आपणास सिद्ध ही केले. सरोजिनी नायडू यांनी महिलांना एकत्र करण्याचे काम केलेले व त्यांच्यामध्ये राष्ट्रीय जागृती व प्रबोधनासाठी अनेक बैठका घेतल्या. प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीच्यावेळी मुंबईतील १००० महिलांनी निदर्शने केली.

महात्मा गांधीजींनी दिलेल्या आवाहनाला हजारो स्त्रीयांनी प्रतिसाद दिला. त्यांनी रामायण व महाभारतातील स्त्रीयांच्या कर्तृत्त्वाची उदाहरणे स्त्रियांपुढे ठेवली. इस्लामच्या रक्षणासाठी मुस्लिम स्त्रियांना आव्हान केले. एवढेच नाही तर पती, सासरच्या कुटुंबातील सर्व मंडळी व भाऊ यांना स्त्रीयांना घराबाहेर पाठविण्यासाठी त्यांची मने वळविली. परिणामी बंगालमधील आर. सी. दास यांची विधवा बहिण ऊर्मिलादेवी, पत्नी वासंतीदेवी व भाची सुनितीदेवी या सहभागी झाल्या. त्यांनी बंगालमध्ये स्त्रीयांच्यात खादी चळवळ सुरू केली. गांधीजींच्या भाषणाच्या प्रभावाने दुव्वरी शुबम्मा हीने मोहिमेत स्वत:ला वाहून घेतले. १२ वर्षीय दुर्गाबाई देशमुख या लढ्यात उतरल्या. मदनादेवी मुखोपाध्यायसारख्या वेश्या स्त्रीने १९२२ ते १९२४ या काळात आर. सी. दास यांच्या सत्याग्रह चळवळीत सहभागी झाल्या. सरलादेवी चौधुरानी व मुथ्थुलक्ष्मी रेड्डी, अमृत कौर या सारख्या स्त्रीयांनी नेतृत्व दिले. यांना गांधीजींनी ग्रामीण व गरीब स्त्रीयांचे प्रश्न हाताळण्यास सांगितले. राजकुमारी अमृत कौर या स्त्रीने १६ वर्षे गांधीजींची सेक्रेटरी म्हणून कार्य केले. सुशिला नायर या डॉक्टर महिला गांधीजींच्या कार्यात सहभागी होत्या. मोतीलाल नेहरूंची पत्नी स्वरूपाराणी नेहरू याशिवाय कमला नेहरू सुद्धा या आंदोलनामध्ये, सत्याग्रहात सामील झाल्या.

### ४) सविनय कायदेभंग व स्त्रिया :

सविनय कायदेभंग चळवळ ही भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक चळवळ असून तिची सुरूवात राष्ट्रीय सभेच्या आदेशाने १४ फेब्रुवारी, १९३० रोजी झाली होती. भारतीय स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या राष्ट्रीय सभेला पूर्ण स्वराज्य हवे होते. म. गांधींनी तडजोड म्हणून संपूर्ण दारूबंदी, ५०% शेतसारा माफी, मिठावरील कर रद्द, ५०% खर्चाची कपात, देशी मालाला संरक्षण, राजकीय कैद्यांची मुक्तता अशा एकूण ११ मागण्या सरकार पुढे मांडल्या होत्या. म. गांधीजींच्या या मागण्यांकडे ब्रिटिश सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे राष्ट्रसभेने म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली १४ फेब्रुवारी, १९३० रोजी सविनय कायदेभंगाचा

जनतेला आदेश दिला. मिठावरील कर गांधींना मान्य नव्हता. तेव्हा १२ मार्च, १९३० रोजी साबरमतीच्या आश्रमातून दांडी यात्रेला निघाले व ५ एप्रिल १९३० रोजी त्यांनी मिठाचा कायदा मोडला.

**१) मिठाचा कायदा मोडण्याचा सत्याग्रह :**

१२ मार्च, १९३० रोजी गांधींजी ७८ सहकाऱ्यां समवेत साबरमती आश्रमातून २४१ मैल अंतर पायी चालून दांडी येथे मिठाचा कायदा मोडण्याचे ठरविले. त्यांच्या या मार्गावर अनेक सत्याग्रही सामील झाले. यामध्ये महाराष्ट्रातील पंडीत खरे, गणपतराव गोडसे, गोविंद हारकारे, विनायक आपटे, केशव चित्रे, हरिभाऊ मोहनी असे १३ मराठी भाषिक होते. या आंदोलनामध्ये पहिल्यांदा स्त्रीयांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता.

सरोजिनी नायडू यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. ६ एप्रिल, १९३० रोजी मिठाचा कायदा मोडला आणि धारासना सत्याग्रहाची सर्व सूत्रे म. गांधीनी सरोजिनी नायडू यांच्या हातात दिली. कारण म. गांधी यांना तात्काळ अटक झाली. सरोजिनी नायडू यांनी धारसना सत्याग्रहाची सूत्रे आपल्या हाती घेतली. 'लाठीमार झाला तरी प्रतिकारासाठी हात उचलू नये' सत्याग्रहाच्या पहिल्याच दिवशी सरोजिंनी यांनी सत्याग्रहींना सांगितले. या सत्याग्रहामध्ये २५००० स्वयंसेवकांनी भाग घेतला. सत्याग्रही अतिशय निग्रहाने मिठाग्रहाकडे जात होते. पोलीसांच्या लाठीमाराला न घाबरता हा सत्याग्रहींचा प्रचंड समुदाय मृत्यूला हसत मुखाने सामोरा जात होता. मिठागराजवळ जाताच सरोजिनी नायडू, मणीलाल गांधी यांना अटक करण्यात आली. ब्रिटिशांनी दहशतवादाच्या बळावर सत्याग्रह मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतू सत्याग्रहाची ही चळवळ संपूर्ण भारतात, खेड्यापाड्यात पोहोचली. यातील काही महत्त्वाच्या ठिकाणी झालेल्या सत्याग्रह पुढीलप्रमाणे.

**महाराष्ट्र :**

मुंबई व महाराष्ट्रातील स्त्रीया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. शेतकरी, स्त्रीया व पुरूष यांच्यामध्ये या चळवळीमुळे नवचैतन्य निर्माण झाले. १९३०-३२ या काळातील मुंबईतील स्त्रियांच्या चळवळीने भारताचे लक्ष वेधले. ब्रिटिशांनी जरी दहशतीच्या बळावर स्त्रियांची धरपकड केली तरी त्यांचा सहभाग लक्षणीय ठरला. पारशी, ख्रिश्चन व गुजराती स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर मुंबई सत्याग्रहात भाग घेतला. सरोजिनी नायडू आणि अवंतिकाबाई गोखले यांच्या नेतृत्वाखाली १९३० मध्ये देशसेविका संघाची सुरूवात झाली. चेरींग कॅप्टन, हौसा मेहता, जयश्री रामजी, कृष्णाबाई घुमटकर, यशोदाबाई भट, अवंतिकाबाई गोखले इत्यादी महिला गांधीजींच्या सूचनेनुसार सत्याग्रहाचे नेतृत्व करू लागल्या. या संघाच्या सभासदांची संख्या ९०० पर्यंत गेली. या सत्याग्रहामध्ये कमल भागवत या कॉलेज सोडून सहभागी झाल्या. १४ ऑक्टोबर १९३१ साली सत्याग्रह बेकायदेशीर ठरविले व आंदोलक स्त्रीयांना अटक केली.

'हिंदूस्थानी सेविक दल' जून १९३० मध्ये डॉ. ना. सु. हर्डिकर यांनी स्थापन केले. त्याची कॅप्टन कल्याण सय्यद ही होती. यामध्ये कमल व कुसुम सोहनी बचूबाई वागळे, कृष्णा सरदेसाई, कावेरी

चौधरी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या दलामध्ये १२५ स्वयंसेविका होत्या. गांधीजींच्या विधायक कार्यात सहभागी होण्याच्या उद्धेशाने जानकीबाई यांनी अहमदनगरला 'हिंद सेविका संघा'ची स्थापना केली. हिंदुस्थान सेविका दलाच्या कार्यात कमल व कुसुम सोहनी, बचूबाई वागळे, कावेरी चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले. १९४० सालच्या वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातील पहिली स्त्री सत्याग्रही पद्माताई हरीलीकर होत्या. हिंद सेविका संघातून जानकीबाई आपटेनगरहून रोज एक स्त्री सत्याग्रही पाठवत. सहभागी सर्व स्त्रीयांनी सत्याग्रहात सामील होऊन विधायक कार्ये केली. त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या व कामे दिली ती त्यांनी प्रामाणिकपणे, निर्भयपणे पार पाडली. यामध्ये मिठाचा सत्याग्रह, खादी तयार करणे व वापरणे, दारू दुकानासमोर निदर्शने, विदेशी कपड्यांची होळी करणे यांचा समावेश होता. गुजराती महिलांनी परदेशी कापडाची दुकाने बंद पाडली. कमलादेवी चटोपाध्याय व अवंतिकाबाई गोखले यांनी अमृतसर हत्याकांडाची आठवण म्हणून मिठाचा कायदा मोडला. यावेळी कमलादेवींना अटक झाली. कस्तुरबा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ठाण्याजवळील कळवे येथे सत्याग्रह केला. या सत्याग्रहात कोतवाल, गंगुबाई मुळे, सुशिल ताम्हणे इत्यादी स्त्रीया सहभागी झाल्या. १५ मे, १९३० रोजी सरोजिनी नायडू यांना पकडले व १ वर्षातची शिक्षा झाली. त्यांच्या नेतृत्वाने अनेक स्त्रीया स्वातंत्र्याच्या चळवळीत आकर्षित झाल्या. अनेकांना प्रेरणा मिळाली. ब्रिटिशांच्या दहशतीला न जुमानता, पोलीस, तुरूंगवास, लाठीहाला सहन करता पुरूषांच्या सोबत स्त्रीया मोठ्या संख्येने पहिल्यांदाच जनआंदोलनात सहभागी झाल्या.

**बंगाल :**

सन १९२८ मध्ये लतिका घोष या शिक्षिकेने सुभाषचंद्र यांच्या सहकार्याने 'महिला राष्ट्रीय संघाची' स्थापना केली. यामध्ये स्त्रीशिक्षणाला प्राधान्य दिले. स्त्रीयांचा दर्जा सुधारल्याशिवाय देश सुधारणार नाही. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण हे मुख्य उद्धीष्ट समोर ठेवून कामाची सुरूवात केली. यामध्ये एलफिन्स्टन कॉलेज आणि बेथ्युज कॉलेजच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्त्रीयांनी सत्याग्रहाची स्थापना करून ब्रिटिशांना विरोध केला. १९२८ ला काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनावेळी तिरंगा ध्वजाप्रमाणे गणवेश करून महिला स्वयंसेवकांनी प्रभात फेरीमध्ये भाग घेतला.

नारी सत्याग्रहात ऊर्मिला देवी, ज्योतिर्मयी गांगुली, विमल प्रतिभादेवी सहभागी होत्या. शूद्र वगळता तिन्ही वर्गातील स्त्रीया सहभागी झाल्या होत्या. ह्या सर्व स्त्रीया खादीच्या साड्या वापरित. जुलै १९३० मध्ये यातील २२ स्त्रीया कैद झाल्या. गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीचे केंद्र बेथ्युज कॉलेज होते.

**३) मद्रास :**

मद्रासमध्ये सत्याग्रहास स्त्रियांचा फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला नसला तरी कृष्णाबाई राव यांनी १९२८ मध्ये स्त्रीयांच्या स्वदेशी लीगची स्थापना केली. या मार्फत सूत तयार करणे, स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविणे, खादी विकणे हे कार्यक्रम राबविले. रूक्मिणी लक्ष्मीपती यांना मिठाचा कायदा

मोडला म्हणून १९३१ मध्ये पहिली स्त्रीकैदी म्हणून वेलोरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर लीलाताई सुब्रम्हण्यम, मुथ्थुलक्ष्मी इत्यादी स्त्रीयांनी निदर्शने करून ही चळवळ पुढे नेली.

अलाहाबाद, लखनौ आणि लाहोरमध्ये हजारोंच्या संख्येने महिला सहभागी झाल्या. अलाहाबाद येथे स्वरूपाराणी नेहरू यांनी प्रभात फेरीमध्ये भाग घेतला. लाडोरानी झुत्सी ही लाहोर स्टुडंट युनियनची पहिली महिला अध्यक्षा झाली. अशा प्रकारे १९३०-३१ या स्वातंत्र्य चळवळीत आंदोलनात जवळजवळ १ लाख लोकांना अटक झाली. त्यामध्ये १७ हजार स्त्रीया होत्या.

### ४) छोडे भारत चळवळ आणि स्त्रीया :

स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा आणि अंतिम टप्पा म्हणजे छोडे भारत आंदोलन होय. ७ ऑ. १९४२ रोजी मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखाली गवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे अधिवेशन भरले. यास लाखो लोक उपस्थित होते. या आंदोलनात स्त्रीयांची संख्या लक्षणिय होती. गांधीजींनी सर्व देशवासियांना 'करेंगे या मरेंगे' असा निर्वाणीचा अखेरचा इशारा दिला असल्यामुळे देशाच्या ग्रामीण भागातून स्त्री-पुरूष मोठ्या संख्येने सहभागी झाले. परंतू ९ ऑगस्ट, १९४२ ची पहाट होण्यापूर्वीचसरकारने म. गांधी, पं. नेहरू यांच्या सहित सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली. त्यामुळे जमलेल्या लोकांचा संयम सुटला व अहिंसक मार्गाने जाणारी चळवळहिंसक बनली. यामध्ये ८ माणसे मृत्युमुखी पडली व ४४ जखमी झाले. स्त्रीयानाही सरकारचे अत्याचाराला सामोरे जावे लागले. श्रीमती सखाराम, मारते, योगेश्वरी, प्रतिमादेवी इत्यादी अनेक स्त्रीया या आंदोलनात शहीद झाल्या. तसेच सुचेता कृपलानी, उषा मेहता इत्यादी अनेक स्त्रीया भूमिगत राहून कार्यरत राहिल्या. या छोडो भारत चळवळीमध्ये सामील होऊन आपले नैपुण्य दाखविलेल्या स्त्रीया पुढीलप्रमाणे.

### १) अरूणा असफअली :

१९४२ च्या लढ्याला यांनी नेतृत्व दिले. त्यांच्यासोबत सुचेता कृपलानी, मृदुला साराभाई याही होत्या. भारतस्वतंत्र झाल्याखेरीज हा लढा थांबवू नये असे त्यांनी सांगितले. त्यासाठी दळणवळणाची साधने नष्ट करून सरकारची प्रशासकीय व्यवस्था खिळखिळी करावी असेही त्यांनी सांगितले. आंदोलनाच्या त्या नेत्या असल्यामुळे शासनाने त्यांच्या दिल्लीमधील त्यांच्या राहत्या घरावर जप्ती आणून लिलाव केला. त्यांनी 'इन्कलाब' चे संपादन केले. त्यांना पकडण्यासाठी सरकारने ५ हजार रूपये बक्षीस जाहिर केले.

### २) उषा मेहता :

गुप्त रेडिओ केंद्रातून सामान्य जनतेला संदेश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य उषा मेहता यांनी केले. त्या समाजवादी पार्टीच्या सदस्या होत्या. प्रत्येकवेळी जागा बदलून त्या रेडिओ प्रसारण करीत असत. रेडिओ वरून, 'ब्रिटिशांनो भारत सोडा', 'वंदेमातरम' अशा घोषणा दिल्या जात. स्त्रीयांवरील अत्याचाराच्या बातम्या या रेडिओ मार्फतच जनतेला समजत असत. क्रांतिकारकांचे बॉम्बस्फोट, जमशेदपूर हरताळ, चिमुर व आष्टी येथील स्त्रियांवरील अत्याचार याविषयी सर्वात प्रथम बातम्या या काँग्रेस रेडिओनेच

प्रसारित केल्या. अरूणा असफअली व डॉ. लोहिया यांची भाषणे व संदेश यावरून प्रसारित केले जात. १२ नोव्हेंबर, १९४२ रोजी हे रेडिओ स्टेशन पोलीसांनी छापा टाकून पकडले. यावेळी उषा मेहता यांना ४ वर्षाची कैद झाली.

### ३) सूचेता कृपलानी :

सूचेता कृपलानी यांचा जन्म १९०८ मध्ये अंबाला येथे झाला. लाहोर व दिल्ली येथे शिक्षण झाल्यावर त्या बनारस हिंदू विश्वविद्यालयात प्राध्यापिका झाल्या. म. गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये त्यांची निवड केली होती. त्यांनी भूमिगत आंदोलनाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. स्वातंत्र्यानंतर ही १९६२ पर्यंत लोकसभेच्या सदस्या तर १९६७ पर्यंत त्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री म्हणून कार्यरत होत्या. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मुख्यमंत्री बनण्याचा मान त्यांना मिळाला.

### ४) लिलाताई पाटील :

क्रांतिसिंह नानापाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या प्रतिसरकारच्या चळवळीत लिलाताई पाटील व राजमतीताई पाटील या सहभागी झाल्या. अमळनेरच्या कचेरीवर काढलेल्या मोर्चावर झालेल्या लाठी हल्ल्यात लिलाताईंचा गर्भपात झाला व येरवडा जेलमध्ये शिक्षा झाली. त्यानंतर त्यांनी कुंडल येथील स्त्रीयांच्या क्रांतिकारी दलाचे नेतृत्व केले. आणि तुफानी सेनेत स्त्रीयांना लढण्याचे प्रशिक्षण दिले.

अशाप्रकारे १९२० ते १९३० सालापर्यंत गांधीजींनी केलेल्या अनेक सत्याग्रहात स्त्रीयांचे योगदान महत्त्वाचे ठरते. पण तरीही आज अनेक स्त्रीया इतिहासात नोंदल्या गेल्या नाहीत.

### स्वयं-अध्ययन प्रश्न - १ :

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. चंपारण्य सत्याग्रह हा ........... मधील चंपारण्य या जिल्ह्यात झाला.

(अ) नागपूर (ब) गुजरात (क) दिल्ली (ड) बिहार

२. मिठाच्या सत्याग्रहासाठी ......... मध्ये साबरमती पासून दांडीयात्रेला प्रारंभ झाला.

(अ) १८२० (ब) १८३६ (क) १९३० (ड) १९३५

३. डॉ. राजेंद्र प्रसाद व गांधीजी यांच्या नेतृत्वाखाली .......... जिल्ह्यांमध्ये सत्याग्रह झाला.

(अ) मुळशी (ब) बार्डोली (क) चंपारण्य (ड) बिळाशी

४. धारासना सत्याग्रहाची सूत्रे ....... यांनी सांभाळली.

(अ) सूचेता कृपलानी (ब) सरोजिनी नायडू

(क) कमला नेहरू (ड) कस्तुरबा गांधी

५. गुप्त रेडिओ केंद्रातून जनतेला संदेश देण्याचे धाडसी काम ....... यांनी केले.

(अ) उषा मेहता (ब) लिलाताई पाटील

(क) अरूणा असफअली (ड) कमला नेहरू

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. आंदोलनात महिलांचा सहभाग वाढावा म्हणून किर्तनाचा वापर कोणी केला ?

२. मिठाच्या सत्याग्रहाला कोठून सुरूवात झाली ?

३. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या समवेत कोणी 'इन्कलाब' चे संपादन केले.

४. मिठाचा कायदा मोडला म्हणून पहिली स्त्रीकैदी कोण ?

५. बंगाल मध्ये महिला राष्ट्रीय संघाची स्थापना कोणी केली ?

## ४.२.२ विभाग दुसरा : क्रांतिकारी चळवळी आणि स्त्रीया

**प्रस्तावना :**

भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अनेक मार्गांनी प्रयत्न करण्यात आले. लाल-बाल-पाल या जहाल नेत्यांच्या विचारधारेतून जहाल गट निर्माण झाले. हाच जहाल गट क्रांतिकारक गटाच्या उदयास कारणीभूत ठरला. ब्रिटिशांनी केलेली आर्थिक पिळवणूक, दुष्काळ, रोगराई , उपासमार, वांशिक विद्वेष, दुखावणारा आत्मसन्मान आणि अनन्वीत अत्याचार यातून तरूण वर्गामध्ये क्रांतिकारक भावना प्रक्षोभित झाल्या. क्रांतिकारी मार्गानेच ब्रिटिशांचे साम्राज्य नष्ट करता येईल. या उद्देशाने ही चळवळ वाढली. या चळवळीमध्ये पुरूषांप्रमाणेच स्त्रीयांचाही सहभाग होता. स्त्रीया प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष या क्रांतीकारी चळवळीतून कार्य करत होत्या. त्यासाठी त्या स्वत:च्या जिवाचीही पर्वा करत नसत. ब्रिटिश सत्तेचा नायनाट करण्याच्या चळवळीमध्ये पुरूषांबरोबर स्त्रीयांनी भारतीय इतिहासात क्रांतिकारक म्हणून आपले स्थान निर्माण केले. ज्या क्रांतिकारी चळवळी उदयास आल्या त्यामध्ये स्त्रीयांनी सुद्धा अनेक कटामध्ये सहभाग घेऊन प्राणाची आहुती दिलेली आढळते. क्रांतिकारकांच्या संघटनातून स्त्रीयांना शस्त्रास्त्रसाठा करणे, बॉम्ब तयार करणे, तो फोडण्याचे प्रशिक्षण दिले जाई. या स्त्रियांचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. खालील स्त्रियांनी भारतीय इतिहासात क्रांतिकारक म्हणून आपले स्थान निर्माण केले.

## १) मॅडम भिखाजी कामा :

या मुंबई मधील श्री सोराबजी पटेल यांच्या कन्या. त्या १९०५ मध्ये लंडनला गेल्या आणि त्यांचा तेथे दादाभाई नौरोजी यांच्याशी संपर्क आला. त्या त्यांच्या स्वीय सचिव बनल्या. यावेळी त्यांचा संबंध श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारकाशी आला. त्याच्याबरोबर इंग्लंडच्या हाईडपार्क मध्ये त्यांनी इंग्रज विरोधी भाषण दिले. इंग्लंड मधील त्यांच्यावर निघालेल्या पकड वॉरंटमुळे त्यांनी फ्रान्स हे आपले कार्यक्षेत्र बनवले. फ्रान्समधून आपल्या क्रांतीकारी विचारांसाठी 'वंदे मातरम' हे वृत्तपत्र चालविले. एकूण ३५ वर्षे त्यांनी क्रांतिकारी महिला म्हणून कार्य केले.

## २) भगिनी निवेदिता :

यांचे मूळ नांव मार्गारेट नोबेल होते. त्यांचा जन्म उत्तर आयर्लंड मधील आलस्टरमध्ये झाला. त्या स्वामी विवेकानंदांच्या शिष्या होत्या. १८९८ साली त्या भारतात आल्या आणि स्त्री शिक्षणासाठी जागृती केली. त्यांनी आपले ग्रंथालय क्रांतिकारकांना दिले. वंगभंग आंदोलनाच्या वेळी राष्ट्रीय भावनेने प्ररित झालेल्या त्यांच्या कविता लोकप्रिय झाल्या. त्या स्वदेशीच्या प्रचारक होत्या. त्यांच्या बागबझार येथील घरी अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल इत्यादी क्रांतिकारक चर्चेसाठी येत. त्यामुळे क्रांतिकारी आंदोलनात त्यांचा अप्रत्यक्ष सहभाग होता. उपेंद्र दत्त यांनी सुरू केलेल्या 'युगांतर' या वृत्तपत्रामागे त्यांचीच प्रेरणा होता.

## ३) ननीबाला देवी :

१९१६ साली ननीबाला देवी यांना वैधव्य प्राप्त झाले आणि त्या क्रांतिदलात सामिल झाल्या. तेथे मुला-मलींना क्रांतीकारी प्रशिक्षण देणे, फंड गोळा करणे, गुप्त दस्तऐवज पोहोचविणे हे प्रमुख कार्य केले. त्यांना पकडण्यासाठी पुरस्कार जाहिर केला होता. पकडल्यानंतर त्यांना नग्न करून बेदम मारले. परंतू त्यांनी कोणतीच माहिती पुरविली नाही. त्यांनी तुरूंगात असताना दुकडीबाला या दलित मुलींचा श्रम कारावास कमी करण्यासाठी २१ दिवसांचे आमरण उपोषण केले.

## ४) सरलादेवी चौधरानी :

रविंद्रनाथ टगोर यांची भाची सरलादेवी यांचे स्थान क्रांतिकारी इतिहासात अटळ आहे. त्यांनी महाराष्ट्रातील 'शिवजयंती' व 'गणपती' उत्सावांप्रमाणे बंगालमध्ये 'राजा प्रतापादित्य उत्सव', 'वीराष्टमी' आणि 'महाकाली उत्सव' च्या द्वारे स्वातंत्र्य चळवळ जनतेमध्ये जागृत केली. त्या अखिल भारतीय

सामाजिक संघ, भारत स्त्रीमंडळ, अखिल भारतीय क्रांतिकारी दल यामध्ये कार्य करीत होत्या. लाहोर षडयंत्र केसमध्ये पंजाब व दिल्लीमधील कार्यकर्त्यांना पोस्टर व महत्त्वाची कागदपत्रे पोहोचविण्यामध्ये त्या प्रमुख म्हणून कार्यरत होत्या. एकूणच त्यांचे कार्य क्रांतिकारकाचे नेतृत्व करणे, त्यांचे संघटन करणे व त्यांना प्रशिक्षण देणे यामध्ये अग्रगण्य होते.

**५) प्रीतिलता वड्डेदार :**

'चित्तगाव' शस्त्रागारकांड, १९२६ मधील प्रमुख नेते सूर्यसेन यांच्या क्रांतिकारी दलाच्या प्रीतिलता या सदस्य होत्या. त्यांच्याबरोबर ब्रिटिशांनी केलेल्या चकमकीत कॅप्टन कॅमरान मारला गेला. त्यामुळे हे भूमिगत झाले. या काळात अपूर्व सेन व निर्मल सेन या साथीदारांच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी प्रीतिलताच्या नेतृत्वाखाली चित्तगांव येथील रेल्वे क्लबवर २४ सप्टेंबर, १९३२ रोजी हल्ला केला. यामध्ये १ युरोपियन महिला मृत्यू पावली तर १३ इंग्रज जखमी झाले. प्रीतिलता यांना गोळी लागली. पोलिसांच्या ताब्यात जाण्यापेक्षा जखमी अवस्थेत त्यांनी सायनाइड खाऊन वयाच्या २३ व्या वर्षी त्यांनी वीरमरण पत्करले.

**६) कल्पना दत्त :**

यांचा जन्म सन १९१४ मध्ये चित्तगांव येथे झाला. स्कूल मध्ये शिकत असताना त्यांच्यावर क्रांतिकार्याचा प्रभाव पडला. त्यांनी क्रांतिकार्यासाठी स्वत:चे शरीर व्यामानाने सदृढ बनविले. वयाच्या १४ व्या वर्षी त्या क्रांतिकारी कार्यात सहभागी झाल्या. १९२२ नंतर सूर्यसेन यांच्या क्रांतिदलात त्या सामिल झाल्या. चित्तगांव खटल्यातील दिनेश गुप्त व रामकृष्ण यांना फाशी देण्याचे ठिकाण डायनामाइट ने उडविण्याचा कट तिने रचला परंतू तो अपयशस्वी ठरला. १७ सप्टेंबर, १९३२ ला पुरूषी वेषात ती पकडली गेली. कलम १०९ नुसार मुलींना क्रांतीदलात सामिल होण्यास प्रवृत्त करणे, हत्यारे पुरविणे यासाठी त्यांना नजरकैद झाली. १९३३ मध्ये तिला त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. तिथेच त्यांनी चित्तगांव शस्त्रागारावरील हल्ल्याच्या आठवणी लिहिल्या. १९३९ ला त्यांची म. गांधी यांच्या प्रयत्नाने सुटका झाली.

**७) बिनादास शांती घोष व सुनिती चौधरी :**

शांती घोष आणि सुनिती चौधरी या हायस्कूलच्या विद्यार्थीनींनी २४ डिसेंबर १९३१ रोजी जिल्हा मॅजिस्टेट स्टिव्हन्सन यांच्या घरात शिरून त्यांची हत्या केली. बिना दासने १९३२ साली कलकत्ता विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात बंगालचे गव्हर्नर स्टॅनले जॅक्सन हे भाषण करीत असताना त्यांच्यावर गोळी झाडली. बिना दासला अटक झाली.

## ८) उज्वला मुजुमदार :

या बंगाल मधील स्वयंसेविका. त्यांनी लेवंग रेसकोर्स येथील एडर्सन हत्याकांडामध्ये भाग घेतला व त्या भूमिगत झाल्या. २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. कैदेतून सुटल्यानंतर भारत छोडो आंदोलनात त्या सहभागी झाल्या.

वरील सर्व क्रांतिकारी स्त्रीयांबरोबरच अशा अनेक स्त्रीया अप्रत्यक्षरित्या चळवळीला मदत करत होत्या. क्रांतिकारकांना हत्यार पोहचवत असत. क्रांतिकारकांना लपण्यास जागा देत असत. त्यांना अन्नधान्याचा पुरवठा करत असत. संदेश पोहोचविण्याचे कार्य करत. सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेमध्ये स्वतंत्र स्त्रीयांची तुकडी केली होती. त्यामध्ये पुरूषांप्रमाणे स्त्रीयांना सुद्धा सामिल होण्याचे आवाहन केले होते. या तुकडीचे नेतृत्व लक्ष्मीबाई सेहगल या स्त्रीने केले.

या क्रांतिकारी चळवळींच्या माध्यमातून या स्त्रीयांनी स्वातंत्र्यचळवळीत मोलाचे योगदान दिले. त्यात बऱ्याच स्त्रिया अविवाहीत होत्या. ब्रिटिशांच्या पाश्चात्य शिक्षणातून यासारख्या सुशिक्षित स्त्रीयांचा उदय झाला व त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वत:चे बलिदान देऊन स्वातंत्र्य प्राप्तीसाठी योगदान दिले. अशा प्रकारच्या अनेक चळवळी संपूर्ण भारतभर झाल्यामुळे त्यात स्त्रीयांचा सहभाग कुठेनाकुठे आढळतोच. काही स्त्रीया या बॉम्ब तयार करण्याच्या प्रशिक्षणामध्ये सुद्धा असल्याचे आढळते. या स्त्रीया कमकुवत नसून कणखर होत्या व त्यांचे मोलाचे योगदान स्वातंत्र्य संग्रामात होते.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - २

### (अ) रिकाम्या जागा भरा.

१. फ्रान्समधून 'वंदे मातरम' हे वृत्तपत्र ........ या क्रांतीकारी महिलेने चालविले.

(अ) भगिनी निवेदिता (ब) मॅडम भिकाजी कामा

(क) प्रीतिलता वड्डेदार (ड) सुनिती चौधरी

२. 'चित्तगांव' शस्त्रागारकांड मधील प्रमुख नेते ............ होते.

(अ) अरविंद घोष (ब) बिपिनचंद्र पाल

(क) सूर्यसेन (ड) बाळकृष्ण

३. पहिली क्रांतिकारी शहिद महिला ........... होत्या.

(अ) प्रीतिलता वड्डेदार (ब) वीना दास

(क) शांती घोष (ड) सुनिती चौधरी

४. तुरूंगात असताना दुकडीबाला या दलित मुलींचा श्रमकारावास कमी करण्यासाठी २१ दिवसांचे आमरण उपोषण करणाऱ्या क्रांतिकारी महिला ........... होत्या.

(अ) बीना दास (ब) ननीबाला देवी

(क) शांती घोष (ड) भगिनी निवेदिता

५. ........ यांनी महाराष्ट्रातील शिवजयंती व गणपती उत्सवाप्रमाणे बंगालमध्ये 'राणा-प्रतापदिन उत्सव', 'वीराष्टमी' आणि 'महाकाली उत्सव' याद्वारे स्वातंत्र्य चळवळ जनआंदोलनाला जोडली.

(अ) सरलादेवी चौधरानी (ब) भगिनी निवेदिता

(क) कल्पना दत्त (ड) विना दास

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. भगिनी निवेदिता यांचे मूळ नांव काय होते ?

२. प्रीतिलता वड्डेदार या कोणत्या क्रांतिदलाच्या नेत्या होत्या ?

३. २४ डिसेंबर, १९३१ रोजी जिल्हा मॅजिस्ट्रेट स्टिव्हन्सन यांच्या घरात शिरून त्यांची हत्या कोणी केली ?

४. कलकतात विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभावेळी भाषण करत असताना त्यांच्यावर कोणी गोळी झाडली ?

५. भगिनी निवेदिता यांचा जन्म कोठे झाला ?

## ४.२.३ विभाग तिसरा : शेतकरी चळवळ व कामगार चळवळ

### (अ) शेतकरी चळवळ :

**प्रस्तावना :**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेक प्रकारच्या चळवळी व उठाव घडून आले. त्यामध्ये शेतकरी व कामगार ही महत्त्वाची चळवळ होती. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील कच्चा माल युरोप मध्ये नेला व युरोप मधील मशिनवर तयार झालेला माल भारताच्या बाजारपेठेत आणला. त्यामुळे भारतातील हस्तोद्योग बुडाले व भारत ही हक्काची बाजारपेठ युरोपियनांना मिळाली. याद्वारे त्यांनी भारताची प्रचंड आर्थिक लुट केली. त्यांच्या या धोरणाचा परिणाम व्यापारा बरोबर भारतीय शेतीवर ही झाला. शेतकरी व मजूर यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली. कृषी क्षेत्रात ब्रिटिशांनी केलेल्या अमुलाग्र बदलामुळे

शेतकऱ्याची अधिकच पिळवणूक झाली. भरमसाट कर व्यवस्थेमुळे शेतकरी करांच्या ओझ्याखाली कायमचा दबला गेला. यातून शेतकऱ्यांनी, मजुरांनी उठाव केले. या उठावामध्ये स्त्रीयांचाही सहभाग महत्त्वाचा होता. कारण प्राचिन काळापासून स्त्रिया शेतीशी संबंधित आहेत. शेतकरी म्हणून किंवा शेतमजूर म्हणून स्त्रिया काम करत आहेत. मजुरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण मजुरी करणाऱ्या पुरूषांपेक्षा जास्त आहे. ग्रामीण भागात तर हे प्रमाण लक्षणीय दिसते.

**स्त्रीयांच्या शेतकरी चळवळी :**

युरोपियन मालकांच्या मळ्यात भारतीय महिला व मुली शेतमजूर म्हणून काम करत यामध्ये बंगाल व बिहार मध्ये जवळजवळ १० लाख एकर जमिनीत निळीची लागवड केली गेली. भारतातील अनेक प्रांतातून येथे शेतमजुरांची भरती केली जाई. फार मोठ्या प्रमाणात स्त्रिया निळीच्या मळ्यात काम करीत होत्या. या मळ्यातील मजुरांना मासिक ४ रू. तर स्त्रियांना १ रूपये १२ आणे मिळत असे.

**१) मजुरांवरील हल्ले :**

१९२५-२६ या काळात मजुर स्त्री-पुरूषांनी काम बंद आंदोलन करून आपापल्या गावी जाण्यास सुरूवात केली. तेव्हा चिडलेल्या मालकाच्या हस्तकांनी चंदीपूर परिसरात बायका-मुलांसहित झोपलेल्या ३ हजार मजुरांवर बायोगॅस सोडून ठार केले आणि प्रेते पाण्यात फेकून दिली.

**२) रोखे फाडीचे बंड :**

हे आंदोलन सावकरांविरूद्ध झाले. पुणे, नगर या भागात कर्जग्रस्त शेतकऱ्यांनी उठाव करून कर्जाचे दस्तऐवज फाडल्याने या बंडास 'रोखेफाडीचे' बंड असे म्हणतात. त्यामध्ये स्त्रीयांचा सहभाग सक्रिय होता.

**३) चंपारण्य जिल्ह्यातील लढा :**

चंपारण्यामधील निळीच्या मळ्यातील शेतकऱ्यांनी ब्रिटिश अत्याचारी मालका विरूद्ध म. गांधी व डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली लढा सुरू केला. यामध्ये जुलमी इंग्रज मालकांना गांधीजींनी पूर्णपणे नमवून मजुरीचे दर वाढवून घेतले. यामध्ये सुद्धा स्त्रीयांचा सहभाग लक्षणीय होता.

**४) मुळशी आंदोलन :**

पुणे जिल्ह्यातील मुळा नदीच्या संगमावर टाटा कंपनी विज निर्माण करण्यासाठी धरण बांधणार होती. त्यातून निर्माण होणारी वीज मुंबई शहरातील कापड गिरण्या, इतर कारकाने व आगगाड्यांना पुरविली जाणार होती. परंतू त्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधनच नष्ट होणार होते. यातूनच मुळशी सत्याग्रहाला सुरूवात झाली. यामध्ये जाईबाई भुईन, डॉ. इंदुमती नाईक यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. या आंदोलनात स्त्रीयांनी तुरूंगवास सहन केला.

### ५) बार्डोली सत्याग्रह :

म. गांधीच्या सल्ल्यानुसार बार्डोलीमधील सत्याग्रहाचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल करीत होते. हा सत्याग्रह शेतसाऱ्या विरूद्ध होता. शेतकरी कंगाल झाला होता. त्याला जगण्याला आधार नसल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतसारा भरण्यास विरोध केला. तेंव्हा सरकारने शेतकऱ्यांची जमिन, घरे, जनावरे जप्त करण्यास सुरूवात केली. सरकारच्या या धोरणाविरूद्ध बार्डोलीमधील स्त्री-पुरूषांनी एकत्र येऊन सरकारला विरोध केला. हा सत्याग्रह शेतकऱ्यांनी अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या उद्देशाने केला व यामध्ये ५०० च्या वरती स्त्रीयांनी सहभाग घेतला.

### ६) बिळाशीचा सत्याग्रह :

हा सत्याग्रह सातारा जिल्ह्यातील बिळाशी या गावी झाला. सामान्य लोकांच्या जंगलातील हक्कांविरूद्ध हा लढा होता. ब्रिटिश सरकारने जंगलातील गवत व सागवान कापण्यास बंदी घातल्यामुळे सामान्य जनता या जंगल सत्याग्रहात सहभागी झाली. यामध्ये मैनाबाई धनगर, धोंडूबाई मस्कर, राजुबाई कदम या बहुजन समाजातील स्त्रीयांचा सहभाग होता. बिळाशीच्या चावडीसमोर ५० दिवस राष्ट्रीय ध्वज फडकत ठेवला. या लढ्याच्या माध्यमातून गरिब, सामान्य कुटुंबातील स्त्रीचा स्वातंत्र चळवळीत सहभागी झाल्या.

याशिवाय आदिवासी स्त्रीयांचे लढे, केरळमधील स्त्रीयांचे लढेही फार महत्त्वाचे आहेत.

अशा प्रकारे भारतामध्ये स्वातंत्र्यचळवळीच्या वेळी शेतकरी चळवळ व कामगार चळवळींचा उदय होऊन त्यामध्ये स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीने लढा दिला होता. शिक्षणामुळे स्त्रीयांमध्ये झालेल्या जागृतीमुळे त्यांना होणाऱ्या अत्याचाराची जाणिव झाली. जास्तीत-जास्त त्रास व यातना स्त्रीयांना झाल्यामुळे या चळवळीत पुरूषांपेक्षा जास्त प्रमाणात स्त्रीयांचा समावेश झाला होता असे आढळते.

### ब) कामगार चळवळ :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच १८५० नंतर भारतामध्ये कारखानदारीचा पाया घातला गेला आणि भारतीय कामगार चळवळीचा उदय झाला. ब्रिटीशांच्या स्वार्थी औद्योगिक धोरणामुळे भारतामध्ये विविध प्रकारचे उद्योगधंदे उदयास आले. जसजसा उद्योग धंद्यांचा विकास झाला तसतशी कामगारांच्या संख्येतही वाढ होत गेली. पुढील १०० वर्षाच्या काळात कापड, ज्यूट, कोळसा या खाणीमध्ये लाखो स्त्री-पुरूष काम करू लागले. औद्योगिकरण मुळे भारतात सूबत्ता आली. परंतू कामगारांची अवस्था दयनीय झाली. ब्रिटिशांच्या जमिनदारी, रयतवारी व महालवारी या महसूल पद्धतीने शेतकरी भूमीहीन झाला व कारखान्यात मजूरी करू लागला. त्यांच्या बायकासुद्धा मजुरी करू लागल्या. या कामगार वर्गातील स्त्रीयांचे अतोनात हाल होत असत. १६ तास गिरणीत काम व ४ तास घरात असा जीवनक्रम लाखो स्त्रीयांच्या वाट्याला आला होता. उपासमार, कमी रोजगार यांना त्या तोंड देत होत्या. लहान

मुलांना कामाच्या वेळी मादक द्रव्याचे चाटण देऊन काम संपेपर्यंत कोंदट कोपऱ्यात झोपवून ठेवत. याशिवाय स्त्रीयांसाठी स्वच्छता गृहांसारख्या सोई कारखान्यात नव्हत्या. उपासमार, कमी वेतन याशिवाय १६ तास गिरणीत काम यामुळे अफाट नैराश्य भारतीय कामगारांच्या वाट्याला आले होते.

## १) कामाचे तास आणि पगार व स्त्रियांचे लढे :

मुंबईच्या कापड गिरणीमध्ये स्त्रीयांना १२ रूपये आणि लहान मुलांना ५ रूपये पगार होता. रेल्वे कापड गिरण्या हे भारतातील पहिले उद्योगधंदे होते. त्याचे केंद्र मुंबई व अहमदाबाद हेच होते. म. फुले यांचे अनुयायी मुबंईचे श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी सर्व असंघटीत कामगारांना एकत्र करून १८८० साली गिरणी कामगारांची पहिली संघटना स्थापन केली. त्यामुळे १८८१ साली कामगारांना सुधारणा देण्यासाठी पहिला फॅक्टरी ॲक्ट पास केला. पण याला विरोध म्हणून 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' स्थापन झाली. पुढे १९२० मध्ये अ. भा. कॉंग्रेसच्या सहकार्याने कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'ऑल इंडिया ट्रेड युनियन'ची स्थापना केली.

## २) गिरणी कामगार व स्त्रीयांचे लढे :

मुंबई गिरणी कामगार स्त्रीयांच्या लढ्याचे संदर्भ १९०८ पासून लिखित स्वरूपात मिळतात. १९२० मध्ये कामगार प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आखिल भारतीय कॉंग्रेसच्या सहकार्याने 'ऑल इंडया ट्रेड युनियन' ची स्थापना झाली. याच्या पहिल्या अधिवेशनास डॉ. ॲनी बेझंट हजर होत्या. या अधिवेशनात महाराष्ट्रातील महिलांचे प्रतिनिधित्व अवंतिकाबाई गोखले व नागुताई भोसले यांनी केले. यामध्ये कामगारांची एकी व संघटना बळकट करण्याचा संदेश दिला. त्यानंतर ३० नोव्हेंबर, १९३० ला लाल लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ट्रेड युनियन कॉंग्रेसचे अधिवेशन मुंबई येथे झाले. या अधिवेशनासाठी सरोजिनी नायडू, अवंतिकाबाई गोखले यांचा पाठिंबा होता. या अधिवेशनास सावित्रीदेवी हजर होत्या.

## ३) कापड उद्योग आणि स्त्रीयांचा लढा :

अहमदाबाद गिरणी कामगारांचा संघर्ष १९२२ साली सुरू झाला. कामाचे तास आणि मिळणारे वेतन यासाठी हा संघर्ष होता. यामध्ये अनसूया बेन हिने स्त्री कामगारांचे नेतृत्व केले. मालकांच्या शोषणाविरूद्ध ठामपणे संघर्ष दिला. १९४६ साली कोईमतूरमध्ये २०० स्त्री-पुरूषांनी कापड गिरण्यांच्या दारात निदर्शने केली. पोलिसांच्या माराला न घाबरता स्त्रीया रस्त्यावर आल्या. पोलिसांच्या बेछूट गोलीबारात अम्मू व सुबोधा या कामगार नेत्या मृत्यूमुखी पडल्या. या निदर्शनामध्ये रक्ताने माखलेली स्त्री नेतृत्व करीत होती. त्यामुळे मालकांना तडजोड करावी लागली.

## ४) खाण कामगार स्त्रिया :

कोळशांच्या खाणीमध्ये काम करणाऱ्या स्त्रीयांची स्थिती अत्यंत केविलवाणी होती. लोकवस्ती पासून खाणी लांब असल्यामुळे स्त्रीया खाणींच्या कुंपणाच्या आतच राहून काम करू लागल्या. परंतू

याचा वाईट परिणाम त्या कारखानदारांच्या व मुकादमांच्या वासनेच्या बळी ठरत. अत्यंत असहाय्य व हलाकीचे जगणे त्यांच्या वाट्याला येत होते. पुढे आंतरराष्ट्रीय स्त्री संघटनांनी केलेल्या नियमांमुळे स्त्रीयंसाठी व मुलांसाठी कायदे केले. त्यामुळे कामगार स्त्रीयांना थोडासा दिलासा मिळाला. यामध्ये शांताबाई भालेराव या स्त्रीने मोलाची कामगिरी केली.

**५) काथ्या कामगार :**

केरळमधील पुन्नप्पा वायलरचा रक्तरंजित राजकीय उठाव हा येथील काथ्या कामगारांच्या संपातून सुरू झाला. यामध्ये ३०० स्त्रीया मोर्चाच्या अग्रभागी होत्या. यामध्ये ३० पेक्षा जास्त स्त्रीया हुतात्मा झाल्या.

अशाप्रकारे पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांनी शेती सोबत कारखान्यामध्ये ही काम केले आणि ब्रिटिश सत्तेबरोबर दिलेल्या संघर्षात मोलाचे योगदान दिले.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - ३

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. कामगार प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आखिल भारतीय काँग्रेसच्या सहकार्याने 'ऑल इंडिया ट्रेड युनियनची' स्थापना ........... साली झाली.

(अ) १९२० (ब) १९३० (क) १९४० (ड) १९५०

२. अहमदनगर गिरणी कामगारांचा संघर्ष .......... साली सुरू झाला.

(अ) १९२० (ब) १९२२ (क) १९३० (ड) १९४२

३. १८८० साली गिरणी कामगारांची पहिली संघटना .......... यांनी काढली.

(अ) राजारामशास्त्री भागवत (ब) नारायण मेघाजी लोखंडे

(क) जमशेटजी टाटा (ड) अनुसया बेन

४. डॉ. राजेंद्र प्रसाद व म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली .......... जिल्ह्यामध्ये सत्याग्रह झाला.

(अ) मुळशी (ब) बार्डोली

(क) चंपारण्य (ड) बिळाशी

५. बिळशीचा सत्याग्रह हा ............ जिल्ह्यातील बिळाशी या गावी झाला होता.

(अ) सातारा (ब) पुणे (क) मुंबई (ड) नागपूर

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. चंपारण्याचा सत्याग्रह कशासंबंधी होता ?

२. बार्डोलीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व कोणी केले ?

३. १९२५ मध्ये  हजार मजूर स्त्री-पुरूषांवरती बायोगॅस सोडून कोठे ठार केले ?

४. डॉ. इंदुमती नाईक यांनी कोणत्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले ?

५. कोणत्या सत्याग्रहात चावडीसमोर ५० दिवस राष्ट्रध्वज फडकत ठेवला ?

## ४.३ सारांश

भारतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर तिने भारताचे आर्थिक शोषण केले. याचा विपरित परिणाम शेतकरी वर्गावर जास्त झाला. त्यांच्या मधील असंतोष शेतकरी उठावाच्या माध्यमातून करत असत. परंतू हा उठाव संघटित स्वरूपात नसल्यामुळे ब्रिटिश दहशतीच्या बळावर हे उठाव चिरडून टाकत असे. ब्रिटिशांनी रयतवारी, महालवारी व जमिनदारी पद्धतींचा वापर शेतसारा निश्चित करण्यासाठी केला. याचा परिणाम शेतसारा भरमसाठ वाढला. यातून मार्ग काढण्यासाठी सावकारांकडून कर्जे घेतली गेली. मात्र त्याची परत फेड न झाल्याने सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घातल्या. भूमीहीन झालेल्या अगतीक शेतकऱ्यांनी कारखान्यांमध्ये काम करण्यास सुरूवात केली. यामध्ये स्त्रीया सुद्धा सहभागी झाल्या आणि १६ तास काम करू लागल्या. मात्र तेथे ही त्या असुरक्षिततेमुळे कारखानदारांकडून वासनेच्या शिकार होऊ लागल्या. असंघटीत कामगारांमुळे जादा काम, कमी वेतन हे नशीबी आले. पुढे नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केलेल्या कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगार संघटितपणे आपल्या न्याय, हक्कांसाठी लढू लागले.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व घटक एकत्र आले होते. त्यामध्ये स्त्रीयांचा सहभाग लक्षणीय होता. म. गांधीच्या प्रेरणेने उच्च वर्गापासून सामान्य वर्गातील स्त्रीया सहभागी झाल्या व ब्रिटिशांच्या अन्यायाविरूद्ध लढा दिला.

## ४.४ पारिभाषिक शब्द

१) जमिनदारी पद्धत : या पद्धतीमध्ये जमिनीची मालकी आणि सारा वसुली हक्क जमिनदाराला मिळत असे. त्यामुळे प्रत्यक्षात जमिनीत कष्ट करणारे शेतकरी. जमिनदारांची कुळे बनली.

२) रयतवारी पद्धत : ज्या ठिकाणी शासन व जमिन कसणारी रयत यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापति झालेला असतो. या जमिन धारणेच्या प्रकारास रयतवारी पद्धती असे म्हणतात.

३) महालवारी पद्धत : या पद्धतीमध्ये जमिनीची मोजणी करणे, जमिनीची प्रत ठरविणे, प्रतीच्या आधारावर महसूल आकारणे आणि महसूल ठरविताना महालातील शेतकऱ्यांशी चर्चा करावी. तसेच शेतकऱ्यांना शेतीचे सर्व अधिकार द्यावेत.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं-अध्ययन प्रश्न - १**

**(अ)** १) बिहार
२) १९३०
३) चंपारण्य
४) सरोजिनी नायडू
५) उषा मेहता

**(ब)** १) यशोदाबाई भट्ट व राधाबाई आपटे
२) साबरमती आश्रमा पासून
३) अरूणा असफअली
४) लिलाताई पाटील
५) लतिका घोष

**स्वयं-अध्ययन प्रश्न - २**

**(अ)** १) मॅडम भिकाजी कामा
२) सूर्यसेन
३) प्रीतिलता वड्डेदार
४) ननीबाला देवी
५) सरलादेवी चौधरानी

**(ब)** १) मार्गारेट नोबेल
२) चित्तगांव शस्त्रागारकांड
३) शांती घोष आणि सुनिती चौधरी
४) विना दास
५) उत्तर आयर्लंड मधील आलस्टर मध्ये

**स्वयं-अध्ययन प्रश्न - ३**

**(अ)** १) १९२० २) १९२२ ३) नारायण मेघाजी लोखंडे

४) चंपारण्य ५) सातारा

**(ब)** १) निळी संबंधी २) सरदार वल्लभभाई पटेल

३) चंदीपूर रेल्वे परिसर ४) चंपारण्य

५) सातारा

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) टिपा लिहा.

१. सविनय कायदेभंग व स्त्रीया

२. छोडो भारत चळवळ व स्त्रीया

३. क्रांतिकारी चळवळीतील स्त्रीया

४. गिरणी कामगार व स्त्रीयांचे लढे

५. शेतकरी स्त्रीयांचे लढे

६. मुळशी आंदोलन

### (ब) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. गांधीजींच्या सत्याग्रही चळवळीतील स्त्रीयांचे योगदान स्पष्ट करा.

२. असहकार चळवळ व सविनय कायदेभंग चळवळीतील स्त्रीयांचे योगदान स्पष्ट करा.

३. शेतकरी व कामगार चळवळीतील स्त्रीयांचे योगदान स्पष्ट करा.

४. क्रांतिकारी चळवळीतील स्त्रीयांचे योगदान स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ.


१. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१.

२. डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन, कोल्हापूर. मार्च, २००७.

३. मोदी नवाझ ब. (संपादक), फडके वासंती (अनुवाद), भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, मेहता पब्बिशिंग हाऊस, जानेवारी, २००३.

४. डॉ. काकडे नभा, डॉ. आकलूजकर लता, आधुनिक भारताचा इतिहास, अक्षर लेणं प्रकाशने, सोलापूर, ऑगस्ट, २००५.

५. डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद, जून, २०१२.

६. मोरे सदानंद, लोकमान्य मे महात्मा, खंड १ व २, राजहंस प्रकाशन, पुणे, २००७.

७. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ५, श्री. विद्या प्रकाशन, पुणे.


❋❋❋